





# संरक्षणशास्त्र

## इयत्ता बारावी








# भारताचे संविधान

### भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास – २११६ (प्र.क्र.४३/१६) एसडी–४ दिनांक २५.०४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक ३०.०१.२०२० रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०२०–२१ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# संरक्षणशास्त्र

## इयत्ता बारावी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,पुणे

E5U4E1

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

**प्रथमावृत्ती : २०२०**
**पुनर्मुद्रण : २०२२**

© **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११००४**
या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‍धृत करता येणार नाही.

**संरक्षणशास्त्र विषय समिती**

प्रा. डॉ. श्रीकांत परांजपे, अध्यक्ष
ब्रिगेडीअर एस. जी. गोखले (निवृत्त), सदस्य
कर्नल डॉ. प्रमोदन मराठे (निवृत्त), सदस्य
डॉ. विजय जाधव, सदस्य
डॉ. शांताराम बडगुजर, सदस्य
डॉ. अजयकुमार लोळगे (सदस्य सचिव)

**संरक्षणशास्त्र अभ्यास गट**

श्री. नंदकुमार बोरसे
श्री. विवेकानंद कदम
डॉ. संजय ढाके
प्रा. होमसिंग पाटील
श्री. वैजनाथ काळे
डॉ. सोमनाथ राऊत
डॉ. केशव पाटील
श्री. विक्रांत कावळे
प्रा. गिरिश गावित
प्रा. भारतभूषण बालबुद्‍धे

**प्रमुख संयोजक**

**डॉ. अजयकुमार लोळगे**
विशेषाधिकारी कार्यानुभव व
प्र. विशेषाधिकारी,
आरोग्य व शारीरिक शिक्षण
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**नकाशाकार**

श्री. रविकिरण जाधव
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**मुखपृष्ठ व सजावट**

श्री. रमेश माळगे

**अक्षरजुळवणी**

पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**कागद**

७० जी.एस.एम. क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश**

**मुद्रक**

**निर्मिती**

**श्री. सच्चितानंद आफळे**
मुख्य निर्मिती अधिकारी

**श्री. प्रशांत हरणे**
निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**

**विवेक उत्तम गोसावी**
**नियंत्रक**
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई - २५

# भारताचे संविधान

## उद्‌देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम**
**समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्‍वास, श्रद्‌धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्‍वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;
**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्‌वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित**
**करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ॥

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

इयत्ता बारावीचे संरक्षणशास्त्र विषयाचे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना आम्हांला विशेष आनंद होत आहे. इयत्ता अकरावी आणि बारावीचा आशय अभ्यासाच्या दृष्टीने एकत्रित स्वरूपाचा आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. इयत्ता अकरावीमध्ये तुम्ही संरक्षणशास्त्रातील महत्त्वाच्या संकल्पना, भूराजकीय भूगोल, लष्करी इतिहास, संरक्षण अर्थशास्त्र, विज्ञान, तंत्रज्ञान, भारताची राष्ट्रीय सुरक्षा आणि भारताची उच्चस्तरीय संरक्षण संघटना यांचा भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने अभ्यास केला. त्यामागे इयत्ता बारावीमध्ये राष्ट्रीय सुरक्षेस असलेली आव्हाने आणि त्यासाठी करावयाचे प्रयत्न समजून घेण्यासाठीची बैठक निर्माण करणे हा हेतू होता.

इयत्ता बारावीमध्ये भारताच्या संदर्भातील राष्ट्रीय सुरक्षेच्या विविध पैलूंचा अभ्यास करणार आहोत. पहिल्या प्रकरणात भारताच्या लष्करी, राजकीय आणि राजनयिक, आर्थिक, विज्ञान आणि तंत्रज्ञान, आणि अंतर्गत राष्ट्रीय सुरक्षा या विविध पैलूंना समजावून घेण्यासाठीचा आराखडा दिलेला आहे.

उर्वरित प्रकरणांमध्ये भारताच्या अंतर्गत सुरक्षेला असलेल्या समस्यांसंबंधी जगातील विविध भूभाग व देश यांच्याशी भारताचे असलेले संबंध यांचा परामर्श घेतला आहे. शेवटच्या प्रकरणात भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून शेजारील देशांशी झालेल्या विविध युध्दांची माहिती दिलेली आहे.

संरक्षणक्षेत्रात करिअर करण्याच्या दृष्टिने आवश्यक त्या बाबी पाठ्यपुस्तकात समाविष्ट केल्या आहेत. त्याचा तुम्हांला निश्चितच उपयोग होईल. पाठ्यपुस्तकाचा अभ्यास करताना सुचवलेले उपक्रम, क्षेत्रभेटी, मुलाखती, माहिती तंत्रज्ञानाचा वापर, विविध माध्यमाचे साहाय्य, गटचर्चा, सादरीकरण याबरोबरच शिक्षक आणि पालकांची मदत घेऊन हा विषय अधिक सखोलपणे समजून घ्याल ही अपेक्षा आहे.

पाठ्यपुस्तक वाचताना, समजून घेताना, तुम्हांला आवडलेला भाग तसेच अभ्यास करताना येणाऱ्या अडचणी, पडणारे प्रश्न जरूर कळवा.

तुमच्या शैक्षणिक प्रगतीसाठी हार्दिक शुभेच्छा!

**(विवेक गोसावी)**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम
संशोधन मंडळ, पुणे.४

पुणे
दिनांक : २१ फेब्रुवारी २०२०
भारतीय सौर : २ फाल्गुन १९४१

# शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी

इयत्ता ११ वी आणि १२ वी संरक्षणशास्त्र विषयाचा अभ्यासक्रम एकत्रित विचार केला पाहिजे. इयत्ता ११ वीमध्ये संरक्षणशास्त्र विषयाच्या विविध पैलूंचा अभ्यास आहे. त्यात संरक्षणशास्त्रातील महत्त्वाच्या संकल्पना, भूराजकीय भूगोल, लष्करी इतिहास, संरक्षण अर्थशास्त्र, विज्ञान, तंत्रज्ञान आणि भारताची राष्ट्रीय संरक्षण संघटना यांच्याशी असलेल्या संबंधाचा अभ्यास आहे. तर, इयत्ता १२ वीमध्ये ११ वीतील विविध संकल्पनांची उपयोजनात्मक मांडणी आहे.

पहिल्या प्रकरणात भारताच्या राष्ट्रीय सुरक्षा विषयक प्रश्नांचा अंतर्भाव आहे. भारताचा राष्ट्रीय सुरक्षेकडे बघण्याचा दृष्टिकोन त्यात स्पष्ट केला आहे. त्यानंतर विविध काळातील आंतरराष्ट्रीय परिस्थितीमध्ये भारतासमोरील सुरक्षेला असलेली आव्हाने आणि भारताची धोरणे यांचा आढावा घेतला आहे. थोडक्यात, नंतरच्या प्रकरणांसाठीची पार्श्वभूमी या प्रकरणात मांडली आहे.

दुसरे प्रकरण भारताचे शेजारी पाकिस्तान व चीन या दोन देशांपासून भारताच्या सुरक्षेसंबंधित प्रश्नांवर प्रकाश टाकते.

तिसऱ्या प्रकरणात आशिया खंडातील इतर देशांशी असलेल्या संबंधांबाबत मांडणी केलेली आहे. या प्रकरणाचा पहिला भाग दक्षिण आशियातील नेपाळ, भूतान, बांगलादेश, श्रीलंका आणि अफगाणिस्तान यांच्याशी संबंधित आहे. दुसरा आणि तिसरा भाग अनुक्रमे पश्चिम व पूर्व आशियायी देशांशी असलेल्या संबंधांबाबत आहे.

प्रकरण चौथे हे भारताच्या आण्विक, अंतराळ आणि सागरी सुरक्षेच्या समस्यांबाबत आहे. त्यात भारताच्या आण्विक धोरणाची उत्क्रांती, अंतराळ कार्यक्रम आणि सागरी सुरक्षेसंबंधीची आव्हाने इत्यादींचा समावेश आहे.

प्रकरण पाचमध्ये भारताच्या अंतर्गत सुरक्षेच्या आव्हानांचा ऊहापोह आहे. यात चार प्रमुख आव्हानांची सविस्तर मांडणी आहे. त्यात देशांतर्गत दहशतवाद, जम्मू-काश्मीरमधील सीमापार दहशतवाद, नक्षलवाद, उत्तर-पूर्व राज्यांमधील बंडखोरी आणि काही भागातील डावा उग्रवाद यांचा समावेश आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारताने अनेक युध्द अनुभवली आहेत.

प्रकरण सहाव्यामध्ये त्या अनुषंगाने १९४७ नंतरच्या भारताने लढलेल्या युध्दांचा परिचय दिलेला आहे; त्यात-

(i) भारत-पाकिस्तान संघर्ष (१९४७-४८)
(ii) जुनागड मुक्ती संग्राम (ऑक्टोबर १९४७)
(iii) हैद्राबाद मुक्ती संग्राम (सप्टेंबर १९४८)
(iv) गोवा, दीव आणि दमण मुक्ती संग्राम (डिसेंबर १९६१)
(v) भारत-चीन संघर्ष (१९६२)
(vi) भारत-पाकिस्तान संघर्ष (१९६५)
(vii) भारत-पाकिस्तान संघर्ष (१९७१)
(viii) कारगिल संघर्ष पाकिस्तानसोबत (१९९९)

या पाठ्यपुस्तकाद्वारे तुम्हांला भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या समस्यांची व्यापक माहिती होईल. या पुस्तकात अनेक उपक्रम आणि नकाशे दिलेले आहेत. विद्यार्थ्यांच्या अभ्यास सहलीसाठी काही लष्करी आस्थापनांना दिलेल्या भेटी या स्वागतार्ह असतील. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने उपयुक्त वृत्तपत्रातील बातम्यांच्या वाचनासाठी तसेच दूरदर्शनवरील बातम्या पाहण्यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले पाहिजे.

इयत्ता ११ वी व १२ वी संरक्षणशास्त्र पुस्तकाच्या संयुक्त अध्ययनातून विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सुरक्षेच्या प्रश्नांमधील गुंतागुंत समजण्यास मदत होईल, असा आम्हांस विश्वास/खात्री आहे. आपल्या भावी शैक्षणिक जीवनासाठीही हे पुस्तक उपयोगी ठरेल. सुरक्षेसंबंधीच्या विविध क्षेत्रात शैक्षणिक संधीचीही माहिती या पुस्तकातून मिळेल.

तुमच्या शैक्षणिक प्रगतीसाठी हार्दिक शुभेच्छा.

संरक्षणशास्त्र विषय समिती व अभ्यासगट
पाठ्यपुस्तक मंडळ

## संरक्षणशास्त्रविषयक क्षमता विधाने : इयत्ता १२ वी

१. दुसऱ्या महायुद्धानंतरची आंतरराष्ट्रीय परिस्थिती आणि स्वातंत्र्यानंतर भारताला सामोरे जावी लागलेली संरक्षणविषयक आव्हाने समजून घेणे

२. पाकिस्तान आणि चीन या शेजारी देशांशी भारताचे असलेले वाद आणि त्यातून उभ्या राहिलेल्या संरक्षणविषयक आव्हानांचे स्वरूप समजून घेणे व त्यांचे विश्लेषण करणे

३. दक्षिण आशियातील लहान देशांसंबंधीचे भारताचे संरक्षणविषयक धोरण आणि त्यातून निर्माण होणाऱ्या आव्हानांचा भारत कसा सामना करतो याचा अभ्यास करणे

४. पश्चिम आणि पूर्व आशियातील देशांसमवेत भारताने संरक्षणविषयक संबंध कसे विकसित केले ही प्रक्रिया समजून घेणे

५. आण्विक आणि अवकाश क्षेत्रांतील तंत्रज्ञानाच्या विकासाचा अभ्यास करणे आणि भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेवर त्यांचा होणारा परिणाम समजून घेणे

६. भारताच्या सागरी धोरणाचे विश्लेषण करणे आणि हिंदी महासागर क्षेत्रातील संरक्षणविषयक आव्हानांचा सामना करताना भारताने वापरलेल्या पद्धतीचा अभ्यास करणे

७. दहशतवाद व नक्षलवादाच्या समस्या अभ्यासण्याबरोबरच जम्मू-काश्मीर आणि ईशान्य भारतात सीमेपलीकडून होणाऱ्या दहशतवादाच्या विशेष संदर्भात भारतापुढील अंतर्गत संरक्षणविषयक आव्हानांचे योग्य आकलन करून घेणे

८. अंतर्गत संरक्षणाचे प्रश्न सोडविण्यासाठी भारताने स्वीकारलेल्या पद्धती व दृष्टिकोनाचे विश्लेषण करणे


९. स्वातंत्र्यानंतर भारताला करावे लागलेले सशस्त्र संघर्ष, त्यांची कारणे आणि भारतीय सैन्यदलांनी या संघर्षांमध्ये बजावलेली भूमिका यांचा समग्र अभ्यास करणे

१०. भूगोल आणि व्यूहनीती यांचे परस्परसंबंध समजून घेण्यासाठी विविध प्रादेशिक विभागांचे नकाशे अभ्यासण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे


**S.O.I. Note :**

The following foot notes are applicable : (1) © Government of India, Copyright : 2020. (2) The responsibility for the correctness of internal details rests with the publisher. (3) The territorial waters of India extend into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line. (4) The administrative headquarters of Chandigarh, Haryana and Punjab are at Chandigarh. (5) The interstate boundaries amongst Arunachal Pradesh, Assam and Meghalaya shown on this map are as interpreted from the "North-Eastern Areas (Reorganisation) Act. 1971," but have yet to be verified. (6) The external boundaries and coastlines of India agree with the Record/Master Copy certified by Survey of India. (7) The state boundaries between Uttarakhand & Uttar Pradesh, Bihar & Jharkhand and Chattisgarh & Madhya Pradesh have not been verified by the Governments concerned. (8) The spellings of names in this map, have been taken from various sources. (9) The administrative headquarter of Telangana and Andrapradesh are at Hyderabad. (10) The administrative boundaries of J & K UT and Ladakh UT shown here are yet to be authenticated by concerned authorities.

# WORLD - POLITICAL (MAJOR COUNTRIES)




# आशिया खंडातील प्रमुख देश



# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | भारताची सुरक्षा: संकल्पनात्मक चौकट | १ |
| २ | भारताचे शेजारी: पाकिस्तान आणि चीन | १५ |
| ३ | भारत आणि आशिया | २५ |
| ४. | भारताची आण्विक, अवकाश आणि सागरी धोरणे | ४० |
| ५ | अंतर्गत सुरक्षा | ५१ |
| ६ | भारताचे स्वातंत्र्योत्तर सशस्त्र संघर्ष | ६६ |
| • | परिशिष्ट अ : संक्षिप्त रूपे<br>ब : संकेतस्थळे | ७९ |

# प्रकरण १ भारताची सुरक्षा : संकल्पनात्मक चौकट




राष्ट्रीय सुरक्षा म्हणजे काय? देशाच्या प्रादेशिक सीमा, सार्वभौमत्व आणि स्वातंत्र्याचे संरक्षण करणे म्हणजे राष्ट्रीय सुरक्षा होय. पारंपरिक पद्‌धतीने विचार केला तर राष्ट्रीय सुरक्षा म्हणजे बाह्य आक्रमणापासून राज्याचे रक्षण करणे असे मानले जाते. राष्ट्रीय सुरक्षेची ही फक्त लष्करी बाजू आहे. या लष्करी पैलूबरोबरच राष्ट्रीय सुरक्षेचे इतरही पैलू आहेत आणि तेही तितकेच महत्त्वाचे आहेत. देशाचे खऱ्या अर्थाने संरक्षण करायचे तर या व इतर प्रकारचे संरक्षणही आवश्यक ठरते. त्यात राजकारण किंवा राजनैतिक हालचाली (राजनय), समाज, पर्यावरण, उद्‌योग, ऊर्जा व इतर नैसर्गिक साधनसंपत्ती आर्थिक आणि मनुष्यबळाचाही समावेश होतो.

संरक्षण धोरणाचा व्यापक पद्‌धतीने विचार करताना त्यात देशाचा आर्थिक, सामाजिक व तंत्रज्ञानाचा पाया, सामाजिक व सांस्कृतिक एकजिनसीपणा, राजकीय स्थैर्य व विजीगिषू वृत्ती आणि कार्यक्षम राजनय आदी बाबींचा समावेश होतो. त्याशिवाय देशातील अंतर्गत परिस्थिती आणि राष्ट्रीय संरक्षण धोरण यांचे संबंधही विचारात घ्यावे लागतात.

कोणत्याही देशाचे संरक्षण धोरण अमूर्त नसते. त्याला नेहमी दोन प्रकारचे संदर्भ असतात – एक आंतरराष्ट्रीय आणि दुसरा देशांतर्गत परिस्थिती. देशाच्या इतर राष्ट्रांबरोबरच्या संबंधांमध्ये बदल झाला की त्याचे परिणाम संरक्षण धोरणावर होतात. देशांतर्गत परिस्थितीच्या संदर्भात राष्ट्रीय सामर्थ्यामध्ये समाविष्ट होणाऱ्या आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व इतर घटकांवरील मर्यादांचा विचार संरक्षण धोरण ठरवताना करावा लागतो.

## भारताचे संरक्षण धोरण

भारताच्या संरक्षण धोरणाचा अभ्यास करताना आपल्याला पुढील बाबींवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

**१. बाह्य सुरक्षा आणि सामरिक मर्यादा :**

- **राजनयिक :** आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये होणारे बदल आणि भारताच्या संरक्षणाला असलेल्या पारंपरिक व नव्या धोक्यांचे परिणाम यांचा समावेश होतो.
- **लष्करी :** यात पारंपरिक युद्ध, अंतर्गत सुरक्षेच्या समस्या, तसेच आण्विक, रासायनिक व जैविक प्रकारातील विध्वंसक अस्त्रांपासून असलेल्या धोक्यांचा समावेश होतो.
- **आर्थिक :** जागतिक अर्थकारण आणि व्यापारासंबंधी धोरणांतील बदलांमुळे होणाऱ्या परिणामांचा यात समावेश होतो.

**२. देशांतर्गत घटक :**

- **विज्ञान-तंत्रज्ञान :** विज्ञान व तंत्रज्ञानातील विकासातून संरक्षण दलांचे आधुनिकीकरण केले जाते.
- **आर्थिक :** देशाची आर्थिक स्थिती मजबूत असेल तर सुरक्षेवर त्याचा योग्य परिणाम होतो.
- **सामाजिक-राजकीय स्थिती :** देशातील सामाजिक व राजकीय स्थैर्य आणि त्याचे अंतर्गत सुरक्षेवर होणारे परिणाम
- **लोकसंख्येतील बदल :** यात स्थलांतरासारख्या समस्यांचा समावेश होतो.

भारताच्या संरक्षण धोरणात स्वातंत्र्य, अंतर्गत सुरक्षा आणि प्रादेशिक एकात्मता यांना सर्वाधिक प्राधान्य आहे. याचबरोबर स्वातंत्र्य मिळाल्यापासूनचा भारताचा शांतताविषयक दृष्टिकोन त्यात केंद्रस्थानी राहिला आहे. राष्ट्रीय सुरक्षेकडे पाहण्याच्या भारताच्या दृष्टिकोनात दोन बाबींना महत्त्व आहे :

(i) कोणत्याही संघर्षाकडे पाहताना त्याच्या मूळ कारणांवर उपाय केला पाहिजे, यावर भारताचा विश्वास आहे.

(ii) कोणताही संघर्ष सर्वप्रथम शांततामय मार्गाने सोडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सामान्यपणे सामाजिक, राजकीय आणि आर्थिक क्षेत्रांतील ताणतणावातून संघर्ष उत्पन्न होतो. असे संघर्ष परस्पर संवाद आणि राजनैतिक मार्गांनी सोडवले पाहिजेत. आंतरराष्ट्रीय राजकारणात या पद्धतींना वाद सोडवण्याचे 'प्रशांत वाटाघाटींचे मार्ग' (पॅसिफिक सेटलमेंट ऑफ डिस्प्युट्स) असे म्हटले जाते.

**तुम्हांला माहीत आहे का?**

**'प्रशांत वाटाघाटींचे मार्ग' (पॅसिफिक सेटलमेंट ऑफ डिस्प्युट्स) म्हणजे काय?**

संयुक्त राष्ट्रांच्या सनदेतील ३३ व्या कलमामध्ये दोन किंवा अधिक देशांमधील वाद मिटवण्याचे पुढील मार्ग सांगितले आहेतः वाटाघाटी, चौकशी, मध्यस्थी, तडजोड, लवाद, न्यायालयीन निर्णय, प्रादेशिक संस्था-संघटनांमार्फत मध्यस्थी किंवा संबंधित देशांनी स्वीकारलेले इतर शांततामय मार्ग.

**भारताच्या संरक्षण धोरणावर पुढील तीन घटकांचा मोठा प्रभाव राहिला आहे :**

**(i) धोक्याचे आकलन :** प्रादेशिक पातळीवर भारताला पाकिस्तान आणि चीन या शेजारी देशांपासून धोका आहे. त्यावरच आपले प्राथमिक लक्ष केंद्रित झाले आहे. याशिवाय इतर प्रादेशिक सत्तांचा धोकाही भारताला संभवतो. पाकिस्तान आणि चीनकडून असलेला धोका प्रामुख्याने सीमांवरील पारंपरिक संघर्षाचा आहे. त्यात काळाच्या ओघात अंतर्गत बंडखोरी, दहशतवाद्यांना मदत; याबरोबरच अण्वस्त्रांच्या प्रसारामुळे परिस्थिती आणखी गुंतागुंतीची झाली आहे. इतर प्रादेशिक सत्तांच्या बाबत बोलायचे तर त्यांचा धोका अप्रत्यक्ष आहे. भारताशी संबंधित विषयांमध्ये हस्तक्षेप किंवा भारतविरोधी शक्तींना मदत देण्याच्या स्वरूपात तो असू शकतो.

**(ii) स्वावलंबन :** अर्थव्यवस्था आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात स्वावलंबी बनण्याला भारताने नेहमी प्राधान्य दिले आहे. देशाचा औद्योगिक पाया विस्तारण्यावर भारताने लक्ष केंद्रित केले आहे. उद्योगांच्या विकासासाठी इतर देशांची मदत घेतानाही तंत्रज्ञानाचे

हस्तांतरण करण्यात यावे, अशी भारताची अपेक्षा असते. अमेरिका आणि पूर्वीचे सोव्हिएत रशिया यांची भारताला शस्त्रास्त्रे विकण्यासाठी नेहमी तयारी असे; परंतु तंत्रज्ञानाच्या हस्तांतरणाला ते फारसे राजी नसत, जेणेकरून भारतात शस्त्रास्त्रांच्या उत्पादनाला मर्यादा पडावी.

**(iii) राजकारणाकडे बघण्याचा स्वतंत्र दृष्टिकोन आणि शांततेचे धोरण :** संघर्षातून सर्व प्रश्न सुटत नाहीत या जाणिवेतून शांततामय मार्गाने प्रश्न सोडवण्याचा वारसा भारताला पूर्वीपासून लाभला आहे. सर्वांना सामावून घेण्याची भारताची सांस्कृतिक परंपरा आहे. स्वातंत्र्य आणि शांततेकडे पाहण्याच्या या दृष्टिकोनामुळेच भारताने अलिप्ततावादाची कास धरली होती. निःशस्त्रीकरणाकडे पाहण्याचा भारताचा दृष्टिकोनही शांततामय मार्गांचा पुरस्कार करतो. त्यामुळेच भारत अण्वस्त्रांच्या बाबतीत संपूर्ण निःशस्त्रीकरणाचा आग्रह धरतो.

देश स्वतंत्र झाल्यापासून ते आजवरची आंतरराष्ट्रीय परिस्थिती आणि भारताच्या संरक्षणाच्या संदर्भात वरील तीन घटकांचा अभ्यास आपण आता करू.

## पर्व पहिले : १९४७ ते १९६२

### आंतरराष्ट्रीय स्थिती :

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक सत्तारचनेत अनेक महत्त्वाचे बदल झाले. अमेरिका आणि रशिया या दोन महासत्ता उदयाला आल्या. त्याचबरोबर आशिया आणि आफ्रिका खंडातील राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळींमधून अनेक स्वतंत्र देश जन्माला आले. याच काळात जगात शीतयुद्धाचीही सुरुवात झाली. शीतयुद्ध म्हणजे अमेरिका आणि सोव्हिएत रशिया या महासत्तांच्या जगावरील वर्चस्वासाठी सुरू झालेला संघर्ष. त्यातून जगाची दोन गटांत विभागणी झाली. अमेरिकेच्या नेतृत्वाखालील पाश्चात्य गटात प्रामुख्याने पश्चिम युरोपमधील देशांचा समावेश होता, तर सोव्हिएत रशियाच्या नेतृत्वाखालील पूर्व गटात चीन आणि पूर्व युरोपातील देशांचा समावेश होता. ही विभागणी राजकीय विचारसरणीच्या आधारावर होती आणि दोन्ही गट जगावर आपले वर्चस्व व नियंत्रण वाढवण्याचा प्रयत्न करत होते. अमेरिकेच्या नेतृत्वाखालील पाश्चात्य गट भांडवलवादी विचारसरणीचा, तर पूर्व गट साम्यवादी विचारसरणीचा पुरस्कार करणारा अशी ही विभागणी होती. अशा या शीतयुद्धाच्या काळात भारत स्वतंत्र झाला.

**तुम्हांला माहीत आहे का?**

**शीतयुद्धाच्या काळातील काही महत्त्वाचे लष्करी गट व आघाड्या**

**अमेरिकेच्या लष्करी आघाड्या**

- नॉर्थ अटलांटिक ट्रीटी ऑर्गनायझेशन (NATO) किंवा उत्तर अटलांटिक करार संघटना, १९४९
- अन्झस (ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड व अमेरिकेची आघाडी- ANZUS), १९५१
- साऊथईस्ट एशिया ट्रीटी ऑर्गनायझेशन (SEATO) किंवा आग्नेय आशिया करार संघटना, १९५४
- सेंट्रल ट्रीटी ऑर्गनायझेशन (CENTO) – किंवा मध्यवर्ती करार संघटना, १९५५

**सोव्हिएत रशियाच्या आघाड्या**

- सोव्हिएत रशिया व चीनदरम्यान १९५०मध्ये झालेला लष्करी करार
- वॉर्सा पॅक्ट किंवा वॉर्सा करार, १९५५ (सोव्हिएत रशिया व पूर्व युरोपातल्या साम्यवादी देशांमधला करार)

**कोणत्या देशांना अलिप्ततावादी म्हणायचे? १९६१ च्या बेलग्रेड परिषदेत त्यासंबंधी पुढील निकष ठरवण्यात आले.**

**अलिप्ततावादाचे निकष :**

१. विविध राजकीय व सामाजिक व्यवस्था असलेल्या देशांच्या शांततामय सहजीवनाच्या तत्त्वाच्या आधारावर स्वतःचे स्वतंत्र धोरण आखणारे देश
२. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळींना पाठिंबा देणारे देश
३. शीतयुद्धाच्या संदर्भात महासत्तांच्या कोणत्याही बहुस्तरीय आघाडीत समाविष्ट नसलेले देश

४. महासत्तांमधील संघर्षाच्या संदर्भात कोणत्याही द्विपक्षीय किंवा लष्करी आघाड्यांमध्ये समाविष्ट नसलेले देश
५. महासत्तांमधील आपापसातील संघर्षाच्या संदर्भात परकीय सत्तांचा आपल्या भूमीवर लष्करी तळ उभारू न देणारे देश

याच पर्वात अलिप्ततावादी चळवळीचीही सुरुवात झाली. तत्कालीन युगोस्लाव्हियाची राजधानी बेलग्रेड येथे १९६१ मध्ये अलिप्ततावादी देशांची पहिली परिषद झाली. अलिप्ततावादाच्या संकल्पनेत दोन महत्त्वाची तत्त्वे आधारभूत आहेतः जागतिक घडामोडींचे स्वतंत्र आकलन आणि शांततावादी दृष्टिकोन. त्यामुळे अलिप्ततावादी देश शीतयुद्धाच्या काळातील महासत्तांच्या आघाड्यांपासून दूर राहिले.

### भारताचे धोरण

पंडित जवाहरलाल नेहरू यांनी ७ सप्टेंबर १९४६ रोजी आकाशवाणीवरून केलेल्या भाषणात भारताचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि संरक्षण धोरण यांची मांडणी केली. ते म्हणाले, 'ज्या देशांनी आणि गटांनी एकमेकांविरोधात आघाड्या करून जगाला महायुद्धाच्या दिशेने लोटले, अशा गटतटांच्या सत्ताकारणापासून शक्य होईल तितके दूर राहण्याचा आमचा प्रयत्न राहील.' याचा अर्थ स्पष्ट होता की, त्यावेळी जगात सुरू असलेल्या शीतयुद्धाच्या भांडणांपासून भारत स्वतःला दूर ठेवू इच्छित होता.

नेहरू युगातील भारताच्या संरक्षण धोरणाची उभारणी प्रामुख्याने दोन तत्त्वांवर झालीः जागतिक घडामोडींचे स्वतंत्र आकलन आणि शांततामय मार्गाचा पुरस्कार. हा शीतयुद्धातील संघर्षाचा काळ होता. त्यातील लष्करी आघाड्यांच्या राजकारणापासून स्वतःला दूर राखण्याची भारताची इच्छा होती आणि त्याला मनोमन शांतता हवी होती. तेव्हा या धोरणाची अंमलबजावणी कशी झाली?

भारताने आपल्या या धोरणांची दोन टप्प्यांत कार्यवाही केलेली दिसते. (i) आशिया व आफ्रिका खंडातील देशांमध्ये प्रादेशिक सहकार्याला प्रोत्साहन देणे (ii) अलिप्ततावादी धोरणाची पाठराखण करणे.

भारताने १९४७ मध्ये दिल्लीत आशियाई देशांची प्रादेशिक परिषद आयोजित केली. या आशियाई परिषदेत आशियातील स्वातंत्र्य चळवळींमधील अनेक नेते एकत्र आले. आशिया खंडातील सामाईक प्रश्नांची चर्चा करण्यासाठी आणि आशियात प्रादेशिकवादाची रुजवणूक करण्यासाठी हे नेते एका व्यासपीठावर आले होते.

**तुम्हांला माहीत आहे का?**

**प्रादेशिकतावाद म्हणजे काय?**

विशिष्ट भूप्रदेशातील देश सहकार्याच्या भावनेने एकत्र आल्यास प्रादेशिक संघटना निर्माण होतात. आपापल्या राष्ट्रीय हितसंबंधांच्या संवर्धनासाठी एकमेकांना सहकार्य करणारे गट ते स्थापन करतात. त्यातून स्वतःची स्वतंत्र व विशिष्ट ओळख प्रस्थापित करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. अशा संघटनांना 'प्रादेशिक संघटना' म्हणतात. भूप्रदेशाच्या पातळीवर परस्परांना असे सहकार्य करण्याच्या प्रक्रियेला 'प्रादेशिकतावाद' म्हणतात. यात भौगोलिक जवळीकतेला महत्त्व असले, तरी काही वेळा विशिष्ट मुद्दे किंवा विषयांच्या आधारावर प्रादेशिक सहकार्य आकाराला येऊ शकते. दूरसंचार व दळणवळण, ऊर्जानिर्मिती, आरोग्य यासारख्या विषयांमध्ये असे सहकार्य मिळू शकते. अशा प्रादेशिक सहकार्याची प्रक्रिया सामान्यपणे संबंधित देशांमधील राजकीय संवादातून होते. अशा परस्पर संवादातून पुढे संघटना उभी राहते. युरोपीय समुदाय (युरोपियन युनियन), आसियान (असोसिएशन ऑफ साऊथईस्ट एशियन नेशन्स – आग्नेय आशियातील देशांची संघटना) किंवा सार्क (साऊथ एशियन असोसिएशन फॉर रिजनल कोऑपरेशन – दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटना) यांसारख्या प्रादेशिक संघटना त्याची उत्तम उदाहरणे आहेत.

दुसरी परिषद १९५५ मध्ये इंडोनेशियातील बांडुंग येथे झाली. ही पहिली आफ्रो–आशिया परिषद ठरली. जागतिक राजकारणात आशिया आणि आफ्रिका खंडाचे

स्थान निश्चित करण्यासाठी आणि जगात शांतता प्रस्थापित करण्यात ते काय योगदान देऊ शकतात, हे ठरवण्यासाठी ही परिषद होती. बांडुंग परिषद ही एक ऐतिहासिक घटना होती. आशिया आणि आफ्रिका खंडांमध्ये प्रादेशिकतावादाचा प्रसार करण्यास तिची मदत झाली.

मात्र, १९५० च्या दशकाच्या उत्तरार्धात प्रादेशिकतावादाच्या प्रक्रियेसमोर काही समस्या उभ्या राहिल्या. शीतयुद्धाचा आशिया खंडात प्रवेश झाला. अनेक आशियाई देशांनी अमेरिका किंवा सोव्हिएत रशियाबरोबर लष्करी आघाड्या केल्या. त्यामुळे याच काळात प्रादेशिकतावाद अलिप्ततावादी चळवळीच्या दिशेने वळला. युगोस्लाव्हियातील बेलग्रेड येथे १९६१ मध्ये पहिली अलिप्ततावादी परिषद झाली. अलिप्ततावादी चळवळ ही महासत्तांच्या लष्करी आघाड्यांपासून अंतर राखून होती. त्यामुळे साहजिकच या आघाड्यांमध्ये सहभागी झालेले देश अलिप्ततावादी गटाचे सदस्य झाले नाहीत.



सन १९६१ मध्ये सुरू झालेल्या अलिप्ततावादी चळवळीचे संस्थापक सदस्य : (डावीकडून) भारताचे पंडित नेहरू, घानाचे नक्रुमा, इजिप्तचे नासेर, इंडोनेशियाचे सुकार्नो आणि युगोस्लाव्हियाचे टिटो.

**या पर्वात भारताच्या सुरक्षेसमोर अनेक आव्हाने उभी राहिली :**

(i) **१९४७-४८चे भारत-पाकिस्तान युद्ध :** स्वातंत्र्यानंतर लगेचच भारताच्या सैन्याला देशाच्या रक्षणासाठी उभे रहावे लागले. जम्मू आणि काश्मीरमध्ये पाकिस्तानी आक्रमणाला भारतीय सैन्याने पायबंद घातला. पाकिस्तानी फौजांना श्रीनगरपासून काही अंतरावर रोखून धरण्यात भारतीय सैन्याला यश मिळाले. यातून भारताची युद्धसज्जता दिसून आली.

(ii) **राष्ट्रीय एकात्मता :** स्वातंत्र्यानंतर लगेचच हैद्राबाद (१९४८), जुनागड (१९४७) यासारखी संस्थाने आणि नंतर गोव्यासारखा (१९६१) पोर्तुगीजांच्या ताब्यातील प्रदेश यांचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण करण्याच्या प्रक्रियेतही भारतीय सैन्याने महत्त्वाची भूमिका बजावली.

(iii) **हिमालयातील शेजारी :** नेपाळ, भूतान आणि तिबेट या हिमालयाच्या पर्वतराजीत वसलेल्या शेजारी देशांशी भारताने सुरक्षाविषयक करार केले. या देशांचे चीनपासून संरक्षण करण्याची जबाबदारी भारताने आपल्या शिरावर घेतली.

(iv) **चीन :** सन १९४९ मध्ये चीन हा साम्यवादी देश बनला. चीनमधील माओ झेडाँग यांच्या सरकारला लगेच मान्यता देणाऱ्या देशांमध्ये भारत होता. मात्र, तिबेटच्या प्रश्नावरून १९५०च्या दशकात भारत आणि चीन दरम्यानच्या संबंधांमध्ये तणाव निर्माण झाला. चीनने तिबेटवर बळाने कब्जा मिळवला. मात्र, या प्रदेशाला चीनने स्वायत्तता द्यावी, अशी भारताची अपेक्षा होती. या प्रश्नावर मार्ग काढण्यासाठी भारत आणि चीन दरम्यान १९५४ मध्ये तिबेट करार झाला. तो पंचशील तत्त्वांवर आधारलेला होता. भारत आणि चीनमध्ये पहिला संघर्ष १९५८ मध्ये अक्साई चीनच्या प्रदेशावरून झाला. सीमारेषेला मान्यता आणि अक्साई चीनचा ताबा ही भारत आणि चीनमधील संघर्षाची मुख्य कारणे होती. याच कारणांवरून पुढे १९६२मध्ये भारत आणि चीनमध्ये युद्ध झाले.

**तुम्हांला माहीत आहे का ?**

भारत आणि चीनमधील तिबेटच्या प्रदेशादरम्यान व्यापार व इतर संबंधांबाबत भारतीय प्रजासत्ताक आणि चिनी प्रजासत्ताक (पीपल्स रिपब्लिक ऑफ चायना) यांच्यात १९५४ मध्ये झालेला करार

तिबेटसंबंधीचा हा करार पुढील तत्त्वांवर आधारलेला होता.

- दोन्ही देश परस्परांची प्रादेशिक एकात्मता आणि सार्वभौमत्वाचा आदर राखतील.
- कोणताही देश दुसऱ्यावर आक्रमण करणार नाही. (अनाक्रमणाचा करार)
- कोणताही देश दुसऱ्याच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप किंवा ढवळाढवळ करणार नाही.
- दोन्ही देश समानता आणि सामाईक लाभाचे तत्त्व पाळतील.
- दोन्ही देश शांततापूर्ण सहजीवनाचे पालन करतील.

पंडित नेहरूंच्या काळात भारताच्या संरक्षण धोरणाचा गाभा हा मुख्यत्वे 'राजनैतिक संवाद किंवा राजनयाच्या मार्गाने संरक्षण' हा होता. नव्याने स्वतंत्र झालेला भारत हा एक विकसनशील देश होता. विकासासाठी त्याला भांडवल आणि शांतता दोन्हीची आवश्यकता होती. संरक्षणावरील खर्च वाढला, तर नागरी उद्योगांच्या विकासासाठीचा पैसा त्याकडे वळवावा लागेल, अशी समजूत त्यावेळी होती. तसेच, शेजारील देशांबरोबर सततचा संघर्ष देशांतर्गत विकासासाठी पोषक नाही, अशी भावनाही त्यावेळी दृढ होती. शेजारील देश आणि आशिया-आफ्रिका खंडातील देशांबरोबर भारताचे मैत्रीपूर्ण संबंध विकसित व्हावेत, यासाठी प्रादेशिक सहकार्य आणि अलिप्ततावादाचे धोरण भारताने स्वीकारले होते. या देशांनी परस्परांच्या विकासाला मदत करावी अशी अपेक्षा त्यामागे होती. त्यामुळेच राजनय किंवा राजनैतिक संवाद हा महत्त्वपूर्ण होता. मात्र, 'राजनयाच्या माध्यमातून संरक्षण' ही भूमिका १९६२ नंतर बदलली आणि भारताने संरक्षणावरील खर्चाची तरतूद वाढवली.

## दुसरे पर्व : १९६२ ते १९७१

### आंतरराष्ट्रीय परिस्थिती

१९६० च्या दशकात शीतयुद्धाच्या स्वरूपात काही बदल झाले. १९६२ मध्ये क्युबात क्षेपणास्त्रे तैनात करण्याच्या मुद्द्यावरून सोव्हिएत रशिया व अमेरिकेत तणाव निर्माण झाला. क्युबामधील सोव्हिएत युनियनची क्षेपणास्त्रे हा आपल्यासाठी थेट धोका असल्याचे अमेरिकेने मानले. प्रत्युत्तरादाखल अमेरिकेने क्युबाची सागरी नाकेबंदी केली. १९४५ ला दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर अमेरिकी आणि सोव्हिएत रशियाच्या नौका प्रथमच एकमेकांच्या समोर उभ्या ठाकल्या. जग पुन्हा युद्धाच्या उंबरठ्यावर उभे राहिले. युद्ध झालेच, तर त्याचे अण्वस्त्रांच्या युद्धात रूपांतर होण्याचा मोठा धोका होता. त्याचे गांभीर्य लक्षात घेऊन दोन्ही महासत्तांनी तणाव निवळण्यासाठी प्रयत्न सुरू केले. सोव्हिएत रशियाने क्युबातून क्षेपणास्त्रे मागे घेतली. ही घटना इतिहासात 'क्युबन मिसाईल क्रायसिस' म्हणून ओळखली जाते. १९६२ नंतर दोन्ही महासत्तांनी त्यांच्या दरम्यानचा तणाव कमी करण्याचे प्रयत्न सुरू केले.

### भारताचे धोरण

१९६० च्या दशकात भारताच्या संरक्षणविषयक धोरणात अनेक बदल झाले. पंडित नेहरूंच्या निधनानंतर १९६४ मध्ये लालबहादूर शास्त्री प्रधानमंत्री झाले. 'जय जवान, जय किसान' या घोषणेबद्दल ते प्रसिद्ध आहेत. याच काळात चीनने पहिली अणुचाचणी केली. काश्मीरच्या प्रश्नावरून भारत-पाकिस्तान दरम्यान १९६५ मध्ये पुन्हा युद्ध झाले. या युद्धानंतर शांतता प्रस्थापित करण्यासाठी १९६६ मध्ये तत्कालीन सोव्हिएत रशियामधील ताश्कंद येथे त्रिपक्षीय परिषद झाली. सोव्हिएत रशियाच्या मध्यस्थीने भारत आणि पाकिस्तान दरम्यान शांतता करार झाला. मात्र, प्रधानमंत्री शास्त्रींचा ताश्कंदमध्येच मृत्यू झाला. त्यानंतर इंदिरा गांधी देशाच्या प्रधानमंत्री झाल्या. याच काळात पुढे १९६८ मध्ये अण्वस्त्रप्रसारबंदी करार झाला. याच पर्वात पूर्व पाकिस्तानमध्ये अंतर्गत समस्या उभ्या राहिल्या. त्यातूनच पुढे १९७१ मध्ये भारत-पाकिस्तान दरम्यान युद्ध झाले आणि स्वतंत्र बांगलादेशाची निर्मिती झाली.



ताश्कंद परिषद (१९६६) पाकिस्तानचे अध्यक्ष मोहंमद अयुब खान आणि भारताचे प्रधानमंत्री लालबहादूर शास्त्री चर्चा करताना.

**दुसऱ्या पर्वातील काही महत्त्वाच्या घडामोडी पुढीलप्रमाणे :**

(i) **भारताची युद्धसज्जता :** प्रधानमंत्री लालबहादूर शास्त्री यांनी भारताच्या धोरणाचे लक्ष्य प्रादेशिक सहकार्यावरून दक्षिण आशियातील देशांशी द्विपक्षीय संबंध दृढ करण्याकडे वळवले. सीमावर्ती भागांमध्ये रस्तेबांधणीबरोबरच भारतीय सेनादलांची क्षमता वाढवण्यावर त्यांनी आपले लक्ष केंद्रित केले. चीनबरोबरच्या १९६२ च्या युद्धाचा महत्त्वाचा परिणाम म्हणजे त्यावर देशाचे संरक्षण बळकट करण्याच्या दृष्टीने नियोजन व प्रयत्न सुरू झाले. त्यासाठी पुढील लक्ष्ये निर्धारित करण्यात आली :

अ) लष्कराचा विस्तार आणि आधुनिकीकरण

ब) हवाई दलाचे आधुनिकीकरण

क) संरक्षणसाहित्य उत्पादनाचा पाया वाढवणे

ड) सीमावर्ती भागामध्ये दळणवळण आणि दूरसंचार सुविधांचा विस्तार व विकास करणे

ई) नौदलातील जुन्या युद्धनौका बाद करून आधुनिक युद्धनौका ताफ्यात आणणे व त्यांची शक्ती वाढवणे. १९६४ मध्ये भारताची संरक्षणाची योजना आखण्यात आली, तीत देशाच्या प्रादेशिक एकात्मतेच्या रक्षणासाठी पुरेशी व सक्षम यंत्रणा उभी करण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले.

(ii) **आण्विक धोरण :** चीनने १९६४ मध्ये पहिल्यांदा अणुचाचणी केली. त्यातून भारताच्या आण्विक धोरणात मोठे बदल झाले. (या बदलांची चर्चा पुढे केली आहे.)

(iii) **१९६५ चे युद्ध :** पाकिस्तानी सैन्याने १९६५ मध्ये एकाच वेळी काश्मीर आणि कच्छच्या रणात आक्रमण केले. त्यातून युद्धाचा भडका उडाला. या युद्धात कोणालाच निर्णायक विजय मिळाला नाही. अशा स्थितीत सोव्हिएत रशियाच्या मध्यस्थीने ताश्कंद येथे भारत-पाकिस्तानदरम्यान शांतता तह झाला.

(iv) **भारत-चीन संबंध :** १९६७ मध्ये सिक्कीममधील नथु ला येथे भारत आणि चीनच्या सैनिकांदरम्यान छोटा संघर्ष झाला, तो दोन्ही देशांच्या संबंधांच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. या खिंडीत दोन्ही देशांचे सैनिक समोरासमोर उभे ठाकले, पण भारतीय सैन्याने तिचे यशस्वी रक्षण केले व ही खिंड आपल्याच ताब्यात ठेवली.

(v) **भारत व सोव्हिएत रशिया संबंध :** या पर्वात अमेरिका, सोव्हिएत रशिया आणि चीनच्या आशियासंबंधी धोरणांमध्ये फेरबदल झाले. अमेरिकेने चीनबरोबर वाटाघाटी सुरू केल्या. त्यातून अमेरिका, चीन आणि पाकिस्तान परस्परांना मदत करत असल्याचे चित्र समोर आले. त्याला प्रतिसादादाखल या काळात भारत आणि सोव्हिएत रशिया दरम्यान संरक्षण सहकार्य सुरू झाले. त्याची परिणिती म्हणून १९७१ मध्ये वीस वर्षांच्या काळासाठी भारत-रशिया दरम्यान शांतता आणि मैत्री करार झाला.

(vi) **१९७१चे युद्ध :** पाकिस्तानच्या पूर्व पाकिस्तानातील धोरणांमुळे दक्षिण आशियात मानवी संकट निर्माण झाले. पूर्व पाकिस्तानातील जनतेवर होत असलेल्या पाकिस्तानच्या अत्याचारांमुळे तेथून मोठ्या प्रमाणावर निर्वासित भारतात येऊ लागले. त्यातून १९७१ च्या डिसेंबरमध्ये भारत-पाकिस्तान दरम्यान युद्धाचा

भडका उडाला. या युद्धात पाकिस्तानचा निर्णायक पराभव झाला आणि पूर्व पाकिस्तानचे अस्तित्व संपुष्टात येऊन बांगलादेशाची निर्मिती झाली.

**(vii) सिमला करार :** १९७२ मध्ये हिमाचल प्रदेशातील सिमला येथे भारत-पाकिस्तान दरम्यान शांतता कराराचा मसुदा निश्चित करण्यासाठी परिषद झाली. त्यात भारत-पाकिस्तान दरम्यानचे सर्व प्रश्न शाश्वत शांती (दीर्घ काळ टिकणारी शांतता) आणि द्विपक्षीय संबंधांच्या चौकटीत सोडवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय झाला.



**सिमला करार (१९७२) :** पाकिस्तानचे प्रधानमंत्री झुल्फिकार अली भुट्टो आणि भारताच्या प्रधानमंत्री इंदिरा गांधी करारावर स्वाक्षरी करताना.

सन १९६२ ते १९७१ हा संक्रमणाचा काळ होता. या काळात भारताच्या सुरक्षा धोरणाचा भर राजनैतिक वाटाघाटी किंवा राजनयातून संरक्षण याऐवजी देशाचे सामरिक सामर्थ्य वाढवण्याकडे झुकला. भारत आता अलिप्ततावादाकडे केवळ शीतयुद्धापासून दूर राहण्यासाठीचे राजकीय धोरण याऐवजी संरक्षणासाठीची व्यूहनीती या दृष्टीने पाहू लागला. त्यातून अमेरिका आणि सोव्हिएत रशिया या दोघांशीही वाटाघाटी करण्याचे स्वातंत्र्य भारताला लाभले. दक्षिण आशिया हाच भारताच्या सुरक्षा धोरणाचा कळीचा मुद्दा बनला.

## तिसरे पर्व : १९७२ ते १९९१

### आंतरराष्ट्रीय स्थिती

१९७२ मध्ये अमेरिकेचे अध्यक्ष रिचर्ड निक्सन आणि सोव्हिएत रशियाच्या साम्यवादी पक्षाचे सरचिटणीस लिओनिद ब्रेझनेव्ह यांची मॉस्कोत भेट झाली. दोन महासत्तांदरम्यानच्या मॉस्को शिखरपरिषदेने शीतयुद्धाच्या काळातील तणाव शिथिल होण्यास (Détente - देतान्त) सुरुवात झाली. देतान्त म्हणजे मैत्री नव्हे, तर तणाव निवळणे. अमेरिका आणि सोव्हिएत रशियाने त्यांच्या दरम्यानचा तणाव कमी करण्याचे प्रयत्न जाणीवपूर्वक सुरू केले.

या काळातली आणखी एक महत्वाची घटना म्हणजे अमेरिका आणि चीनच्या संबंधांमध्ये झालेले लक्षणीय बदल. चीनमध्ये १९४९ मध्ये साम्यवादी क्रांती झाल्यानंतर अमेरिकेने तेथील सरकारला अद्याप मान्यता दिली नव्हती. अमेरिकेचे अध्यक्ष निक्सन यांनी १९७२ मध्ये चीनला भेट दिली. या भेटीतून चीनमधील साम्यवादी राजवटीला आपोआपच अमेरिकेची मान्यता मिळाली.

हा तणाव शिथिलनाचा काळ (देतान्त) सोव्हिएत रशियाने १९७९ मध्ये अफगाणिस्तानमध्ये लष्करी हस्तक्षेप केल्याने संपुष्टात आला. अफगाणिस्तानात साम्यवादी राजवट सत्तेवर आली. मात्र, या सरकारला देशांतर्गत मोठा विरोध होता. अफगाणिस्तानातील साम्यवादी राजवटीविरुद्ध अफगाणीस्तानी मुजाहिदिनांनी लढा पुकारला. या मुजाहिदीनांनी पाकिस्तानच्या भूमीवर आश्रय घेतला आणि त्यांना पाकिस्तान व अमेरिका या दोघांकडूनही युद्धासाठी आवश्यक ती मदत पुरवली जाऊ लागली.

एकोणीसशे ऐंशीच्या दशकाच्या उत्तरार्धात सोव्हिएत रशियामध्ये काही अंतर्गत बदल झाले. मिखाईल गोर्बाचेव्ह सोव्हिएत रशियाचे सत्ताधीश झाले आणि त्यांनी 'पेरेस्रोयका व ग्लासनोस्त' (खुलेपणा आणि पुनर्रचना) असे धोरण जाहीर करून सुधारणांचा धडाका लावला. त्याचाच एक भाग म्हणून सोव्हिएत रशियाने अफगाणिस्तानातून फौजा मागे घेण्यास सुरुवात केली.

१९८९ मध्ये सोव्हिएत रशियाची शेवटची तुकडी अफगाणिस्तानातून बाहेर पडली. ऐंशीच्या दशकाच्या उत्तरार्धात युरोपमध्येही अनेक महत्त्वाचे बदल घडले. १९८९ मध्ये पूर्व युरोपात प्रतिक्रांती घडली. ठिकठिकाणच्या साम्यवादी राजवटी स्थानिकांनी उलथून लावल्या आणि आपापल्या देशांत लोकशाही सरकारे स्थापन केली. चेकोस्लोव्हाकिया आणि युगोस्लाव्हिया या मोठ्या देशांचे विघटन झाले आणि अनेक नवे लहान देश जन्माला आले. बर्लिनची भिंत कोसळली आणि पूर्व व पश्चिम जर्मनीचे एकीकरण झाले. अंतिमतः १९९१ मध्ये सोव्हिएत रशियाचे विघटन झाले. ही साम्यवादी महासत्ताच कोसळल्याने शीतयुद्ध आपोआपच संपुष्टात आले.

### भारताचे धोरण

स्वतंत्र बांगलादेशाची निर्मिती ही दक्षिण आशियातील महत्त्वाची घटना होती. १९७१पर्यंत भारताला पश्चिम पाकिस्तान आणि पूर्व पाकिस्तान असा दोन्ही आघाड्यांवर धोका होता. भारताने आता बांगलादेशाशी घनिष्ट संबंध विकसित करण्यावर भर दिला. १९७० च्या संपूर्ण दशकात भारताने केवळ दक्षिण आशियावर लक्ष केंद्रित केले. या प्रदेशात भारत प्रमुख सत्ता म्हणून उदयाला आला. १९७४ मध्ये भारताने यशस्वी अणुचाचणी घडवून धाडसी पाऊल उचलले. १९७५ मध्ये सिक्कीमचे भारतात विलीनीकरण झाले. याच कालावधीत भारतापुढे काही अंतर्गत सुरक्षेची आव्हानेही उभी राहिली. सुरुवातीला पंजाबमध्ये आणि नंतर काश्मीरमध्ये अतिरेकी कारवायांना प्रारंभ झाला. १९८४ ला अमृतसरमध्ये खलिस्तानवादी अतिरेक्यांविरुद्ध निर्णायक कारवाई करण्यात आली. त्याच्या प्रतिक्रियेतून त्याच वर्षी प्रधानमंत्री इंदिरा गांधींची राहत्या घरी हत्या झाली. राजीव गांधी देशाचे प्रधानमंत्री झाले. त्यांच्या कारकिर्दीतच भारताच्या संरक्षण व्यवस्थेचे आधुनिकीकरण सुरू झाले. त्यांच्यानंतर विश्वनाथ प्रताप सिंह आणि चंद्रशेखर यांनी काही काळ प्रधानमंत्रीपद भूषवले. १९९१ च्या लोकसभा निवडणुकीनंतर नरसिंह राव भारताचे प्रधानमंत्री झाले.

**या पर्वातील काही महत्त्वाच्या घडामोडी :**

(i) **आण्विक धोरण :** चीनने १९६४ मध्ये आण्विक चाचणी घेतली. त्याचा भारताच्या संरक्षणाला असलेला धोका ओळखून तत्कालीन प्रधानमंत्री लालबहादूर शास्त्री यांनी भारताच्या आण्विक धोरणात पहिला महत्त्वाचा बदल केला. आण्विक शस्त्रास्त्रांना असलेला भारताचा विरोध कायमस्वरूपी नसून, शांततापूर्ण उपयोगासाठी आण्विक चाचणी घडवण्याची भारताची इच्छा आहे, असे त्यांनी जाहीरपणे सांगितले. पुढे १९७४ मध्ये भारताने पोखरण येथे पहिली अणुचाचणी केली. त्यावेळीही ही अणुचाचणी शांततामय उपयोगांसाठी आहे आणि अण्वस्त्रे विकसित करण्याचा भारताचा कोणताही इरादा नाही, असे जाहीर करण्यात आले. मात्र, या चाचणीमुळे अण्वस्त्रे बनवू शकण्याच्या भारताच्या क्षमतेचे जगाला दर्शन घडले. या चाचणीचे वर्गीकरण 'शांततामय अणुचाचणी' (पीसफुल न्युक्लियर एक्स्प्लोजन) असे करण्यात येते. याचे कारण अण्वस्त्रे बनवण्याच्या उद्देशाने नव्हे, तर शांततामय उपयोगांसाठी अणुतंत्रज्ञान क्षेत्रात संशोधनाचा मानस त्यामागे होता. आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा आयोगाची (इंटरनॅशनल ॲटोमिक एनर्जी एजन्सी – आयएईए) अणुशक्तीच्या अशा शांततापूर्ण वापराला मान्यता आहे.

(ii) **सागरी धोरण :** १९४० च्या दशकापर्यंत ब्रिटिश नाविक दलाचे हिंदी महासागर परिसरात मोठे अस्तित्व होते. १९६८ मध्ये ब्रिटनने सुएझ कालव्याच्या पूर्वेकडील नाविक दल मागे घेण्याची घोषणा केली. त्यानंतर अमेरिका आणि सोव्हिएत रशियाच्या युद्धनौकांनी हिंदी महासागरात संचार सुरू केला आणि आपले नाविक तळ उभारण्यासही सुरुवात केली. या घडामोडीला 'हिंदी महासागरात वर्चस्वासाठी स्पर्धा' असे संबोधले जाते. ब्रिटिशांनी त्यांचे आरमार हिंदी महासागरातून मागे घेतल्याने तेथे पोकळी निर्माण झाली. ती भरून

काढण्यासाठी दोन महासत्तांमध्ये चढाओढ सुरू झाली, असे स्पष्टीकरण त्यासाठी देण्यात आले. भारताचा अशा वैचारिक मांडणीला विरोध होता आणि हिंदी महासागर हे 'शांतता क्षेत्र' जाहीर करावे, अशी मागणी भारताने केली. १९७१ च्या युद्धात भारतीय नौदलाने सक्रिय भूमिका बजावली. त्यानंतर भारताला नौदलाचे महत्त्व लक्षात आले आणि नौदलाचे सामर्थ्य वाढवण्याचे प्रयत्न सुरू झाले.

(iii) **श्रीलंका :** १९७० च्या दशकात श्रीलंकेमध्ये वांशिक संघर्ष सुरू झाला. श्रीलंकेतील तामिळ आणि तेथील सरकार एकमेकांविरोधात उभे राहिले. ऐंशीच्या दशकात हा संघर्ष वाढतच गेला. श्रीलंकेतील या यादवी युद्धात भारताने मध्यस्थी करावी व शांततेसाठी प्रयत्न करावेत, अशी विनंती तेथील सरकारतर्फे करण्यात आली. त्यानुसार भारत आणि श्रीलंकेदरम्यान १९८७ मध्ये करार झाला. या करारानुसार भारताने श्रीलंकेत शांतिसेना (इंडियन पीसकिपिंग फोर्स) पाठवली.



**भारत-श्रीलंका करार (१९८७) :** भारताचे प्रधानमंत्री राजीव गांधी आणि श्रीलंकेचे अध्यक्ष ज्युनियस रिचर्ड जयवर्धने

(iv) **मालदीव :** १९८८ मध्ये मालदीवमधील सरकार उलथून लावण्याचा प्रयत्न केला गेला. त्यावेळी भारताने तातडीने सैनिकी कारवाई करून मालदीवमधील लोकनियुक्त सरकार पुन्हा स्थापित केले.

(v) **संरक्षण तंत्रज्ञान :** भारताने १९८३ मध्ये एकात्मिक क्षेपणास्त्र विकास कार्यक्रम (इंटिग्रेटेड गाईडेड मिसाईल डेव्हलपमेंट प्रोग्रॅम) सुरू केला. त्याने भारताच्या क्षेपणास्त्र तंत्रज्ञान विकासाची पायाभरणी झाली. त्याअंतर्गत उच्च तंत्रज्ञान व क्षमता असलेली विविध प्रकारची क्षेपणास्त्रे विकसित करण्यात आली. त्यामध्ये पृथ्वी, अग्नी क्षेपणास्त्रे, ध्वनीपेक्षा जास्त वेगाने प्रवास करणारी ब्राह्मोस क्रूझ क्षेपणास्त्रे, निर्भय सबसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्रे, पाणबुडीवरून मारा करता येऊ शकणारी के-४ व के-१५ बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे, हवाई हल्ल्यापासून संरक्षणासाठी जमिनीवरून आकाशात मारा करू शकणारी प्रद्युम्न व पृथ्वी क्षेपणास्त्रे, आकाशातून आकाशात मारा करू शकणारी क्षेपणास्त्रे आदींचा समावेश आहे.

(vi) **अंतर्गत सुरक्षा :** भारतातील पूर्वोत्तर राज्यांमध्ये स्वातंत्र्यापासूनच अंतर्गत बंडखोरीच्या काही समस्या होत्या. निमलष्करी दले आणि सशस्त्र सेनादले त्यांना नियंत्रणात राखण्याचे काम करत होती. मात्र, १९६० च्या दशकात नक्षलवादाच्या रूपाने नवी समस्या उभी राहिली. १९७० च्या दशकात केंद्र सरकारने विविध उपाययोजनांद्वारे ती नियंत्रित ठेवली. पुढे स्वतंत्र खलिस्तानच्या मागणीच्या स्वरूपात पंजाबमध्ये फुटीरतावादाची समस्या उभी राहिली. १९८० च्या दशकात तिने उग्र रूप धारण केले. त्यावेळी केंद्र सरकारला पंजाबमधील अतिरेक्यांविरुद्ध कठोर उपाययोजना करावी लागली. त्यानंतर काश्मीरमध्ये नव्या प्रकारचा दहशतवाद सुरू झाला. ऐंशीच्या दशकाच्या उत्तरार्धात अफगाणिस्तानातील मुजाहिदीन काश्मीरच्या खोऱ्यात घुसू लागले आणि भारतविरोधी कारवाया करू लागले.

भारत १९७१ नंतर दक्षिण आशियातील महत्त्वाची सत्ता म्हणून उदयाला आला. या पर्वात भारताने आपले सामर्थ्य टप्प्याटप्प्याने वाढवत नेले. १९७४ मध्ये भारताने केलेली अणुचाचणी शांततेसाठी होती, तरी त्यातून अण्वस्त्र बनवू शकण्याच्या भारताच्या क्षमतेचे प्रदर्शन जगाला घडले. श्रीलंका आणि मालदीवमधील मोहिमांमुळे दक्षिण आशियातील सुरक्षा आणि

स्थिरतेबद्दल भारत सजग आहे, हेही जगाला दिसले. मात्र, याच काळात भारतातील अंतर्गत समस्याही वाढल्या. पंजाबमधील दहशतवादामुळे भारतापुढे आव्हान उभे राहिले. काश्मीरमधील दहशतवादी कारवायाही या काळात वाढत गेल्या.

## पर्व चौथे : १९९१ ते आजपर्यंत

### आंतरराष्ट्रीय परिस्थिती

१९८९ ते १९९१ या काळात आंतरराष्ट्रीय पातळीवर काही महत्त्वाच्या घडामोडी घडल्या. १९८९ मध्ये पूर्व युरोपातील देशांमध्ये प्रतिक्रांती होऊन तिथल्या साम्यवादी राजवटींचा अस्त झाला. १९९० मध्ये इराकने कुवेतचा बळजबरीने ताबा घेतला. त्यातून १९९० चे कुवेत युद्ध उद्भवले. १९९१ मध्ये सोव्हिएत रशियाचे विघटन झाले. त्यातून शीतयुद्धाच्या समाप्तीवर शिक्कामोर्तब झाले.

एकोणीसशे नव्वदच्या दशकाच्या प्रारंभी शीतयुद्धोत्तर काळाचे वर्णन करण्यासाठी जागतिकीकरण (ग्लोबलायझेशन) हा शब्दप्रयोग मोठ्या प्रमाणात वापरात आला. जागतिकीकरण या शब्दाची व्याप्ती मोठी आहे. त्यात १९९१ नंतर जगात घडलेल्या आर्थिक, राजकीय, वैचारिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि तंत्रज्ञानातील बदलांचा समावेश होतो. त्यामुळेच सध्या जागतिकीकरण हा शब्द आपण शीतयुद्धोत्तर जगाचे वर्णन करण्यासाठी वापरतो. जागतिकीकरणामुळे विविध देश आणि त्यांमधील लोकांचे परस्परांशी संबंध आणि संवाद मोठ्या प्रमाणावर वाढला. मानवी इतिहासात प्रथमच जग एकमेकांशी इतक्या मोठ्या प्रमाणावर जोडले गेले, असे आपण म्हणू शकतो. विविध तंत्रज्ञानांच्या विकासाने जगाची ही 'इंटरकनेक्टिव्हिटी' वाढली.

### भारताचे धोरण

एकोणीसशे ऐंशीच्या उत्तरार्धात भारतापुढे मोठे आर्थिक संकट उभे राहिले. त्यामुळे १९९१ मध्ये प्रधानमंत्री नरसिंह राव यांनी आर्थिक उदारीकरणाच्या प्रक्रियेला सुरुवात केली. त्यातून भारताची अर्थव्यवस्था सावरली आणि तिने नवी उभारी घेतली. मात्र, १९९६ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकांमध्ये कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. त्यातून देशाला स्थिर सरकार मिळू शकले नाही. हा काळ राजकीय अस्थिरतेचा होता. या कालावधीत अटलबिहारी वाजपेयी, एच. डी. देवेगौडा, इंद्रकुमार गुजराल यांची सरकारे देशाने पाहिली. १९९८ मध्ये पुन्हा सत्तेवर आलेल्या वाजपेयी सरकारच्या काळात भारताने पोखरण येथे सलग अणुचाचण्या घेतल्या आणि भारत आता अण्वस्त्रसज्ज देश झाल्याचे जाहीर केले. १९९९ मध्ये कारगिलचे युद्ध झाले. या परिसरातली पाकिस्तानी सैन्याची घुसखोरी भारताने निपटून काढली. त्यानंतर झालेल्या निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (नॅशनल डेमॉक्रॅटिक अलायन्स-एनडीए) सरकार पुन्हा सत्तेवर आले. २००४ मध्ये सत्तांतर होऊन काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाखाली संयुक्त पुरोगामी आघाडीचे (युनायटेड प्रोग्रेसिव्ह अलायन्स- यूपीए) सरकार सत्तेवर आले. डॉ. मनमोहन सिंह देशाचे प्रधानमंत्री झाले. त्यांच्या नेतृत्वाखालील सरकारने सलग दहा वर्षे देशाचा कारभार पाहिला. याच काळात भारत-अमेरिका अणुकरारावर स्वाक्षरी झाली. त्यानंतर २०१४ मध्ये पुन्हा सत्तांतर होऊन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (एनडीए) सरकार सत्तेवर आले.

### १९९१ नंतरच्या काळात झालेले काही बदल पुढीलप्रमाणे :

(i) **भारत-अमेरिका संवाद :** संरक्षण व सामरिक क्षेत्रात भारत आणि अमेरिकेमधील संबंधांमध्ये उत्तरोत्तर सुधारणा होत गेली. नागरी अणुऊर्जा तंत्रज्ञानासंबंधी सहकार्यासाठी भारत व अमेरिकेदरम्यान झालेला अणुकरार हे त्याचे उत्तम उदाहरण आहे.

(ii) **इंडोपॅसिफिक :** इंडोपॅसिफिक क्षेत्रासंबंधात काही महत्वाचे पुढाकार घेतले गेले. पूर्व आशियायी राष्ट्रांशी जवळचे संबंध प्रस्थापीत करण्यासाठी सुरुवातीला 'लुक ईस्ट' व नंतर 'ॲक्ट ईस्ट' ही धोरणे आखली गेली.

(iii) **पाकिस्तानशी संबंध :** काश्मीरमध्ये पाकिस्तानने

पुरस्कृत केलेल्या दहशतवादी कारवायांमध्ये वाढ झाली. १९९९ मध्ये पाकिस्तानी सैन्याने कारगिल परिसरात केलेल्या घुसखोरीमुळे दोन्ही देशांमध्ये युद्ध झाले.

(iv) **बदलते सामरिक धोरण :** पाकिस्तान आणि चीन या दोन्ही देशांच्या संदर्भात भारताने आपल्या भूमिकेत बदल केला. भारताचे राष्ट्रीय संरक्षण धोरण अधिक आक्रमक आणि सक्रिय बनले. म्यानमार (२०१५), बालाकोट (२०१९); चुमार (२०१४) आणि डेमचोक (लडाख २०१४) आणि डोकलाममध्ये झालेली घुसखोरी (२०१७) व भारताचा ठाम विरोध आदी घटनांमधून भारताच्या बदललेल्या सामरिक धोरणांचे दर्शन घडले.

भारताचे संरक्षण धोरण १९९१ नंतर मोठ्या प्रमाणात बदलले. भारताने अमेरिका, इस्रायल आणि युरोपिय समुदायासमवेत घनिष्ट सामरिक संबंध प्रस्थापित करण्यास सुरुवात केली. भूतपूर्व सोव्हिएत रशियाशी भारताचे मैत्रीपूर्ण संबंध होते. त्याच्या विघटनानंतर अस्तित्वात आलेल्या रशियाशीही भारताचे चांगले संबंध कायम आहे. भारताने पाश्चिमात्य देशांशीही संरक्षण क्षेत्रात सहकार्याबद्‌दल बोलणी सुरू केली आहेत. या काळात भारताचे सुरक्षाविषयक धोरण अधिकाधिक वास्तववादी बनत गेले आणि आदर्शवादावर आधारित धोरण हळूहळू मागे पडत गेले. आर्थिक स्थैर्य आणि प्रगती, राजकीय स्थैर्य, विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात (विशेषतः आण्विक, अवकाश आणि माहिती तंत्रज्ञान) चमकदार कामगिरी आदी घटकांमुळे भारताने जागतिक राजकारणात आता महत्त्वाचे स्थान मिळवले आहे.

**शोधा आणि चर्चा करा**

भारताने म्यानमार (२०१५), बालाकोट (२०१९), चुमार (२०१४), डेमचोक (२०१४) आणि डोकलाममध्ये (२०१७) झालेली घुसखोरी यासंदर्भात आखलेल्या मोहिमा व दिलेल्या प्रत्युत्तराबद्‌दल अधिक माहिती मिळवा. या प्रत्येक मोहिमेसंबंधी टिपा लिहा आणि त्यांची वर्गात चर्चा करा.

**तुम्हांला माहीत आहे का?**

एखादा आंतरराष्ट्रीय करार केल्यानंतर तो लगेचच आपोआप लागू होत नाही. साधारणपणे आंतरराष्ट्रीय कराराच्या तरतुदी कोणत्या तारखेपासून अमलात येतील, याची निश्चित कालरेषा करारात नमूद केलेली असते. तसेच, ठराविक कालावधीपर्यंत विविध देशांनी करार स्वीकारणे व त्याला मान्यता देणे अपेक्षित असते. त्यासाठी काही वेळा किमान संख्येचेही बंधन असते.

उदाहरणार्थ, १९६८ मध्ये अण्वस्त्रप्रसारबंदी करारावर स्वाक्षऱ्या झाल्या, मात्र तो स्वीकारणाऱ्या देशांची विशिष्ट संख्या झाल्यानंतर १९७० नंतरच त्याची अंमलबजावणी सुरू झाली.

## सुरक्षा धोक्यांचे आकलन आणि व्यूहरचना यांवर एक दृष्टिक्षेप

| | १९४७-१९६२ | १९६२-१९७२ | १९७२-१९९१ | १९९१ ते आजपर्यंत |
|---|---|---|---|---|
| **सुरक्षा धोक्यांचे आकलन** | शेजारील देशांकडून पारंपरिक धोकाः पाकिस्तानवर लक्ष केंद्रित | पारंपरिक धोक्याची प्रचीती. आता पाकिस्तान व चीन दोन्हीवरही लक्ष | पारंपरिक धोके कायम. अंतर्गत सुरक्षा समस्यांमध्ये वाढ, त्याचे बंडखोरी व कमी तीव्रतेच्या संघर्षांत रूपांतर (पंजाब व काश्मीर) | धोक्यांचे स्वरूप आता जागतिक. आर्थिक स्थिती, व्यापार व तंत्रज्ञानासारख्या मुद्द्यांचे महत्त्व वाढले. दहशतवादाशी संबंधित प्रादेशिक समस्यांमध्ये वाढ. |
| **राष्ट्रीय सुरक्षेच्या व्यूहरचना आणि राष्ट्रीय सामर्थ्याचे संदर्भ** | अ) राजनैतिक वाटाघाटींद्वारा संरक्षण.<br>ब) शीतयुद्धाच्या काळातील द्विध्रुवीय लष्करी आघाड्यांच्या पार्श्वभूमीवर विकसित धोरण.<br>क) प्रादेशिक सहकार्य हे प्रमुख धोरण. (आशिया व आफ्रो-आशिया)<br>ड) राष्ट्रीय सामर्थ्य मुख्यतः सैन्यशक्तीवर अवलंबून | अ) राजनैतिक वाटाघाटींच्या मर्यादा १९६२ च्या युद्धामुळे उघड.<br>ब) राष्ट्रीय सुरक्षेसाठी लष्करी सामर्थ्य विकसित करणे अपरिहार्य असल्याची जाणीव.<br>क) दक्षिण आशियात द्विपक्षीय संबंधांना प्राधान्य.<br>ड) सैन्यशक्तीबरोबरच अर्थव्यवस्था हाही राष्ट्रीय सामर्थ्यातील महत्वाचा घटक | अ) लष्करी सामर्थ्य विकसित करण्यावरील भर कायम<br>ब) राजकीय-लष्करी व्यूहरचनेतून संरक्षणाला महत्त्व<br>क) तंत्रज्ञानाचा दुहेरी वापर या घटकाला वाढते महत्त्व<br>ड) दक्षिण आशियावर लक्ष केंद्रित करून प्रादेशिक सत्ता बनण्यावर भर<br>ई) राष्ट्रीय सामर्थ्याचे केंद्रबिंदू आता आर्थिक आणि तंत्रज्ञानाच्या क्षमता. | अ) आर्थिक उदारीकरण (१९९१) आणि भारत-अमेरिका नागरी अणुसहकार्य करार (२००८) हे महत्त्वाचे टप्पे<br>ब) तंत्रज्ञानाच्या दुहेरी वापराच्या संदर्भात लादण्यात आलेल्या निर्बंधांच्या पार्श्वभूमीवर आर्थिक व राजकीय स्थैर्य, तंत्रज्ञानातील प्रगती. या पार्श्वभूमीवर जागतिक राजकारणातील निर्णयप्रक्रियेत स्थान देण्याची भारताची मागणी<br>क) आर्थिक, लष्करी आणि तंत्रज्ञानाच्या सामर्थ्यावर संरक्षण<br>ड) केवळ दक्षिण आशियापुरते मर्यादित न राहता भारताचे परराष्ट्र धोरण जागतिक व वास्तववादी बनले.<br>ई) तंत्रज्ञान हा राष्ट्रीय सामर्थ्याचा मुख्य घटक बनला.<br>फ) पाकिस्तानपुरस्कृत दहशतवादी कारवायांसंदर्भात भारताचे आक्रमक धोरण |

## स्वाध्याय

**प्र. १ (अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.**

(i) अलिप्ततावादाचा एक मुख्य निकष .................... हा आहे.

(अ) शीतयुद्धातील लष्करी गटात सहभागी होणे.

(ब) अमेरिकेला लष्करी तळ पुरवणे.

(क) सोव्हिएत रशियाला नाविक तळ पुरवणे.

(ड) परराष्ट्र धोरणात स्वतंत्र भूमिका राखणे.

(ii) सिमला करार(१९७२) ................... यावर आधारीत होता.

(अ) बहुस्तरीय राजनयाला मान्यता

(ब) सोव्हिएत रशियाची मदत स्वीकारणे

(क) द्विपक्षीय संबंधाची तत्त्वे

(ड) अमेरिकेची मदत स्वीकारणे

**(ब) योग्य कारण देऊन वाक्ये पूर्ण करा.**

(i) भारताच्या आण्विक धोरणात प्रधानमंत्री लालबहादूर शास्त्री यांनी प्रथम बदल केले, कारण...

(ii) हिंदी महासागरात बड्या सत्तांची स्पर्धा निर्माण होण्याचे कारण...

**(क) खालील विधानाबाबत योग्य संकल्पना लिहा.**

(i) १९७० च्या दशकात अमेरिका व सोव्हिएत रशिया दरम्यानचा तणाव कमी होणे.

**(ड) गटात न बसणारा शब्द शोधा.**

(i) नथु ला, बालाकोट, चुमार, डेमचोक

**प्र. २ खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण लिहा.**

(i) १९७२ च्या मॉस्को शिखर परिषदेनंतर देतांतची प्रक्रिया सुरू झाली.

(ii) भारतात १९८३ साली क्षेपणास्त्र तंत्रज्ञानाचा पाया हा एकात्मिक मार्गदर्शित क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमाने निर्माण केला गेला.

**प्र. ३ सहसंबंध स्पष्ट करा.**

(i) शीतयुद्धकालीन लष्करी गट आणि अलिप्ततावाद.

**प्र. ४ आपले मत नोंदवा.**

(i) भारताने बालाकोटमध्ये केलेल्या कारवाईनंतर पाकिस्तानचा काश्मीरमधील दशहतवादाला असलेला पाठिंबा थांबेल का?

**प्र. ५ खालील प्रश्नाचे उत्तर लिहा.**

(i) १९९१ नंतर भारताच्या सुरक्षा धोरणामध्ये कोणते बदल झाले?

**उपक्रम**

सर्व अलिप्ततावादी शिखर परिषदांची यादी करा. प्रत्येक परिषदेत कोणते महत्वाचे मुद्दे चर्चिले गेले?

# प्रकरण २ भारताचे शेजारी: पाकिस्तान आणि चीन

भारताचे शेजारी असलेल्या पाकिस्तान आणि चीन या दोन देशांशी असलेल्या संबंधांवर या प्रकरणात लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. भारताच्या सुरक्षेला असलेल्या धोक्यांचा आपण विचार करतो, तेव्हा प्रामुख्याने हे दोन शेजारी देश आपल्या नजरेसमोर असतात. हे धोके पारंपरिक आणि अपारंपरिक असे दोन्ही स्वरूपाचे आहेत. भारताने या देशांच्या सीमांवर प्रत्यक्ष संघर्ष आणि अंतर्गत बंडखोरीच्या समस्या या दोन्हींचा अनुभव घेतला आहे. त्यात अण्वस्त्रांच्या धोक्याची भर पडल्याने भारताचे या देशांशी असलेले संबंध गुंतागुंतीचे बनले आहेत.

## पाकिस्तान

परकीय अमलातून १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला, तेव्हा ब्रिटिश भारताची भारत आणि पाकिस्तान (पूर्व व पश्चिम) अशा दोन देशांमध्ये फाळणी झाली. पाकिस्तानचे जनक मोहंमद अली जीना आणि त्यांच्या ऑल इंडिया मुस्लीम लीग पक्षाने मुसलमानांसाठी स्वतंत्र देशाची मागणी केली होती. त्यामुळे पाकिस्तान हे इस्लामिक राज्य म्हणून उदयाला आले, तर भारत धर्मनिरपेक्ष (सेक्युलर) प्रजासत्ताक बनले. ब्रिटिश भारताची फाळणी ही इतिहासातील एक अतिशय हिंसक घटना होती. पश्चिमेकडील भागात– विशेषतः पंजाबमध्ये आणि पूर्वेकडे बंगालमध्ये प्रचंड जातीय संघर्ष आणि रक्तपात झाला. या संघर्षांत दहा लाखांहून अधिक लोक मारले गेले. तसेच, लक्षावधी लोकांनी पाकिस्तानातून भारतात आणि भारतातून पाकिस्तानात असे स्थलांतर केले.

स्वातंत्र्यानंतर भारत हा लष्करीदृष्ट्या सामर्थ्यवान देश म्हणून उभा राहिला. परंतु, पाकिस्तानच्या मनात मात्र भारताबद्दलच्या भीतीने ठाण मांडले. त्यामुळे पाकिस्तानचे संरक्षण धोरण भारताचे वर्चस्व आणि ते कसे रोखायचे याभोवतीच फिरत राहिले. स्वातंत्र्यानंतरच्या सुरुवातीच्या काळात पाकिस्तानने त्यासाठी भारताविरोधात अरब देशांचे सहकार्य मिळवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्याने चीनकडे सहकार्य मागितले आणि तो अमेरिकेच्या लष्करी आघाड्यांमध्येही सहभागी झाला.

या पार्श्वभूमीवर भारत आणि पाकिस्तानदरम्यान पुढील तीन मुद्द्यांवर संघर्षाचा आपण या प्रकरणात विचार करणार आहोत:




ऑगस्ट १९९९ च्या फेररचनेपूर्वीचा जम्मू–काश्मीरचा नकाशा

(i) काश्मीर समस्या (सियाचिनचा मुद्दाही यात समाविष्ट आहे.)
(ii) पाकिस्तानपुरस्कृत किंवा सीमेपलीकडून होणारा दहशतवाद
(iii) भारत-पाक संबंधांमध्ये चीन हा घटक.

**काश्मीर समस्या**

**तुम्हांला माहीत आहे का?**

**जम्मू आणि काश्मीर**

जम्मू आणि काश्मीरच्या ईशान्येस शिंजियांग प्रांताचा उगुर (Uighur) हा स्वायत्त विभाग आहे; पूर्वेस तिबेटचा स्वायत्त प्रदेश आहे (हे दोन्ही विभाग चीनचा भाग आहेत.) दक्षिणेस भारताची हिमाचल प्रदेश व पंजाब ही राज्ये आहेत;पश्चिमेस पाकिस्तान आणि वायव्येस अफगाणिस्तानच्या सीमा आहेत.

जम्मू आणि काश्मीरच्या उत्तर आणि पश्चिमेकडील प्रदेशाला 'पाकव्याप्त काश्मीर' असे म्हटले जाते. या क्षेत्राचे तीन विभाग आहेत; पाकव्याप्त काश्मीर, गिलगिट आणि बाल्टिस्तान. गिलगिट आणि बाल्टिस्तानला आता पाकिस्तान उत्तर क्षेत्र म्हणून संबोधित करतो.

भारताच्या जम्मू आणि काश्मीर राज्याचे जम्मू, काश्मीर आणि लडाख हे तीन विभाग आहेत.
ऑगस्ट २०१९ मध्ये भारत सरकारने या राज्यांची पुनर्रचना करून दोन केंद्रशासित प्रदेश निर्माण केले-
(i) जम्मू आणि काश्मीर
(ii) लडाख

ब्रिटिशांच्या राजवटीत भारतात जम्मू आणि काश्मीर हे वंशपरंपरागत राजेशाही असलेले एक संस्थान होते. भारत आणि पाकिस्तानला स्वातंत्र्य जाहीर करताना ब्रिटिशांनी तत्कालीन संस्थानांना त्यांच्या मर्जीप्रमाणे भारत किंवा पाकिस्तानमध्ये सहभागी होण्याचा पर्याय दिला होता. मात्र, भारतीय स्वातंत्र्यानंतर लगेचच ऑक्टोबर १९४७मध्ये पाकिस्तानने जम्मू-काश्मीरवर हल्ला चढवला. त्याविरोधात महाराजा हरिसिंह यांनी भारताची मदत मागितली. भारतात जम्मू-काश्मीर विलीन करण्याच्या करारावर त्यांनी स्वाक्षरी केली. भारताने तातडीने आपले सैन्य श्रीनगरला पाठवले. या सैन्याने पाकिस्तानचा पाठिंबा असलेल्या हल्लेखोरांना रोखून धरले आणि प्रतिचढाई सुरू केली. अशा रीतीने भारत आणि पाकिस्तानदरम्यान पहिले युद्ध झाले. १९४८ मध्ये युद्धबंदी होऊन हा संघर्ष थांबला. त्यावेळी पाकिस्तानच्या ताब्यात जम्मू-काश्मीरचा एकतृतीयांश भाग राहिला. त्याला 'पाकव्याप्त काश्मीर' असे संबोधले जाते. जम्मू-काश्मीरचा उरलेला भाग भारताकडे राहिला.

भारत आणि पाकिस्तानदरम्यान १९६५ मध्ये दुसरे युद्ध झाले. मे १९६५ मध्ये कच्छच्या रणात पहारा देणाऱ्या भारतीय जवानांना शत्रू सैन्याच्या संशयास्पद हालचाली आढळल्या व त्यावरून चकमक उडाली. पाकिस्तानने सप्टेंबर १९६५ मध्ये या संघर्षाची व्याप्ती वाढवून काश्मीरमध्ये स्थानिकांच्या वेषात सैनिक घुसवले. भारताने त्याला जोरदार प्रत्युत्तर दिले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या मध्यस्थीने युद्धबंदी होऊन हा संघर्ष थांबला. त्यानंतर १९६६ मध्ये तत्कालीन सोव्हिएत युनियनमधील ताश्कंद (सध्या हे ठिकाण उझबेकिस्तानात आहे.) येथे दोन्ही देशांनी शांतता करारावर स्वाक्षरी केली.

भारत आणि पाकिस्तानदरम्यानचे तिसरे युद्ध १९७१ मध्ये झाले. त्याला पूर्व पाकिस्तानात निर्माण झालेली परिस्थिती कारणीभूत होती. पाकिस्तानातील १९७० च्या निवडणुकीत पूर्व पाकिस्तानातील अवामी लीग पक्षाला बहुमत मिळाले. परंतु, या पक्षाचे नेते शेख मुजीबुर रहमान यांना प्रधानमंत्री बनवण्यास पश्चिम पाकिस्तानातील मध्यवर्ती सरकारने नकार दिला. त्यावरून पाकिस्तानमध्ये अंतर्गत संघर्ष उफाळून आला. पूर्व पाकिस्तानातील जनतेविरोधात पाकिस्तानी सैन्याने मोठ्या प्रमाणावर अत्याचार सुरू केले. ही परिस्थिती चिघळत गेली आणि तेथून निर्वासितांचे लोंढे भारतात येऊ लागले. या पार्श्वभूमीवर पाकिस्तानी हवाई दलाने भारताच्या वायव्य सरहद्दीवरील विमानतळांवर हल्ले चढवले. भारताने त्याला प्रत्युत्तर देताच युद्धाचा भडका उडाला. भारतीय सैन्याच्या वेगवान व आक्रमक

हालचालींमुळे ढाक्यामध्ये पाकिस्तानी सैन्य शरण आले. या युद्‌धाची परिणती म्हणून १६ डिसेंबर १९७१ रोजी पूर्व पाकिस्तानच्या जागी स्वतंत्र बांगलादेशाची निर्मिती झाली. युद्‌धाच्या समाप्तीनंतर १९७२ मध्ये सिमला येथे भारत आणि पाकिस्तानदरम्यान शांतता परिषद झाली. या परिषदेत दक्षिण आशियात शांतता प्रस्थापित करण्याचे आणि दोन्ही देशांमधील वाद शांततेच्या मार्गाने आणि द्‌विपक्षीय पातळीवर सोडवण्याचे दोन्ही देशांनी ठरवले.

एकोणीसशे ऐंशीच्या दशकाच्या उत्तरार्धात काश्मीरमध्ये अंतर्गत सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला. काश्मीरमध्ये हिंसक व घातपाती कारवाया करणाऱ्या काही गटांना पाकिस्तानने नैतिक आणि राजनैतिक पाठिंबा देण्यास सुरुवात केली. काश्मीरमध्ये सीमेपलीकडून दहशतवाद घडवून आणण्याची ही सुरुवात होती. १९८९ दरम्यान काश्मीरमध्ये मोठ्या प्रमाणात राजकीय हत्या झाल्या. त्यात काश्मीरी नेते तसेच काश्मीरी पंडितांचा समावेश होता. याच दरम्यान अफगाणिस्तानातील संघर्ष संपुष्टात आल्याने तेथील मुजाहिदिनांनी आपला मोर्चा काश्मीरकडे वळवला आणि काश्मीरमध्ये धर्माच्या आधारावर संघर्ष उभा करण्याचे प्रयत्न चालवले. त्यातून काश्मीरमधील संघर्षाचे स्वरूप राजकीय स्वातंत्र्याऐवजी धार्मिक बनले. त्याचा स्थानिक जनतेवर परिणाम झाला. त्यामुळे काश्मीर खोऱ्यातून स्थानिक पंडितांना स्थलांतर करण्यास भाग पाडण्यात आले.

पुढे १९९९ मध्ये जम्मू-काश्मीरमधील कारगिल क्षेत्रात पाकिस्तानी सैनिकांनी घुसखोरी केली. प्रत्यक्ष ताबारेषेच्या अलीकडे भारतीय हद्‌दीतली काही महत्त्वाची सामरिक ठिकाणे त्यांनी बळकावली व तिथे मोर्चेबंदी केली. ही घुसखोरी लक्षात आल्यानंतर भारतीय सैन्याने प्रतिचढाई करून पाकिस्तानी घुसखोरांना तेथून हुसकावून लावले आणि मूळची प्रत्यक्ष ताबारेषा पुन्हा प्रस्थापित केली.

काश्मीरमध्ये घातपाती कारवाया करणाऱ्या विविध दहशतवादी गटांना पाकिस्तानचा पाठिंबा यापुढेही कायम राहिला. त्यातून विविध ठिकाणी दहशतवादी हल्ले झाले. २००१ मध्ये नवी दिल्लीतील संसदभवनावर लष्कर-ए-तैयबा आणि जैश-ए-महंमदच्या दहशतवाद्यांनी हल्ला केला. २००८ मध्ये काबूलमधील भारतीय दूतावासावर बॉम्बहल्ला झाला. पाकिस्तानच्या इंटरसर्व्हिसेस इंटेलिजन्स (आयएसआय) या गुप्तचर संघटनेचा त्यामागे हात असल्याचा आरोप भारताने केला. नोव्हेंबर २००८ मध्ये पाकिस्तानातून आलेल्या दहशतवाद्यांनी मुंबईतील श्री छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, लिओपोल्ड कॅफे, कामा हॉस्पिटल, ताज हॉटेल, हॉटेल ओबेरॉय ट्रायडेंट, यहुदी लोकांचे खबाड हाऊस आदी ठिकाणांवर हल्ला केला. या हल्ल्यांमध्ये १६० पेक्षा अधिक निरपराध नागरिक मारले गेले.

जानेवारी २०१६ मध्ये पठाणकोट येथील हवाई दलाच्या तळावर दहशतवाद्यांचा हल्ला झाला. त्यामागे मौलाना मसूद अजहर असल्याचा भारताला संशय आहे. या हल्ल्याची जबाबदारी पाकिस्तानातील युनायटेड जिहाद कौन्सिलने स्वीकारली. त्याच वर्षी जूनमध्ये दहशतवाद्यांनी पाम्पोर इथे केंद्रीय राखीव पोलिसांच्या बसवर हल्ला केला तर सप्टेंबरमध्ये जम्मू-काश्मीरच्या बारामुल्ला जिल्ह्यातील उरी येथील लष्करी तळावर दहशतवाद्यांनी पहाटे हल्ला केला. त्यात १८ जवान हुतात्मा झाले. पाठोपाठ नोव्हेंबरमध्ये जम्मूतील नागरोटा येथील लष्कराच्या तोफखाना दलाच्या तळावर दहशतवाद्यांनी हल्ला केला. दहशतवादी मोठ्या संख्येने काश्मीरमध्ये घुसल्याचे लक्षात आल्याने भारताने प्रतिबंधात्मक उपाय सुरू केले. सप्टेंबर २०१६ मध्ये भारतीय लष्कराने पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांच्या तळांवर लक्ष्यभेदी हल्ले (सर्जिकल स्ट्राईक) केले. १४ फेब्रुवारी २०१९ मध्ये पुलवामा येथे केंद्रीय राखीव पोलिसांच्या ताफ्यावर झालेल्या आत्मघाती हल्ल्यात ४० जवान हुतात्मा झाले. या हल्ल्यामागे पाकिस्तानातील दहशतवादी संघटना जैश-ए-महंमद असल्याचा भारताला संशय आहे. या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून २६ फेब्रुवारी २०१९ रोजी पाकव्याप्त काश्मीरमधील बालाकोट इथल्या जैशच्या प्रशिक्षण तळावर भारताने हवाई हल्ला केला.



सियाचिन

## सियाचिन संघर्ष

सियाचिन हिमनदीचा परिसर हा जगातील सर्वाधिक उंचीवरील युद्धभूमी म्हणून ओळखला जातो. ही हिमनदी लडाखच्या उत्तरेला हिमालयातील काराकोरम पर्वतरांगांमध्ये आहे. हिमनदीची एकूण लांबी अंदाजे ७८ किलोमीटर आहे. सियाचिन ही काराकोरम पर्वतराजीतील सर्वात मोठी हिमनदी आहे, तर जगातली ध्रुवीय प्रदेशातील दुसरी मोठी हिमनदी आहे. हा परिसर समुद्रसपाटीपासून अंदाजे १७,७७० फूट उंचीवर आहे. सियाचिन परिसराच्या ताब्यावरून भारत आणि पाकिस्तानमध्ये संघर्ष सुरू आहे.

सियाचिन परिसरात १९८४ पूर्वी भारत किंवा पाकिस्तान-कोणाचेही सैनिक नव्हते. भारताच्या मते १९७२ च्या सिमला करारामध्ये पाकिस्तानचा प्रदेश हा साल्टोरो पर्वतरांगापर्यंत होता. मात्र, १९८४ मध्ये पाकिस्तान हा परिसर ताब्यात घेण्याचा प्रयत्न करत असल्याची माहिती गुप्तचरांमार्फत भारताला मिळाली. परंतु, पाकिस्तानने या भागावर कब्जा करण्यापूर्वीच भारतीय लष्कराने 'ऑपरेशन मेघदूत' ही मोहीम राबवून सियाचिन परिसरावर नियंत्रण मिळवले. या भागात भारतीय लष्कर सर्वात प्रथम पोहचले आणि त्याने उंचावरील ठिकाणी मोर्चेबांधणी केली. पाकिस्तानी सैन्य कमी उंचीवर होते. हिमालयाच्या पर्वतराजीतील उंचावरची ठिकाणे ताब्यात असल्याचा सामरिक लाभ भारताला या ठिकाणी मिळतो.

## भारत-पाकिस्तानसंबंधांत चीन हा घटक

पाकिस्तान आणि चीनचे संबंध १९५०च्या दशकातच सुरू झाले. पाकिस्तान नेहमी भारताविरोधात मदत करणारा मित्र म्हणून चीनकडे बघत आला. १९५६ मध्ये या दोन देशांनी परस्परांमध्ये मैत्रीचा करार केला. भारताच्या सुरक्षेच्या दृष्टीने पाकिस्तान व चीन दरम्यानचे काही महत्त्वाचे करार व घडामोडी पुढीलप्रमाणे:

(i) पाकिस्तानने १९६३ मध्ये चीनबरोबर सीमाकरार केला. त्याअंतर्गत जम्मू-काश्मीरमधला पाकिस्तानच्या ताब्यात असलेला गिलगिट-बाल्टिस्तान क्षेत्रातील ट्रान्स-काराकोरम पट्टा नावाने ओळखला जाणारा शक्सगम खोऱ्यातला काही प्रदेश परस्पर चीनला सोपवण्यात आला.

(ii) पुढे याच प्रदेशातून चीनने काराकोरम महामार्ग बांधला. त्याला चीनमध्ये मैत्रीचा महामार्ग म्हणून संबोधले जाते. १९५९ मध्ये या महामार्गाचे बांधकाम सुरू झाले आणि १९७९ मध्ये बांधकाम पूर्ण होऊन तो सार्वजनिक वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. हा महामार्ग पाकिस्तानातील पंजाब प्रांताला खुंजरेब खिंडीतून पाकव्याप्त काश्मीरमधील गिलगिट-बाल्टिस्तान भागाला जोडतो आणि तो पुढे चीनधील शिंजियांग उगुर (Uyghur) स्वायत्त प्रदेशाला जोडतो.

(iii) पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतातील ग्वादार हे अरबी समुद्रातील एक महत्त्वाचे बंदर आहे. या बंदराच्या विकासासाठी पाकिस्तानने २००२ मध्ये चीनबरोबर करार केला. त्यातून चीनला अरबी समुद्रामार्फत आखाती प्रदेश व आफ्रिकन देशांशी वाहतुकीचा जवळचा मार्ग उपलब्ध झाला.

(iv) सन २०१५ मध्ये 'चीन-पाकिस्तान आर्थिक महामार्ग' (चायना-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉर) या महत्वाकांक्षी प्रकल्पाची सुरुवात झाली. त्यातून पाकिस्तानला मध्य आशियातील देशांशी वाहतुकीचा मार्ग सुलभ होणार आहे. ग्वादार ते काशगरला जोडणारा हा महामार्ग असणार आहे. काराकोरम महामार्ग आणि ग्वादार बंदराच्या फेर विकासाचाही त्यात समावेश आहे.




**चीन-पाकिस्तान आर्थिक महामार्ग (कॉरिडॉर)**

### चर्चा करा

पाकिस्तान व चीनदरम्यानच्या या करारांचे भारताच्या सुरक्षेवर कोणते परिणाम संभवतात?

### तुम्हांला माहीत आहे का?

पाकिस्तान-चीनमधील मैत्रीचे वर्णन तेथील नेते पुढीलप्रमाणे करतातः ही मैत्री महासागरापेक्षाही खोल आणि पर्वतांपेक्षाही उंच आहे.

चीन हा पाकिस्तानला सर्व परिस्थितीत मदत करणारा मित्र आहे, असे म्हटले जाते.

**सिमला करार, २ जुलै १९७२**

भारत-पाकिस्तानदरम्यानचा सिमला करार २ जुलै १९७२ रोजी केला गेला. त्या करारावर भारतातर्फे प्रधानमंत्री इंदिरा गांधी आणि पाकिस्तानतर्फे राष्ट्राध्यक्ष झुल्फिकार अली भुट्टो यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

सिमला कराराची निर्देशक तत्वे खालीलप्रमाणे आहेत :

- थेट द्विपक्षीय पद्धतीद्वारे सर्व मुद्द्यांचे शांततेने निराकरण करण्यासाठी परस्पर वचनबध्दता.
- लोकांच्या संपर्कावर विशेष लक्ष केंद्रित करून सहकाराच्या संबंधाची पायाभरणी करणे.
- भारत-पाकिस्तान दरम्यान सर्वात महत्वाची विश्वास बांधण्याची प्रक्रिया (Confidence Building Measures) आणि काश्मीरमधील प्रत्यक्ष ताबा रेषाही कायम ठेवणे.

**लाहोर जाहीरनामा, २१ फेब्रुवारी १९९९**

पाकिस्तानचे प्रधानमंत्री मुहम्मद नवाज शरीफ यांच्या निमंत्रणास मान देऊन भारताचे प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी यांनी २०-२१ फेब्रुवारी १९९९ दरम्यान पाकिस्तानला भेट दिली. ही भेट दिल्ली आणि लाहोर दरम्यानच्या बस सेवेचे उद्घाटनानिमित्त होती. दोन्ही नेत्यांनी सार्क दरम्यान द्विपक्षीय संबंध प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय समस्यांवर चर्चा केली. दोन्ही देशांदरम्यान शांतता आणि स्थैर्य आणि आपल्या लोकांची प्रगती, समृद्धी याबाबतची सामारिक दृष्टी यावर भर देणाऱ्या लाहोर जाहीरनाम्यावर दोन्ही नेत्यांनी २१ फेब्रुवारी १९९९ रोजी स्वाक्षऱ्या केल्या.

या जाहीरनाम्याचे मुख्य मुद्दे खालीलप्रमाणे;

- जम्मू-काश्मीरसह सर्व प्रश्न सोडवण्यासाठी गंभीर प्रयत्न करणे.
- एकमेकांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे.
- संमिश्र आणि एकात्मिक संवाद प्रक्रिया तीव्र करणे.
- अण्वस्त्रांचा अपघाती किंवा अनधिकृत वापर होण्याचा धोका कमी करण्यासाठी त्वरित पावले उचलणे. तसेच संघर्ष रोखण्यासाठी परस्पर विश्वास वाढवण्याच्या उपाययोजनांच्या संकल्पना आणि प्रक्रियांवर चर्चा करणे.
- सार्क उद्दिष्टे आणि ध्येय यांच्याबाबत कटिबद्धतेची पुष्टी करणे.
- दहशतवादाच्या सर्व रूपांचा आणि पद्धतींचा निषेध करणे आणि त्याविरुद्ध लढा देण्यास कटिबद्ध असणे.
- सर्व मानवी हक्क आणि मूलभूत स्वातंत्र्याचा प्रचार आणि संरक्षण करणे.

## चीन

भारत आणि चीनदरम्यान प्राचीन काळापासून आर्थिक व सांस्कृतिक संबंध आहेत. भारत, चीन आणि आशियातील इतर प्रदेशांतून जाणारा रेशीम मार्ग 'सिल्क रूट' हा महत्त्वाचा व्यापारी मार्ग म्हणून इतिहासप्रसिद्ध आहे. याच मार्गाने भारतातून तिबेट आणि चीनमध्ये बौद्ध धर्माचा प्रसार झाला. १९४७ मध्ये दिल्लीत झालेल्या आशियाई संबंध परिषदेत चीनने सहभाग घेतला होता. आशियातील प्रादेशिक सहकार्याच्या भूमिकेला चीनने पाठिंबा दिला आहे.

चीनमध्ये १९४९ मध्ये क्रांती घडून माओ झेडाँग यांच्या नेतृत्वाखाली साम्यवादी राजवट सत्तेवर आली. या साम्यवादी राजवटीला मान्यता देणाऱ्या पहिल्या काही देशांमध्ये भारताचा समावेश होता. १९५० मध्ये चीनने तत्कालीन सोव्हिएत युनियनबरोबर सुरक्षा करार केला आणि तो शीतयुद्धातील सोव्हिएत गटात सहभागी झाला. शीतयुद्धाच्या या पार्श्वभूमीवर १९५०च्या दशकात भारत व चीन संबंधांमध्ये तणाव होता. चीनला भारताची तटस्थ राहण्याची भूमिका फसवी वाटत होती आणि एक साम्राज्यवादी देश म्हणूनच तो भारताकडे पाहत होता. १९५० ते १९५३ दरम्यानच्या कोरियन युद्धानंतर आणि विशेषतः १९५४ मध्ये भारत-चीनदरम्यानच्या तिबेट करारानंतर चीनची भारताकडे पाहण्याची दृष्टी बदलली. मात्र, हे चित्र फार काळ टिकले नाही. १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केल्याने युद्ध झाले. त्यानंतरही दोन्ही देशांदरम्यानचे संबंध दीर्घ काळ तणावाचे राहिले. १९८०च्या दशकात भारत व चीन दरम्यान संवाद सुरू करण्याचे गंभीर प्रयत्न सुरू झाले. सध्याच्या शीतयुद्धोत्तर काळात दोन्ही देशांदरम्यान संवादाची प्रक्रिया सुरू आहे, तरीही सीमाभागात लहानमोठ्या चकमकी अधूनमधून झडत असतात. इतरही काही मुद्द्यांवर दोन्ही देशांमध्ये मतभेद आहेत.

भारत आणि चीनदरम्यान महत्त्वाचे मतभेद तिबेटची स्वायत्तता आणि सीमारेषा निश्चित करण्यावरून आहेत. त्यांचा आपण अधिक तपशीलात अभ्यास करूया.

### भारत-चीन सीमातंटा

भारत आणि चीनदरम्यान सीमाप्रदेशावरून असलेल्या तंट्याची विभागणी दोन क्षेत्रांमध्ये केली जाते : पश्चिम लडाखचा काही भाग ज्यामध्ये अक्साई चीनचा


प्रदेश येतो (पश्चिम क्षेत्र), आणि मॅकमहॉन सीमारेषा (पूर्व क्षेत्र).

अक्साई चीन हा प्रदेश जम्मू-काश्मीर राज्याचा भाग आहे. चीनने १९५० च्या दशकात तिबेट आणि सिकियांगला जोडणारा रस्ता बांधायला सुरुवात केली. हा रस्ता लडाखच्या पूर्वोत्तर भागातील अक्साई चीन प्रदेशातून जात होता. या रस्त्याचे बांधकाम पूर्ण झाल्याचे १९५७ मध्ये जाहीर करण्यात आले. भारताने त्याला हरकत घेतली. भारताने १९५८ मध्ये या प्रदेशात दोन टेहळणी पथके पाठवली. त्यातील उत्तरेकडील भागात गेलेले पथक लष्कराचे होते, तर दक्षिणेकडील पथक पोलिसांचे होते. त्यातील पोलिसांचे पथक परत आले, परंतु चीनने भारतीय लष्कराच्या टेहळणी पथकाला ताब्यात घेतले. त्यावरून संघर्षाची स्थिती उद्‌भवली. काही काळाने चीनने या पथकाला सोडून दिले. परंतु, चीनने भारतीय प्रदेशात रस्ता बांधल्याचे या पथकाच्या पाहणीतून उघड झाले.

पूर्व क्षेत्रात प्रामुख्याने अरुणाचल प्रदेशावरून दोन्ही देशांमध्ये वाद आहेत. अरुणाचल प्रदेश पूर्वी 'नॉर्थ-ईस्ट फ्रंटियर एजन्सी' (नेफा) म्हणून ओळखले जात असे. ब्रिटिशांच्या काळात १९१४ मध्ये झालेल्या सिमला करारात नेफा आणि तिबेटदरम्यानची सीमा निश्चित करण्यात आली. त्यात ब्रिटिश पथकाचे नेतृत्व करणाऱ्या सर हेन्री मॅकमहॉन यांच्या नावाने ही मॅकमहॉन सीमारेषा म्हणून ओळखली जाते. मात्र, चीनला ही सीमारेषा मान्य नसून, नेफा किंवा अरुणाचल प्रदेश त्याचा भाग असल्याचा चीनचा दावा आहे. चिनी अधिकारी या प्रदेशाचे वर्णन दक्षिण तिबेट असे करतात.

१९६२ च्या युद्धात चीनचे सैन्य मॅकमहॉन रेषा ओलांडून अरुणाचल प्रदेशात घुसले. तसेच पश्चिम क्षेत्रात त्याने अक्साई चीनचा ताबा घेतला. युद्धानंतर चीनने अक्साई चीनचा प्रदेश त्याच्याच ताब्यात ठेवला, मात्र पूर्व क्षेत्रात मॅकमहॉन रेषेपर्यंत सैन्य मागे घेतले.

१९६७ मध्ये, भारत-चीनदरम्यान संघर्ष झाला. सिक्कीममधील 'नथु ला' खिंडीच्या परिसरातील भारतीय लष्कराच्या चौक्यांवर चीनने हल्ले चढवले. मात्र, भारतीय सैन्याने त्याचा जोरदार प्रतिकार केला आणि चीनने या भागात केलेली मोर्चेबांधणी उद्‌ध्वस्त केली.




मॅकमहॉन रेषा

## तिबेट


तिबेट हा नेहमीच चीनमधील एक स्वायत्त प्रदेश म्हणून ओळखला जात होता. ब्रिटिशांनी त्यासाठीचा शब्दप्रयोग चीनचे तिबेटवर आधिपत्य (सुजरेन्टि) असा केला होता. तिथे सार्वभौमत्व (साव्हरेन्टि) हा शब्दप्रयोग प्रचलित नव्हता. भारत स्वतंत्र झाल्यानंतर हेच धोरण पुढे सुरू राहिले. भारताचे तिबेटशी अनेक शतके सांस्कृतिक आणि व्यापारी संबंध होते. मात्र, १९५०मध्ये चीनने तिबेटमध्ये सैन्य पाठवून त्या प्रदेशाचा प्रत्यक्ष ताबा घेतला.

या पार्श्वभूमीवर भारत आणि चीनने १९५४ मध्ये एक करार केला. त्याचे नाव 'तिबेटी प्रदेशातील व्यापार व इतर संबंधांबाबत भारतीय प्रजासत्ताक आणि चीन (पीपल्स रिपब्लिक ऑफ चायना) यांच्यादरम्यान झालेला करार' असे होते. या कराराची पाच महत्त्वाची तत्त्वे होती. त्यामुळे त्याला 'पंचशील करार' असेही म्हटले जाते. या करारानुसार भारताने तोवर तिबेटवर असलेले सर्व हक्क सोडले आणि तिबेट हा चीनचा एक भाग असल्याचे मान्य केले.



प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू आणि प्रधानमंत्री चौ एनलाय (१९५४)

यानंतरच्या काळात तिबेटमध्ये चीनमधील सत्ताधाऱ्यांविरोधात उठाव झाला. तो चीनने बळाने दडपला. याच काळात तिबेटी धर्मगुरू दलाई लामा तेथून निसटून ३१ मार्च १९५९ रोजी भारतात आले. त्यांना राजकीय आश्रय देण्यात आला. मात्र, तसे करताना दलाई लामा भारतात कोणत्याही राजकीय कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार नाहीत किंवा त्यांचे आयोजन करणार नाहीत, असे आश्वासन घेण्यात आले. यानंतरही तिबेटमध्ये चिनी धोरणांविरोधात असंतोष सुरूच राहिला.



१९५९ मध्ये भारतात प्रवेश केलेले दलाई लामा (१४ वे)

भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेचे प्रश्न प्रामुख्याने पाकिस्तान आणि चीनशी संबंधित आहेत. या दोन्ही देशांशी असलेल्या भारताच्या सीमांबद्दल वाद सुरू आहेत. तसेच, या दोन देशांच्या वाढत्या सामरिक संबंधांबद्दलही भारताला चिंता वाटते. पाकिस्तानला त्याची अण्वस्त्रे व क्षेपणास्त्रे विकसित करण्यास चीनने मदत केली आहे. पाकव्याप्त काश्मीरमध्ये विशेषतः गिलगिट-बाल्टिस्तान भागात असलेले चीनचे अस्तित्व भारताला चिंता उत्पन्न करणारे आहे. चीन पाकिस्तान आर्थिक महामार्गाच्या निमित्ताने या परिसरात चीनच्या मोठ्या हालचाली सुरू असतात.

भारताने या दोन्ही देशांदरम्यान संबंध चांगले राखण्यासाठी वेळोवेळी संवाद किंवा राजकीय वाटाघाटींचे प्रयत्न केले आहेत. भारताने चीनबरोबर आपले आर्थिक संबंध वाढवण्याचा नेहमीच प्रयत्न केला आहे. मात्र, सीमाभागात अधूनमधून होणाऱ्या कुरबुरी व चकमकींमुळे त्यात विघ्न येते. पाकिस्तानच्या बाबतीत सांगायचे तर जम्मू-काश्मीर आणि पंजाबमध्ये पाकिस्तान घातपाती कारवाया व दहशतवाद्यांना देत असलेले प्रोत्साहन भारतासाठी चिंतेचा विषय आहे.

### तुम्हांला माहीत आहे का?

**भारत-चीनदरम्यान सीमाविषयक करार**

**जम्मू-काश्मीरमधील लडाखच्या प्रदेशाबाबत :** सन १८४२ मध्ये तत्कालीन काश्मीरमधील राजवट आणि चीनचे सम्राट, तसेच तिबेटची राजधानी ल्हासा येथील सर्वोच्च धर्मगुरू लामा यांच्या दरम्यान करार झाला. त्यात लडाख आणि तिबेटदरम्यानच्या सीमा निश्चित करण्यात आल्या. चीनच्या सरकारने १८४७ मध्ये हे मान्य केले की या करारानुसार आखलेल्या सीमा पुरेशा स्पष्ट आणि ठळक आहेत.

**सिक्कीम :** सिक्कीम भारतात सामील होण्यापूर्वी भारताच्या संरक्षणाखाली होते. १८९० मध्ये झालेल्या एका करारानुसार सिक्कीम आणि तिबेट यांच्या सीमा ठरवण्यात आल्या आणि त्यानुसार १८९५ मध्ये प्रत्यक्ष भौगोलिक सीमारेषांची आखणी करण्यात आली.

**मॅकमहॉन सीमारेषा :** भूतानच्या पूर्व बाजूला असलेली ही सीमा भारत, चीन आणि म्यानमार (तत्कालीन ब्रह्मदेश) यांच्याशी संलग्न आहे. सिमला येथे १९१३-१४ मध्ये झालेल्या एका त्रिपक्षीय परिषदेत चीन, तिबेट आणि भारत अशा सरकारांचे आधिराजदूत असलेल्या प्रतिनिधींनी या सीमारेषेला मान्यता दिली.

**भारत-चीन दरम्यानच्या प्रत्यक्ष ताबारेषेवर शांतता आणि स्थैर्य राखण्यासंबंधी करार (७ सप्टेंबर १९९३) :** सीमांचे निश्चितीकरण होईपर्यंत सीमा भागात सुरक्षा राखण्यासाठी या करारामध्ये एक आराखडा तयार करण्यात आला. त्यात दोन्ही देशांनी मैत्रीचे आणि सलोख्याचे संबंध ठेवण्यासाठी लष्करी तैनातीत कपात करण्याचे मान्य केले गेले. तसेच सैन्याच्या हालचालींबाबत एकमेकांना कळवणे आणि परस्पर विश्वास दृढ करण्याबाबत उपाययोजना करणे, अशा मुद्द्यांचा समावेश केला गेला.

See the following websites for additional details:

1. Briefs of Foreign Relations, Ministry of External Affairs, Government of India.https://mea.gov.in/foreign-relations.htm
2. Annual report, Ministry of Defence, Government of India (latest available) https://mod.gov.in/sites/default/files/AR1718.pdf

## स्वाध्याय

**प्र. १ (अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.**

**(i)** जम्मू काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग तेव्हा झाला, जेव्हा.........

(अ) काश्मीरच्या महाराजांनी पाकिस्तान विरुद्धच्या युद्धात युद्धबंदी जाहीर केली.

(ब) १९४७-४८ च्या युद्धात भारताने पाकिस्तानचा पराभव केला.

(क) काश्मीरच्या महाराजांनी काश्मीरच्या विलीनीकरणाच्या करारावर सह्या केल्या.

(ड) १९४७-४८ च्या युद्धात भारतीय लष्कराने काश्मीरच्या महाराजांचा पराभव केला.

**(ii)** पंचशील हा ............. या कराराचा भाग आहे

(अ) १९१४ चा सिमला करार

(ब) १९५४ चा तिबेट करार

(क) १९६६ चा ताश्कंद करार

(ड) १९७२ चा सिमला करार

**(ब) योग्य कारण देऊन वाक्य पूर्ण करा.**

(i) काश्मीरच्या एका भागाला 'पाकव्याप्त काश्मीर' असे म्हटले जाते.

(ii) दलाई लामा यांना भारतात आश्रय दिला गेला.

**(क) गटात न बसणारा शब्द शोधा.**

(i) साल्टोरो पर्वतरांग, शस्कगम खोरे, खुंजेराब खिंड, नथु ला.

**प्र. २ खालील विधान चूक की बरोबर ते सकारण सांगा.**

**(i)** नेफा (NEFA) आणि तिबेट यांच्या दरम्यानची सीमारेषा १९१४ च्या सिमला करारात निश्चित करण्यात आली.

**प्र. ३ सहसंबंध स्पष्ट करा.**

**(i)** मॅकमहॉन रेषा आणि तिबेट

**(ii)** खुंजेराब खिंड आणि मैत्री महामार्ग

**प्र. ४ खालील प्रश्नाचे उत्तर द्या.**

**(i)** भारत आणि चीन यांच्यातील सीमावादावर टीप लिहा.

**प्र. ५ दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सविस्तर उत्तर लिहा.**

**(i)** काश्मीर समस्या ही भारत-पाकिस्तान यांच्यातील वादाचा मुद्दा आहे.

(अ) १९४७-४८ चे युद्ध (ब) १९६५ चे युद्ध

(क) १९७१ चे युद्ध

**उपक्रम**

जम्मू-काश्मीरच्या नकाशाचा अभ्यास करा. पाकव्याप्त काश्मीरच्या नकाशाचा अभ्यास करा. भूराजकीय विभाग शोधा आणि त्याच्या महत्त्वाबाबत वर्गात चर्चा करा.

# प्रकरण ३ — भारत आणि आशिया

आधीच्या प्रकरणात भारताचे पाकिस्तान व चीनशी असलेले संबंध आपण अभ्यासले. दक्षिण आशियातील आंतरराष्ट्रीय व्यवहारांमध्ये पाकिस्तानचे वर्णन 'भागीदार' आणि 'वाटाघाटी करणारा' (बार्गेनर) देश असे केले जाते. याचे कारण दक्षिण आशियावर प्रभाव टाकू शकेल इतके पाकिस्तानचे सामर्थ्य नाही; मात्र त्याला लहान म्हणूनही गणता येत नाही. या प्रकरणात आपण दक्षिण आशियातील इतर लहान देशांशी भारताचे असलेले संबंध अभ्यासणार आहोत. त्यात अफगाणिस्तान, नेपाळ, भूतान, बांगलादेश, श्रीलंका आणि मालदीव यांचा समावेश होतो. प्रादेशिक सत्तासमतोल किंवा आंतरराष्ट्रीय व्यवहारांमध्ये मोठ्या सत्तेला उपद्रव निर्माण करू शकणारे देश म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

या देशांच्या पलीकडे आपण भारताचा विस्तारित शेजार पाहिला तर त्यात पश्चिम आणि पूर्व आशियातील देशांचा समावेश होतो. पश्चिम आशियासंदर्भात भारताच्या सुरक्षा धोरणाकडे पाहिल्यास लक्षात येते की, भारताचे पॅलेस्टाईनशी संबंध आहेत, तसेच गेल्या काही वर्षांत इस्रायलशीही घनिष्ट सामरिक संबंध निर्माण झाले आहेत. भारताचे इराणसमवेत चांगले संबंध आहेत आणि एकूणच अरब जगताशी सतत संवाद सुरू असतो. खनिज तेल हा या सर्व संबंधांमधला एक महत्त्वाचा घटक आहे. पूर्व आशियाच्या संदर्भात विचार करता, भारत आसियानचा (रिजनल फोरम) आणि बिमस्टेकचाही (BIMSTEC) सदस्य आहे. भारताने व्हिएतनामशी चांगले संरक्षण संबंध प्रस्थापित केले आहेत, तसेच जपान आणि ऑस्ट्रेलिया या देशांशीही सुरक्षा संबंध विकसित करण्यावर भारताने लक्ष केंद्रित केले आहे.

या देशांसमवेत भारताच्या असलेल्या संबंधांवर आपण आता नजर टाकूया.




दक्षिण आशिया

## ऐतिहासिक पार्श्वभूमी

स्वातंत्र्यापूर्वी आशियातील इतर देशांकडे ब्रिटिश जसे पाहत होते, त्याचा परिणाम भारताच्या या देशांशी संबंधांवर स्वातंत्र्यानंतरही झाला. ब्रिटिशांचे सुरक्षा धोरण त्यांना त्यांच्या दृष्टीने भारतातील त्यांच्या राजवटीला असलेल्या धोक्यांच्या आकलनावर अवलंबून होते. उदाहरणार्थ, त्यांना वायव्य सरहद्दीवर झारच्या नियंत्रणाखाली असलेल्या रशियाची व नंतर सोव्हिएत रशियाची भीती वाटत असे. उत्तरेकडून चीन आणि पूर्वेकडे फ्रेंचांच्या ताब्यात असलेल्या वसाहतींकडून आक्रमणाचा धोका त्यांना वाटत असे. त्यावर मात करण्यासाठी ब्रिटिशांनी 'विस्तारित सरहद्द' (एक्स्टेंडेड फ्रंटियर) अशी संकल्पना विकसित केली.

विस्तारित सरहद्द म्हणजे काय? या धोरणाचा अर्थ प्रत्यक्ष सीमेला असलेला धोका त्यापासून होता होईल तेवढा दूर ठेवायचा. त्यानुसार ब्रिटिशकालीन भारताची वायव्य सरहद्द इराण-अफगाणिस्तानची सीमा होती. ब्रिटिशांनी भारत आणि अफगाणिस्तानदरम्यानची सीमा निश्चित केली. तिला 'ड्युरंड सीमारेषा' असे म्हणतात. त्यामुळे अफगाणिस्तान हे ब्रिटिशांच्या दृष्टीने भारत आणि रशियादरम्यानचे मध्यगत राज्य (बफर स्टेट) बनले. उत्तरेकडे ब्रिटिशांनी नेपाळ, भूतान आणि सिक्कीम यांच्याशी करार केले. तिबेटचा स्वायत्त प्रदेश हा त्यांच्या दृष्टीने भारत आणि चीनदरम्यानचा मध्यगत प्रदेशच होता. पूर्वेकडे ब्रिटिशांनी बर्मावर (म्यानमार) नियंत्रण मिळवले. थायलंड हे त्यांच्या दृष्टीने ब्रिटिश भारताचे व फ्रेंचांच्या इंडोनेशियातील साम्राज्यापासून बचावाच्या मध्यगत प्रदेश बनला. हिंदी महासागराचा विचार करता ब्रिटिशांनी पश्चिमेकडे सुएझ कालवा, दक्षिणेकडे मॉरिशस व केप ऑफ गुड होपचे किनारे आणि पूर्वेकडे सिंगापूर, मलाया आणि जावा प्रदेशावर आपले नियंत्रण राखले.

ब्रिटिशांच्या या प्रदेशावर असणाऱ्या नियंत्रणाचे दोन अर्थ निघत असत. पहिला म्हणजे या प्रदेशाच्या सुरक्षाविषयक गरजा सांभाळण्याची जबाबदारी ब्रिटिशांवर असे. त्यामुळे या प्रदेशावर इतर शत्रूंनी आक्रमण केल्यास किंवा त्यांच्याकडून धोका वाटल्यास ब्रिटिशांनी त्यांचे संरक्षण करणे अपेक्षित होते. दुसरी बाब म्हणजे या देशांचा भारताच्या सुरक्षेला धोका उत्पन्न होत नाही, तोवर ब्रिटिश त्यांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करीत नसत.

त्यामुळे भारताच्या आशियातील इतर लहान देशांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात ब्रिटिशांच्या या प्रभावाचे प्रतिबिंब आपल्याला दिसते. श्रीलंका, नेपाळ, भूतान आणि सिक्कीम या देशांकडे भारत विस्तारित सरहद्द म्हणूनच पाहत असे. त्यामुळे या देशांच्या सुरक्षेची व त्यांच्या हितसंबंधांना असलेले धोके निवारण्याची जबाबदारी भारतावर आली. मात्र, पाकिस्तानच्या (पूर्व व पश्चिम) निर्मितीमुळे अफगाणिस्तान हा भारताची विस्तारित सरहद्द बनू शकला नाही.

या पार्श्वभूमीवर आशियातील लहान देशांच्या संदर्भात भारताचे सुरक्षाविषयक धोरण आपण पाहूया.

## नेपाळ



नेपाळचे संसदभवन, काठमांडू

### तुम्हांला माहीत आहे का?

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात हिमालयाच्या प्रदेशातील लहानसहान गोरखा राज्ये एकत्र येऊन नेपाळमध्ये त्यांची राजेशाही प्रस्थापित झाली. ब्रिटिश आणि नेपाळ दरम्यान १८१४-१६ मध्ये युद्ध झाले. त्यानंतर झालेल्या तहात ब्रिटन आणि नेपाळच्या संबंधांचा

पाया रचला गेला. १९५१ मध्ये नेपाळच्या राजाने स्वतःचे मंत्रिमंडळ बनवले आणि विविध राजकीय पक्षांना त्यात स्थान दिले. नेपाळमध्ये १९९६मध्ये माओवाद्यांनी उठाव केला. २००१मध्ये नेपाळच्या राजपुत्रानेच राजघराण्यातील सदस्यांची हत्या केली. २००७ मध्ये नेपाळने नवी राज्यघटना स्वीकारली आणि नेपाळमधील राजेशाही कायमची नष्ट होऊन तिथे संघराज्यात्मक लोकशाही प्रजासत्ताक अस्तित्वात आले. तेव्हापासून तेथील जनता नेपाळचा अध्यक्ष निवडून देऊ लागली.

भारत आणि नेपाळदरम्यान मैत्री आणि सहकार्याचे संबंध वैशिष्ट्यपूर्ण आहेत. या देशांदरम्यानची सीमा खुली असून, जनतेमध्ये दृढ सांस्कृतिक संबंधांच्या आधारावर आदानप्रदान होते. दोन्ही बाजूचे लोक सहजपणे सीमा ओलांडून ये-जा करू शकतात. नेपाळच्या सीमेची एकूण लांबी १७५१ किलोमीटर आहे. दक्षिणेकडे सिक्कीम, पश्चिम बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड या पाच राज्यांच्या सीमांना ती स्पर्श करते, तर उत्तरेकडे ती चीनच्या तिबेट प्रदेशाला लागून आहे.

भारताचे नेपाळविषयीचे धोरण ठरवताना साधारण पुढील बाबींचा विचार होतोः

(i) कोणत्याही सागरी सीमा नसल्याने नेपाळ हा चोहोबाजूंनी जमिनीने वेढलेला प्रदेश (भूवेष्टित) बनला आहे. भारत आणि चीन या दोन मोठ्या देशांमध्ये आहे. नेपाळमधील महत्त्वाचे व्यापारी मार्ग भारताच्या बाजूने आहेत. हिमालयाच्या उत्तुंग पर्वतराजीत उगम पावणाऱ्या नद्याही दक्षिणवाहिनी असून, त्या नेपाळमधून भारतात प्रवेश करतात.

(ii) भारत आणि नेपाळला समान सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा लाभला आहे. त्यामुळेच दोन्ही देशांमधील सांस्कृतिक संबंध अतिशय जिव्हाळ्याचे आहेत.

भारत आणि नेपाळ दरम्यान १९५०मध्ये झालेल्या मैत्री व शांतता कराराने दोन्ही देशांच्या विशेष संबंधांची पायाभरणी केली. भारत स्वतंत्र झाला, तेव्हा जगभर शीतयुद्धाची स्थिती होती. १९४९ मध्ये चीन हा साम्यवादी देश बनला आणि त्याने तिबेटवर कब्जा केला. त्यावेळी नेपाळ संबंधात भारतीय संसदेत बोलताना पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले की, नेपाळच्या बाबतीत काही चुकीचे घडल्यास त्याने भारताच्या संरक्षणालाही धोका निर्माण होऊ शकतो. दोन्ही देशांदरम्यानच्या मैत्री व शांतता करारामध्ये याचे प्रतिबिंब उमटले. नेपाळ त्याच्या संरक्षणासाठी भारताच्या मदतीने आणि भारतीय प्रदेशातून शस्त्रास्त्रे आणि दारूगोळ्याची आयात करू शकतो, असेही या तहात नोंदवण्यात आले आहे. परकीय आक्रमणापासून कोणालाही धोका उत्पन्न झाला तर दुसरा देश ते सहन करणार नाही, असेही त्यात नोंदवण्यात आले. या प्रदेशात नेपाळचा चीन हाच दुसरा शेजारी असल्याने त्यापासून नेपाळच्या संरक्षणाची जबाबदारी आपोआपच भारताने घेतली.

तरीही नेपाळसमोर एक प्रकारचे व्दंव्द आणि समस्या उभी राहिली. भूराजकीय दृष्टिकोनातून नेपाळ हा त्याच्या अस्तित्वासाठी भारतावर अवलंबून आहे. मात्र, त्याला स्वतःचीही स्वतंत्र ओळख प्रस्थापित करावयाची होती. त्यामुळे नेपाळने १९६०मध्ये चीनबरोबरही मैत्री आणि शांततेचा तह केला. त्यातून भारत व नेपाळ संबंधांत ताण निर्माण झाला. १९७५ मध्ये नेपाळने स्वतःला शांतता क्षेत्र जाहीर केले. भारताबरोबर आपले संबंध विविधांगी आणि दृढ असले, तरी चीनबरोबरही आपले जिव्हाळ्याचे व मैत्रीचे संबंध आहेत, असे नेपाळने सांगितले. या मागे भारतावरचे आपले अवलंबित्व कमी करण्याची नेपाळची इच्छा स्पष्ट दिसत होती. त्यानंतर १९९०च्या दशकात नेपाळच्या ग्रामीण भागात माओवादी चळवळ उभी राहिली आणि नंतर ती संपूर्ण नेपाळभर पसरली. त्यातून भारत व नेपाळ संबंधांमध्ये वितुष्ट निर्माण झाले. नव्या शतकात नेपाळमधला माओवाद्यांच्या प्रभाव वाढला आणि त्यांनी तेथे सत्ता स्थापन केली. याचा नेपाळच्या भारताबरोबरील संबंधांवर निश्चितच परिणाम झाला.

तरीही भारत आणि नेपाळने परस्परांच्या सुरक्षाविषयक बाबींवर संयुक्तपणे तोडगा काढण्यासाठी संस्थात्मक यंत्रणा उभी केली आहे. दोन्ही देशांच्या गृहसचिवांची ठराविक काळाने चर्चा होते. सीमेवरून निर्माण होऊ शकणाऱ्या तणावांचा निचरा करण्यासाठी सीमा व्यवस्थापनासाठी संयुक्त कृतीगट आणि सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये समन्वय समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

भारत-नेपाळदरम्यानचे संरक्षण क्षेत्रातील संबंधही विविधांगी आहेत. नेपाळच्या लष्कराला शस्त्रास्त्रांचा पुरवठा आणि प्रशिक्षणासाठी भारत मोठ्या प्रमाणावर मदत करतो. दोन्ही देशांमधील नेत्यांच्या परस्पर भेटीबरोबरच नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी सहकार्य, संयुक्त लष्करी सराव, हिमालयातील संयुक्त साहसी मोहिमांच्या माध्यमातून हे संबंध निकोप राहिले आहेत. नेपाळी लष्कराच्या अधिकाऱ्यांना भारतात प्रशिक्षण दिले जाते. त्याचबरोबर भारत-नेपाळ दरम्यान 'सूर्यकिरण' या नावाने बटालियन पातळीवरचा युद्धसराव वर्षातून दोन वेळा केला जातो.

दोन्ही देशांमधील चांगल्या लष्करी संबंधांचे प्रतीक म्हणून १९५० पासून दोन्ही देशांच्या लष्करप्रमुखांना एकमेकांच्या प्रदेशात मानद सेनानायकाचा म्हणजे जनरलचा सन्मान दिला जातो. भारतीय लष्करातल्या गोरखा रेजिमेंटसाठी नेपाळच्या पहाडी जिल्ह्यांमधून सैनिकभरती केली जाते. भारतीय लष्करात सध्या नेपाळमधले ३२ हजार गोरखा जवान कार्यरत आहेत.

## भूतान



थिंपू येथील राजवाडा

**तुम्हांला माहीत आहे का?**

भारत आणि भूतानदरम्यान १९४९ मध्ये झालेल्या मैत्री व सहकार्य कराराने दोन्ही देशांच्या संरक्षण व परराष्ट्र संबंधांची पायाभरणी झाली. २००५ मध्ये भूतानचे राजे जिग्मे सिंग्ये वांगचूक यांनी भूतानच्या राज्यघटनेचा मसुदा जाहीर केला.

भारत आणि भूतानदरम्यानचे विशेष संबंध परस्पर विश्वास आणि समजुतीच्या पायावर उभे आहेत. या द्विपक्षीय संबंधांची मूलभूत चौकट १९४९ मधील मैत्री आणि सहकार्य कराराने निश्चित करून दिली आहे. या कराराने दोन्ही देशांना शांतता राखण्याचे आणि परस्परांच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. भूतानचे परराष्ट्र धोरण सामान्यपणे भारताने आखून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या आधारे चालते. परराष्ट्र आणि संरक्षण व्यवहारांमध्ये दोन्ही देश परस्परांचा सल्ला घेतात.

२००७ मध्ये भारत आणि भूतानने त्यांच्या दरम्यानच्या कराराचा फेरविचार केला आणि त्यातील भूतानचे परराष्ट्र धोरण भारताच्या मार्गदर्शनानूसार चालेल, हे कलम रद्द करण्यात आले. मात्र, त्यानंतरही थिंपूचे राज्यकर्ते भारताशी समन्वयानेच त्यांचे परराष्ट्र संबंध आखत राहिले. २००८मध्ये भूतानमधील राज्यघटनेनुसार तेथे पहिल्यांदा संसदीय निवडणुका झाल्या.

भारत आणि भूतानदरम्यानची सीमा ६९९ किलोमीटर लांब आहे. सीमारेषेवर भारताच्या बाजूने सशस्त्र सीमा बलाचा (SSB) आणि भूतानच्या बाजूने रॉयल भूतानीज् आर्मीचा पहारा असतो. भारताच्या पूर्वोत्तर राज्यांमध्ये घातपाती कारवाया करणाऱ्या गटांचे तळ मुख्यतः आसामच्या सीमेला लागून आहेत. अशा अतिरेकी गटांविरोधात कारवाईसाठी भारत आणि भूतानने २००३ मध्ये संयुक्त मोहीम राबवली होती. भूतानच्या लष्कराने त्यांच्या प्रदेशातील बंडखोरांविरोधात कारवाई केली. त्यावेळी हे बंडखोर सीमा ओलांडून भारतात येणार नाहीत, याची दक्षता भारताने घेतली.

डोकलाममध्ये चीनच्या सैन्याविरोधात भारताने घेतलेल्या ठाम भूमिकेच्या वेळी भारत–भूतान संरक्षण सहकार्याचे अनोखे दर्शन घडले. डोकलामचे पठार भारत, चीन आणि भूतानच्या सीमांवर आहे. चीन आणि भूतानदरम्यान या पठारांच्या नियंत्रणावरून वाद आहेत. २०१७ मध्ये चिनी सैन्याने या भागात रस्तेबांधणीचे प्रयत्न चालवले. त्याला भारतीय लष्कराने हरकत घेतली. भारतीय लष्कर भूतानच्या मागे ठामपणे उभे राहिले. यातून संघर्षाची स्थिती (स्टॅन्डऑफ) निर्माण झाली. त्यातून भारत संकटाच्या प्रसंगी आपल्या मित्रांच्या पाठीशी ठामपणे उभा राहतो, असा संदेश संपूर्ण जगाला गेला.

## बांगलादेश



संसदभवन ढाका

**तुम्हांला माहीत आहे का?**

भारताची १९४७ मध्ये फाळणी झाली, तेव्हा पूर्व आणि पश्चिम पाकिस्तान निर्माण झाले. पूर्व पाकिस्तानला अधिक स्वायत्तता देण्यात यावी, अशी तिथल्या जनतेची मागणी होती. त्यावरून पूर्व व पश्चिम पाकिस्तानमध्ये तणाव निर्माण झाला. त्यातून पूर्व पाकिस्तानात बंगाली अस्मितेच्या आधारावर स्वातंत्र्याची चळवळ सुरू झाली. या चळवळीचे नेतृत्व अवामी लीग पक्षाने केले. भारताचा त्याला काही प्रमाणात पाठिंबा होता. त्यातून १९७१ च्या युद्धात स्वतंत्र बांगलादेशाची निर्मिती झाली. शेख मुजीबूर रेहमान बांगलादेशाचे संस्थापक हे पहिले राष्ट्राध्यक्ष झाले.

डिसेंबर १९७१ च्या युद्धात बांगलादेश मुक्तीनंतर त्याला स्वतंत्र व वेगळा देश म्हणून मान्यता देणारा भारत हा पहिला देश होता. भारताने लगेचच बांगलादेशाबरोबर राजनैतिक संबंध प्रस्थापित केले. या दोन्ही देशांचे संबंध इतिहास आणि समान सांस्कृतिक व भाषिक वारशावर आधारित आहेत. भारताच्या बांगलादेशाशी असणाऱ्या संबंधांना भूराजकीय वास्तवाचे भक्कम परिमाण आहे. बांगलादेश तीन बाजूंनी भारताने वेढलेला आहे. त्याच्या आग्नेय बाजूला म्यानमार आणि दक्षिणेला बंगालचा उपसागर आहे. बांगलादेशाची सुरक्षा आणि एकात्मता यात आपले महत्त्वाचे हितसंबंध गुंतलेले असल्याचे भारताने वेळोवेळी स्पष्ट केले आहे.

भारताने १९७२ मध्ये बांगलादेशाबरोबर मैत्री करार केला. ही द्विपक्षीय संबंधांची सुरुवात होती. या करारात असे स्पष्ट करण्यात आले की, दोन्ही देश एकमेकांविरोधातल्या कोणत्याही लष्करी आघाडीत सहभागी होणार नाहीत. बांगलादेशाला त्याच्या सैन्याच्या उभारणीतही भारताने मदत केली. हेलिकॉप्टर्स, वाहतुकीसाठीची विमाने, गस्तीनौका असे साहित्य भारताने त्याला उपलब्ध करून दिले.

१९७५मध्ये बांगलादेशाचे नेते शेख मुजीबुर रहमान यांची हत्या झाली. त्यानंतर सत्तेवर आलेल्या सरकारने बांगलादेश हा इस्लामी प्रजासत्ताक असल्याचे जाहीर केले.

बांगलादेशाच्या निर्मितीनंतर तेथील अवामी लीगच्या सरकारपुढेही काही आव्हाने उभी राहिली. १९७५ मध्ये तिथल्या लष्कराने उठाव करून सरकार उलथवून टाकले. त्यानंतरही बांगलादेशात अस्थिर वातावरण व हिंसक संघर्ष सुरू राहिला. अखेर १९७८मध्ये बांगलादेशातील लष्कराच्या पाठिंब्यावर सरकार स्थापन झाले. १९९१ मध्ये बांगलादेशात निवडणुका होऊन लोकनियुक्त सरकार सत्तेवर आले. तेव्हापासून तेथे बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टी आणि अवामी लीग हे पक्ष आलटून पालटून सत्तेवर आहेत.

भारत आणि बांगलादेशादरम्यान वादाचे काही मुद्दे पुढीलप्रमाणे:

(i) भारताने हुगळी नदीचा पाणीपुरवठा वाढवण्यासाठी फराक्का बंधारा बांधण्याच्या निर्णयावर बांगलादेशाने टीका केली. त्यामुळे बांगलादेशाला गंगेच्या पाण्यातील योग्य वाटा मिळत नाही. त्यामुळे उन्हाळ्यात पाण्याची टंचाई होते, तर पावसाळ्यात जादा पाण्याच्या विसर्गामुळे पुराचे संकट निर्माण होते, असा बांगलादेशाचा आरोप आहे. या समस्येवर मार्ग काढण्यासाठी दोन्ही देशांदरम्यान १९७७ मध्ये पहिल्यांदा करार झाला. तो संपुष्टात आल्यानंतर १९९६ मध्ये भारत आणि बांगलादेशादरम्यान गंगा पाणीवाटप करार करण्यात आला.



फराक्का बंधारा

(ii) बांगलादेशातील काही भाग व गावे पश्चिम बंगालने वेढलेली होती. त्यावर उपाय म्हणून भारताने १९९२ मध्ये बांगलादेशाला या प्रदेशांशी संपर्कासाठी तीन बिघा कॉरिडॉर उपलब्ध करून दिला. सन २०१५ मध्ये झालेल्या भारत–बांगलादेश भूसीमा करारात भारत आणि बांगलादेशाने परस्परांच्या भूभागाने वेढलेल्या भागांचे आदानप्रदान केले आणि दोन्ही देशांदरम्यानचा नकाशा नव्याने आखून घेतला.

(iii) गंगानदीच्या मुखाशी असलेल्या सुंदरबन भागातील न्यू मूर आयलँड या निर्जन बेटावर भारत आणि बांगलादेश दोघेही मालकी हक्क सांगत होते. हे बेट दोन मैल लांब आणि दीड मैल रुंद आहे. बांगलादेश या बेटाला दक्षिण तळपट्टी म्हणून संबोधत असे. त्यावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम नव्हते. १९८१ मध्ये भारताने आपली निमलष्करी दले तिथे पाठवून तिरंगा ध्वज फडकवला. तेव्हापासून ते बेट भारताच्या ताब्यात होते. २०१४ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या लवादाने या बेटाच्या मालकीचा वाद समाधानकारकरीत्या सोडवला. परंतु, सध्या समुद्राची पातळी वाढल्याने हे बेट पाण्याखाली गेले आहे.

(iv) बेकायदेशीर घुसखोरी हा दोन्ही देशांदरम्यानच्या संबंधांमधला सर्वांत वादग्रस्त मुद्दा आहे. १९७१ मध्ये बांगलादेश मुक्तीसाठी युद्ध झाले, त्याच्या आधीपासून लक्षावधी बांगलादेशी निर्वासित भारतात आश्रयाला आले; युद्धानंतर त्यांना परत पाठवण्यात आले. परंतु तहानंतर बांगलादेशातून असंख्य घुसखोर बेकायदेशीररीत्या भारताच्या पूर्व आणि पूर्वोत्तर सीमांवरील राज्यांत घुसले. मोठ्या प्रमाणावरील बेकायदेशीर घुसखोर हा भारताच्या अंतर्गत सुरक्षेला मोठा धोका आहे. त्यातून पूर्वोत्तर राज्यांमधील सीमावर्ती भागात लोकसंख्येचे प्रमाणही बदलले आहे. त्याविरोधात स्थानिक जनतेमध्ये असंतोषाची भावना आहे.

(v) बांगलादेशाने चीनबरोबर संरक्षण सहकार्यासाठी अधिकृत करार केला आहे. चीन आणि बांगलादेशाचे सामरिक संबंध हा भारतासाठी चिंतेचा विषय आहे.

बांगलादेशाच्या पंतप्रधान शेख हसीना २०१७ मध्ये भारताच्या दौऱ्यावर आल्या होत्या. यावेळी उभय पक्षांमध्ये अनेक करार आणि सामंजस्य करार झाले. त्यात संरक्षण क्षेत्रातील सहकार्याचाही समावेश आहे. संरक्षण क्षेत्रात परस्पर सहकार्य वृद्धिंगत करण्याची दोन्ही देशांना इच्छा असल्याचे त्यातून प्रतीत झाले.

### श्रीलंका



राष्ट्राध्यक्षांचे सचिवालय, कोलंबो

**तुम्हांला माहीत आहे का?**

सिलोन १९४८ मध्ये स्वतंत्र झाले. १९७२ मध्ये त्याचे नाव श्रीलंका असे बदलण्यात आले. श्रीलंकेतील बहुसंख्य सिंहली जनता आणि तामिळ फुटीरतावाद्यांमध्ये जुलै १९८३ मध्ये युद्ध सुरू झाले. श्रीलंका सरकार आणि लिबरेशन टायगर्स ऑफ तामिळ ईलम (एलटीटीई) यांच्यात पाव शतकाहूनही अधिक काळ संघर्ष सुरू राहिला. २००२ मध्ये नॉर्वेच्या पुढाकाराने श्रीलंका सरकार व तामिळ बंडखोरांदरम्यान युद्धविराम झाला. त्यामुळे अंतर्गत संघर्ष काही काळ थंडावला, तरी २००६ नंतर तो पुन्हा वाढीस लागला. अखेर मे २००९ मध्ये श्रीलंका सरकारने तामिळ बंडखोरांचा संपूर्ण पराभव केला.

श्रीलंका हिंदी महासागरातील एक लहान, परंतु सामरिक दृष्ट्या अतिशय महत्त्वाचा देश आहे. भारताच्या आग्नेय किनाऱ्यावर असलेल्या या देशाचे स्वतःच्या संरक्षणासाठी स्वतंत्र धोरण आहे. पाल्कची सामुद्रधुनी आणि मन्नारच्या आखाताने भारत आणि श्रीलंका वेगळे झाले आहेत. हिंदी महासागरात भूराजकीय दृष्ट्या परस्परांच्या अगदी निकट असलेल्या या देशांचे सामरिक भवितव्य त्यामुळेच एकत्र बांधले गेले आहे.

श्रीलंकेत १९७७, १९८१ आणि १९८३ मध्ये तामिळांच्या विरोधात मोठ्या वांशिक दंगली घडल्या. त्यामुळे सरकार आणि तामिळ जनतेमध्ये दुरावा उत्पन्न होऊन संघर्ष निर्माण झाला. तो उत्तरोत्तर वाढतच गेला. आपल्याला मिळणाऱ्या भेदभावाच्या व अन्याय्य वागणुकीचा तामिळ जनतेने निषेध केला आणि आपल्याला प्रादेशिक स्वायत्तता व काही प्रमाणात सत्तेतला वाटा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. श्रीलंकेतील सरकार आणि बहुसंख्य सिंहली जनतेने त्याकडे दुर्लक्ष केले. परिणामी, तामिळ युनायटेड लिबरेशन फ्रंट (TULF) आणि लिबरेशन टायगर्स ऑफ तामिळ ईलम (LTTE) या संघटना हिंसक बनल्या आणि तामिळी जनतेला वेगळ्या राज्याच्या मागणीसाठी त्यांनी हिंसाचार सुरू केला. नंतर एलटीटीई ही तामिळी अतिरेक्यांची संघटना अतिशय शक्तिशाली बनली. श्रीलंकेच्या उत्तर आणि पूर्व भागात स्वतःचे वर्चस्व निर्माण करण्याबरोबरच श्रीलंका सरकार आणि सिंहलींशी संबंधित ठिकाणांवर त्यांनी हल्ले सुरू केले. कालांतराने १९८६ च्या सुमारास श्रीलंकेतील जाफना द्वीपकल्पावर एलटीटीईने पूर्ण वर्चस्व मिळवले. श्रीलंकेच्या उत्तर व पूर्व प्रांतांना वेगळे करून स्वतंत्र तामिळ राज्याचा (ईलम) दर्जा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

१९८६-८७ मध्ये श्रीलंकेतील यादवी संघर्ष वाढत गेला आणि श्रीलंकेतील लष्कराने तामिळींविरुद्ध आक्रमक पवित्रा घेतला. काही तामिळी गटांना भारताने आश्रय दिला, आर्थिक सहाय्य केले आणि काही प्रमाणात शस्त्रास्त्रेही दिली. तामिळींचा प्रश्न हा श्रीलंकेची अंतर्गत बाब असून, भारताने त्यात हस्तक्षेप करणे थांबवावे, असे तेथील सरकारने बजावले. मोठ्या प्रमाणावर विविधता असलेल्या समाजांमध्ये कोणताही एक धर्म, वंश किंवा भाषा हा त्या देशापासून वेगळे होण्याचा आधार असू नये, यावर भारताचा विश्वास होता. श्रीलंका सरकार आणि तामिळ फुटीरतावादी गटांना एकत्र आणून त्यांच्यात समझोता घडवण्याची भारताची इच्छा होती. श्रीलंकेतील अभावग्रस्त तामिळ जनतेला भारताने अन्नधान्य व इतर साहित्याचा पुरवठा केला. दोन्ही देशांदरम्यान हा संघर्ष कमी करण्यासाठी राजनैतिक हालचाली करण्यात आल्या. त्याची परिणती म्हणून भारत आणि श्रीलंकेदरम्यान २९ जुलै १९८७ रोजी करार करण्यात आला.

या करारानुसार श्रीलंकेच्या अध्यक्षांच्या विशेष विनंतीवरून भारताने श्रीलंकेत शांतिफौजा (इंडियन पीसकिपिंग फोर्स – IPKF) पाठवण्याचे ठरवले. श्रीलंकेतील तीन वर्षांच्या वास्तव्यादरम्यान शांतीफौजेने प्रामुख्याने तीन कामांवर लक्ष केंद्रित केलेः शांतता प्रस्थापित करणे, एलटीटीईविरुद्ध युद्ध करणे आणि शांतता प्रस्थापनेसाठी बंडखोरविरोधी मोहिमा आखणे.

भारत आणि श्रीलंकादरम्यान संरक्षणाशी संबंधित इतर काही मुद्दे पुढीलप्रमाणेः

(i) **सागरी सुरक्षा :** भारत आणि श्रीलंकेने आपल्या सागरी सीमा निश्चित केल्या आहेत. दोन्ही देशांदरम्यानच्या १९७४ च्या करारात भारतीय मासेमारांच्या सुरक्षेसंबंधी तरतुदी आहेत. बंगालचा उपसागर आणि मन्नारच्या आखातातील सागरी हद्द निश्चित करण्यासाठी भारत व श्रीलंकेदरम्यान १९७६ मध्ये करार करण्यात आला. मात्र, या करारामुळे पाल्कच्या सामुद्रधुनीत मासेमारी करण्याच्या भारतीय मासेमारांच्या हक्कांवर बंधने आली आहेत. कच्छतिवू भागातील श्रीलंकेच्या हद्दीतील समुद्रात मासेमारी करण्यास भारतीयांवर बंदी घालण्यात आली आहे.

(ii) **चीन :** भारत आणि चीन हे दोन्ही शेजारी देश सागरी सत्ताही आहेत. गेल्या काही वर्षांत चीनने म्यानमारमधील अक्याब, कोको द्वीपसमूह, चेदुबा आणि बॅसेन, तसेच बांगलादेशातील चितगांव येथील बंदरे विकसित करण्यास मदत केली आहे. या बंदरांच्या साह्याने बंगालचा उपसागर आणि हिंदी महासागरातील सागरी मार्गांवर वर्चस्व राखण्याचा व नियंत्रण ठेवण्याचा चीनचा प्रयत्न आहे. तसेच, श्रीलंकेतील हम्बनटोटा बंदराच्या पहिल्या टप्प्यातील विकासात चीनचा सहभाग आहे. काही सुरक्षा विश्लेषकांच्या मते चीन भारताला चारी बाजूंनी वेढण्यासाठी अशा प्रकारे बंदरांचा विकास करत आहे. या धोरणाला 'स्ट्रिंग ऑफ पर्ल्स' (मोत्यांची माळ) असे म्हटले जाते. हिंदी महासागरात पूर्वनियोजित साखळीत बंदरांचा विकास करून या प्रदेशावर स्वतःचा लष्करी व आर्थिक प्रभाव निर्माण करण्याचे चीनचे प्रयत्न आहेत.

**तुम्हांला माहीत आहे का?**

**स्ट्रिंग ऑफ पर्ल्स :** चीन भारताला हिंदी महासागरात वेढा घालण्यासाठी विविध सामरिक महत्त्वाच्या ठिकाणी बंदरे व पायाभूत सुविधा विकसित करत आहे. हे धोरण 'स्ट्रिंग ऑफ पर्ल्स' नावाने ओळखले जाते. त्यात पाकिस्तानातील ग्वादार, श्रीलंकेतील हम्बनटोटा, बांगलादेशातील चितगांव, म्यानमारमधील क्यॉक्प्यु आणि चीनच्या कोको द्वीपसमूहातील लष्करी तळाचा समावेश आहे. या बंदरांचा भारताच्या सुरक्षेला मोठा धोका आहे.

## अफगाणिस्तान



संसदभवन, काबूल

**तुम्हांला माहीत आहे का?**

अहमदशहा दुर्राणी यांनी पश्तुन टोळ्यांना संघटित करून १७४७ मध्ये अफगाणिस्तानची स्थापना केली. ब्रिटिश आणि रशियन साम्राज्यांच्या दरम्यान मध्यगत प्रदेश म्हणून अफगाणिस्तानने दीर्घ काळ भूमिका बजावली. ब्रिटिशांच्या अमलातून अफगाणिस्तान १९१९मध्ये स्वतंत्र झाला. अफगाणिस्तानात लोकशाही रुजवण्याचा प्रयत्न अल्प काळ टिकला. १९७३ मध्ये उठाव होऊन तिथली लोकशाही संपुष्टात आली. १९७८ मध्ये अफगाणिस्तानात साम्यवाद्यांनी उठाव केला. त्यानंतर दुसऱ्याच वर्षी १९७९ मध्ये अफगाणिस्तानातील साम्यवादी राजवटीला समर्थन

देण्यासाठी सोव्हिएत रशियाने त्यात हस्तक्षेप केला. तेव्हा अफगाणिस्तानात घुसलेल्या सोव्हिएत फौजा दशकभराने म्हणजे १९८९ मध्ये अफगाणिस्तानातून बाहेर गेल्या. त्यानंतर अफगाणिस्तानात अंतर्गत संघर्ष उफाळून आले. त्याची परिणती १९९६ मध्ये तालिबान राजवट सत्तेवर येण्यात झाली. अमेरिकेवरील ११ सप्टेंबर २००१ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर अमेरिका आणि मित्र देशांनी अफगाणिस्तानवर हल्ला चढवला. अफगाणिस्तानातील नॉर्दर्न अलायन्स ही तालिबानविरोधी आघाडीही त्यात सहभागी होती. त्यातून अफगाणिस्तानातील तालिबानची राजवट संपुष्टात आली.

२००१ मध्ये अफगाणिस्तानच्या पुनर्रउभारणीसाठी संयुक्त राष्ट्रांच्या पुढाकाराने एक जागतिक परिषद झाली. त्यात राजकीय प्रक्रिया पुन्हा सुरू करण्याबरोबरच अफगाणिस्तानसाठी नवे संविधान तयार करण्याचाही समावेश होता. त्यानुसार अफगाणिस्तानात २००४ मध्ये अध्यक्षीय निवडणुका झाल्या आणि २००५ मध्ये नॅशनल असेंब्लीच्या निवडणुका झाल्या. या घडामोडींनंतरही अफगाणिस्तानातील सरकारसमोर तालिबानचे गंभीर आव्हान प्रांताप्रांतांमध्ये कायम आहे.

अफगाणिस्तानातील तालिबान राजवट २००१ मध्ये संपुष्टात आल्यानंतर भारत अफगाणिस्तान संबंधांमध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे. भारत आणि अफगाणिस्तानच्या संबंधांमध्ये कोणत्याही प्रदेश किंवा सीमेवरून वादाचा प्रश्नच उद्‌भवत नाही. अफगाणिस्तानातील अंतर्गत संघर्षाच्या काळात १९९० च्या दशकात तेथील उत्तर आघाडीला (नॉर्दर्न अलायन्स) भारताने पाठिंबा दर्शवला होता. त्याचा अफगाणिस्तानातील तालिबानोत्तर काळात भारताला फायदा झाला. अफगाणिस्तानचे भारताच्या दृष्टीने सामरिक महत्त्व असून, मध्य आशियातील तुर्कमेनिस्तान, कझाकस्तान अशा खनिज तेलाने समृद्ध देशांशी संपर्कासाठी तो एक दुवा आहे.

भारत आणि अफगाणिस्तानदरम्यान २०११ मध्ये सामरिक सहकार्य करार झाला. त्यानुसार अफगाणिस्तानातील पायाभूत सुविधा आणि संस्थात्मक उभारणीसाठी भारत अनेक प्रकारे सहकार्य करत आहे. तेथील शिक्षणसंस्थांच्या उभारणीबरोबरच विविध क्षेत्रांत तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी भारत अफगाणिस्तानला मदत करत आहे. अफगाणिस्तानातील नैसर्गिक साधनसंपत्तीच्या उपयोगासाठी तेथील गुंतवणुकीला चालना देणे, अफगाणिस्तानातून भारतात होणाऱ्या निर्यात वस्तूंवर आयातशुल्क माफ करण्यासह तेथील शांतता आणि संवादाच्या व्यापक प्रक्रियेत भारत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. अफगाणिस्तानातील राष्ट्रीय सुरक्षा दलांना प्रशिक्षण व इतर साहाय्य भारत करत आहे. मात्र, अफगाणिस्तानात कोणत्याही प्रकारचा लष्करी हस्तक्षेप टाळून नागरी विकासाच्या विविध क्षेत्रांत मदती करण्यावर भारताचा भर आहे. त्याला 'सॉफ्ट पॉवर' धोरण असे म्हटले जाते.

अफगाणिस्तानच्या राष्ट्रीय हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी भारताने पुढीलप्रमाणे अनेक पावले उचलली आहेत.

(i) अफगाणिस्तानच्या राष्ट्र उभारणीसाठी भारत विविध प्रकारचे साहाय्य करत आहे. त्यासाठी भारताने तेथील अनेक प्रकल्पांना मदत केली आहे. यामध्ये

(अ) काबूलमध्ये अफगाणिस्तानच्या संसदेची इमारत बांधणे,

(ब) काबूलमधील हबिबिया हायस्कूलच्या इमारतीची पुनर्रउभारणी करणे आणि त्यासाठी आवश्यक ते अर्थसाह्य करणे,

(क) भारत-अफगाणिस्तान मैत्री धरण म्हणून प्रसिद्ध असलेल्या सलमा धरणाचे बांधकाम करणे,

(ड) पुल-ए-खुमरी ते काबूलपर्यंत वीजवाहक तारा व ट्रान्स्फॉर्मर्सची उभारणी करणे,

(इ) कंदाहारमधील अफगाण नॅशनल ॲग्रिकल्चर सायन्सेस अँड टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटीच्या उभारणीसाठी अर्थसाह्य करणे,

(फ) काबूलमधील चिमताला येथे विद्युत उपकेंद्राची उभारणी करणे,

(ग) कंदाहारमध्ये क्रिकेट खेळासाठीचे अद्ययावत क्रीडांगण बांधणे,

(ह) अफगाणिस्तानातील राष्ट्रीय दूरचित्रवाणी प्रसारणाचा विस्तार करणे, आदींचा त्यात समावेश आहे. तसेच अफगाणिस्तानातील विविध प्रांतात विंधनविहीरी खोदून पाणीपुरवठा उपलब्ध करण्यासाठीही भारत मदत करत आहे.

**(ii)** अफगाणिस्तानच्या संरक्षणाशी संबंधित काही प्रकल्पांमध्येही भारत विविध प्रकारे साह्य करत आहे. उदाहरणार्थ,

(अ) केवळ अफगाणिस्तानसाठीच नव्हे, तर भारतासाठीही सामरिक दृष्ट्या महत्त्वाच्या झारंज-डेलाराम महामार्गाची उभारणी भारत करत आहे. अफगाणिस्तानच्या सीमेवरील झारंज या छोट्या शहराला डेलाराम या मोठ्या शहराशी जोडणारा हा मार्ग आहे. त्याच्या उभारणीत भारताने मोठे आर्थिक योगदान दिले आहे. इराणमधील चाबहार हे बंदर भारत विकसित करत आहे. तेथून झारंज-डेलाराम मार्गे अफगाणिस्तानात वाहतुकीचा खात्रीशीर पर्यायी मार्ग भारताला उपलब्ध होईल. तसेच, मध्य आशियातील देशांनाही त्याद्वारे सागरी वाहतुकीचा पर्यायी मार्ग खुला होईल.

(ब) पश्चिम अफगाणिस्तानमधील हेरात प्रदेशातील चिश्ती शरीफ जिल्ह्यातून वाहणाऱ्या हरी नदीवर जलविद्युत निर्मिती आणि पाणी पुरवठ्यासाठी धरण बांधण्यासाठी मदत केली. या धरणाला अफगाणिस्तान -भारत मैत्री धरण (पूर्वीचे सलमा धरण) असे म्हणतात.



अफगाणिस्तान-भारत मैत्री धरण

(क) अफगाणिस्तानातील काबूल नदीवर शाहतूत येथे धरणाच्या बांधकामासाठी भारत मदत करत आहे. ते पूर्ण झाल्यानंतर काबूल नदीचे पाकिस्तानात वाहून जाणारे पाणी अफगाणिस्तानला त्याच्या विकासासाठी वापरता येईल.

(ड) त्याचबरोबर अफगाणिस्तानच्या राष्ट्रीय सैन्याला भारताने २८५ लष्करी वाहनांबरोबरच MI २५ आणि MI३५ ही हेलिकॉप्टर्सही दिली आहेत.

दक्षिण आशियातील लहान शेजारी देशांसंबंधीचे भारताचे धोरण पुढील दोन बाबींवर आधारलेले आहे.

(i) दक्षिण आशियात शांतता, स्थैर्य आणि सुव्यवस्थेचे वातावरण कायम राहणे भारताच्या राष्ट्रीय हितसंबंधांच्या रक्षणासाठी अतिशय महत्त्वाचे आहे. त्यामुळे या देशांशी भारताने सुरक्षा करार केले आहेत. हे करार बहुतांशी द्विपक्षीय स्वरूपाचे आहेत.

(ii) भारतासह हे सर्व देश दक्षिण आशिया प्रादेशिक सहकार्य परिषदेचे (साऊथ एशियन असोसिएशन ऑफ रिजनल कोऑपरेशन- SAARC) सदस्य आहेत. त्याचबरोबर 'बे ऑफ बेंगॉल इनिशिएटिव्ह फॉर मल्टिसेक्टोरल टेक्निकल अँड इकॉनॉमिक कोऑपरेशन' (BIMSTEC) या संघटनेचे भारतासह बांगलादेश, म्यानमार, श्रीलंका, थायलंड, नेपाळ आणि भूतान हे सदस्य देश आहेत. अफगाणिस्तान हा शांघाय सहकार्य परिषदेचे सदस्यत्व मिळवण्यासाठी प्रयत्नशील आहे. अशा प्रादेशिक सहकार्य संघटनांच्या माध्यमातून दक्षिण आशियात स्थैर्य व शांतीचे वातावरण कायम राखण्याचा भारताचा प्रयत्न आहे.

## पश्चिम आशिया




**पश्चिम आशिया**

भारत जेव्हा स्वतंत्र झाला, तेव्हा पश्चिम आशियातील अनेक देश पाश्चिमात्य देशांच्या नियंत्रण व प्रभावाखाली होते. यातील बहुतेक देशांची धोरणे साम्यवादविरोधी आणि पाश्चिमात्यांच्या बाजूने झुकलेली होती.

भारताने पॅलेस्टाईनच्या चळवळीला पाठिंबा दिला होता आणि अरब राष्ट्रवादाचेही समर्थन केले होते. या काळात भारताची भूमिका इस्रायलवर टीका करणारी होती. मात्र, पश्चिम आशियातील बहुतांश देशांचा इस्लामी बंधुतेच्या नावाखाली पाकिस्तानला व त्याच्या काश्मीरविषयक धोरणाला पाठिंबा होता. या काळात 'बगदाद करार' नावाने झालेल्या 'सेंट्रल ट्रीटी ऑर्गनायझेशन' (CENTO) पाकिस्तान सदस्य बनला. इराण, इराक व तुर्कस्थानही त्याचे सदस्य होते.

पश्चिम आशियातील देशांपैकी इजिप्तशी भारताचे सलोख्याचे संबंध होते. १९५६ मध्ये सुएझ कालव्याच्या नियंत्रणावरून झालेल्या वादात भारताने इजिप्तची बाजू उचलून धरली होती. अलिप्ततावादी चळवळीच्या संस्थापकांमध्ये भारताचे पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याबरोबरच इजिप्तचे अध्यक्ष गमाल अब्दुल नासेर, घानाचे क्वामे नक्रुमा, इंडोनेशियाचे सुकार्नो आणि युगोस्लाव्हियाचे मार्शल जोसिप ब्रॉझ टिटो यांचा समावेश होता. सद्दाम हुसैन यांच्या राजवटीत भारताचे इराकशी असलेले संबंध घनिष्ट, बहुआयामी आणि फलदायक होते. भारताने इराकमध्ये अनेक प्रकल्प राबवले. इराकच्या हवाई दलाला प्रशिक्षण देण्यातही भारताचा पुढाकार होता. इराक हा भारताचा प्रमुख तेलपुरवठादार देश होता. या दोन्ही देशांचे सोव्हिएत रशियाशी घनिष्ट संबंध होते.

सन १९६९ मध्ये 'इस्लामी देशांची संघटना' (ऑर्गनायझेशन ऑफ इस्लामिक कोऑपरेशन) स्थापन झाली. या संघटनेने भारताच्या काश्मीरसंबंधी धोरणांविरोधात आणि भारतातील मुस्लिमांच्या स्थिती संदर्भात अनेक वेळा ठराव, शिफारशी आणि निवेदने संमत केली. १९७९ मध्ये सोव्हिएत फौजा अफगाणिस्तानात घुसल्यानंतर त्याविरोधात पाकिस्तान आणि सौदी अरेबियाने अमेरिकेला सहकार्य केले आणि अफगाणिस्तानातील सोव्हिएत फौजांविरोधात मुजाहिदिनांची सेना उभी केली.

सोव्हिएत रशियाच्या विघटनानंतर जगातील शीतयुद्ध समाप्त झाले. त्यानंतर भारताच्या आंतरराष्ट्रीय धोरणांमध्ये क्रांतिकारक बदल झाले. नव्या भूराजकीय वास्तवाशी जुळवून घेण्याचे प्रयत्न भारताने केले. केवळ आदर्शवादावर उभारलेल्या आंतरराष्ट्रीय धोरणाऐवजी भारताच्या राष्ट्रीय हितसंबंधांना महत्त्व देणारे सुरक्षा धोरण भारताने स्वीकारले. यात अमेरिकेबरोबर सामरिक संबंध प्रस्थापित करण्याचाही समावेश होतो. तसेच, पश्चिम आशियात मोजक्याच देशांना महत्त्व न देता, तेथील सर्वच देशांशी समान हितसंबंध व लाभाच्या आधारावर संबंध प्रस्थापित करण्यास भारताने सुरुवात केली. त्याचाच एक भाग म्हणून भारताने १९९२ मध्ये इस्रायलशी पूर्ण राजनैतिक संबंध प्रस्थापित केले. इराणबरोबर संवादालाही भारताने प्राधान्य दिले. खनिज तेल आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा अखंड सुरू रहावा, यासाठी 'आखाती सहकार्य परिषदेशी' (गल्फ कोऑपरेशन कौन्सिल) भारताने व्यापारी भागीदारी सुरू केली. याच परिषदेने पुढे नोव्हेंबर २००८ मध्ये मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा कठोर निषेध केला. सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीनेही दहशतवादविरोधी मुद्द्यांवर भारताला वेळोवेळी सहकार्य दिले.

पश्चिम आशियातील देशांशी भारताने संरक्षणाच्या संदर्भात केलेले काही करार पुढीलप्रमाणेः

**सौदी अरेबिया :** संयुक्त लष्करी सराव, दहशतवादविरोधी मोहिमा, गुप्तवार्ता संकलनात सहकार्य, हवाला किंवा इतर अवैध प्रकारे दहशतवादी गटांना पैशाचा पुरवठा यासह अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर सौदी अरेबियाने भारताला सहकार्याची तयारी दर्शवली आहे.

(अ) २००६ – दहशतवादविरोधी लढ्यात घनिष्ट व सक्रिय सहभागासाठी करावयाच्या उपायांची चाचपणी

(ब) २०१० – रियाध घोषणापत्राद्वारे भारत आणि सौदी अरेबियाची सामरिक भागीदारी जाहीर

(क) २०१९ – संरक्षण व सामरिक क्षेत्रात सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी भारत आणि सौदी अरेबिया दरम्यान संयुक्त नौदल सराव, संरक्षण उपकरणांसाठी लागणाऱ्या सुट्या भागांचे संयुक्त उत्पादन, इंडियन ओशन रिम कंट्रीज या संघटनेच्या माध्यमातून हिंदी महासागरात सागरी सुरक्षा वाढवण्यासंबंधी उपाययोजना आदी बाबींचा समावेश असलेला करार या वर्षात करण्यात आला.

**संयुक्त अरब अमिराती (संयुक्त अरब अमिरात) :**

(अ) २००३– दोन्ही देशांदरम्यान संरक्षण सहकार्यासाठी संयुक्त समिती स्थापन करण्यात आली. या समितीद्वारे संरक्षण क्षेत्रात सहकार्यासाठी करावयाच्या उपाययोजनांची वेळोवेळी चर्चा केली जाते.

(ब) २००६ –भारत–संयुक्त अरब अमिराती सामरिक संवादाला संस्थात्मक स्वरूप देण्याचा निर्णय घेण्यात आला.

(क) २०१८–भारताच्या कर्नाटक राज्यातील पाडूर येथे खनिज तेलाचा सामरिक साठा करण्याबाबत दोन्ही देशांनी सहमती दर्शवली.

**ओमान :**

(अ) २०१८ – ओमान हा आखाती प्रदेशातील सामरिक दृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणी वसलेला देश आहे. या देशातील बंदरात भारतीय नौदलाच्या युद्धनौका उभ्या करण्याची मुभा व त्यांना इतर सुविधा पुरवण्यासंबंधी महत्त्वाचा करार भारत आणि ओमान दरम्यान झाला.

(ब) २०१८ – ओमानने त्याचे दख्म बंदर भारताला लष्करी साहित्याची साठवणूक व पुरवठ्यासाठी वापरण्यास परवानगी देणारा करार संमत केला आहे.

**इराण :**

(अ) भारत आणि इराणने २००१ मध्ये परस्परांतील संरक्षणविषयक सहकार्य वाढवण्यासंबंधी सामंजस्य करार केला. त्यानंतर दोन्ही देशांमधील सुरक्षा संबंध क्रमाक्रमाने विकसित होत आहेत.

(ब) इराणमधील सामरिक दृष्ट्या महत्त्वाच्या चाबहार बंदराचा भारत विकास करीत आहे. तसेच, अफगाणिस्तान व मध्य आशियातील देशांना या बंदराशी जोडण्यासाठी उत्तर–दक्षिण महामार्ग विकसित करण्याचे कामही सुरू आहे. भारताच्या



चाबहार बंदर


राष्ट्रीय हितसंबंधांच्या दृष्टीने ही अतिशय महत्त्वाची घडामोड आहे.

### इस्राईल :

रशियाखालोखाल इस्राईल हा भारताला संरक्षण साहित्याचा पुरवठा करणारा दुसरा मोठा देश आहे. दहशतवादविरोधी लढ्यात, दहशतवाद्यांच्या हालचालींविषयी गुप्तवार्ता संकलन करण्यात आणि संरक्षणाच्या दृष्टीने इस्राईल हा भारताचा विश्वासू साथीदार आहे. भारताला संरक्षण साहित्यातील उच्च तंत्रज्ञान देणारा हा तिसरा मोठा देश आहे. तसेच, सायबर स्पेस आणि गुप्तवार्ता संकलनातही भारताची इस्राईलशी असलेली भागीदारी महत्त्वाची आहे.

## पूर्व आशिया

भारताचे 'पूर्वेकडे पहा' धोरण (लूक ईस्ट पॉलिसी) १९९० च्या दशकाच्या प्रारंभी विकसित झाले. पूर्व आशिया आणि आग्नेय आशियातील देशांशी आर्थिक आणि व्यापारी संबंध विकसित करण्यावर त्याचा प्रारंभी भर होता. चीन आणि जपान या देशांशी भारताचे अनेक द्विपक्षीय करार आहेत. 'असोसिएशन ऑफ साऊथ ईस्ट एशियन नेशन्स' (ASEAN) या प्रादेशिक सहकार्य संघटनेचा भारत १९९२ मध्ये 'क्षेत्रीय संवाद भागीदार' (सेक्टोरल डायलॉग पार्शल पार्टनर) झाला आणि नंतर १९९५ मध्ये 'संपूर्ण संवाद अंशतः भागीदार' (सेक्टोरल डायलॉग पार्टनर) झाला. १९९६ मध्ये भारत आसियानच्या प्रादेशिक गटात सहभागी झाला. या संघटनेला काहीशी समांतर 'बे ऑफ बेंगॉल इनिशिएटिव्ह फॉर मल्टिसेक्टोरल टेक्निकल अँड इकॉनॉमिक कोऑपरेशन' (BIMSTEC) ही संघटना १९९७ मध्ये स्थापन झाली. त्यात दक्षिण व आग्नेय आशियातील देशांचा समावेश आहे. तसेच, सन २००० मध्ये मेकाँग-गंगा सहकार्य परिषद स्थापन झाली. आग्नेय आशियातील देशांशी विकासाच्या मुद्द्यावर घनिष्ट संबंध प्रस्थापित करण्याचा भारताचा हा दुसरा महत्त्वाचा प्रयत्न होता. भारताला पूर्व आशियातील देशांशी जोडणारा ईस्ट-वेस्ट कॉरिडॉर आणि ट्रान्सएशियन हायवे असे काही प्रकल्पही भारताने संयुक्तरीत्या हाती घेतले. त्यात या प्रदेशातील सहा देशांमधील वाहतुकीच्या पायाभूत सुविधा विकसित करण्यावर भर आहे. ट्रान्सएशियन हायवे पूर्ण झाल्यानंतर




पूर्व आशिया

तो नवी दिल्लीला कौलालंपूर, हो चि मिन्ह सिटी, नॉम पेन्ह, बँकॉक, व्हिएन्टाइन, चिआंग मै, यांगून, मंडाले, कालेम्यो, तामू, ढाक्का आणि कोलकाता आदी ठिकाणांमार्फत सिंगापूरला जोडला जाणार आहे.

इंडो-पॅसिफिक परिसरातील देशांशी राजनैतिक संबंध प्रस्थापित करण्याचे भारताचे प्रयत्नही तितकेच महत्त्वाचे आहेत. भारत आणि जपानने त्यांचे संबंध विशेष सामरिक व जागतिक संबंध या पातळीपर्यंत उंचावले आहेत. नोव्हेंबर २०१७ मध्ये फिलिपिन्सची

राजधानी मनिलात पूर्व आशिया शिखर परिषद झाली. तीत भारतासह जपान, ऑस्ट्रेलिया आणि अमेरिकेचे प्रतिनिधी उपस्थित होते. या देशांनी त्यांच्यातील चौहेरी सुरक्षा संवाद (क्वाड्रिलॅटरल सिक्युरिटी डायलॉग – QUAD) नव्याने प्रस्थापित करण्याचे ठरवले. त्यानंतर भारत आणि ऑस्ट्रेलियाने त्यांच्यातील संरक्षण संबंध विकासासाठीचा आराखडा निश्चित केला.

भारताने सन २०१४ मध्ये 'पूर्वेकडे पहा' (लूक ईस्ट) यासोबत 'पूर्वेत कृती करा' (ॲक्ट ईस्ट) असे धोरण स्वीकारले. त्यामुळे आशिया-प्रशांत विभागातील देशांशी केवळ आर्थिक, व्यापारी नव्हे तर सामरिक संबंध प्रस्थापित करण्यासाठी पावले उचलण्यात आली. या धोरणामुळे इंडोनेशिया, व्हिएतनाम, मलेशिया, जपान, कोरियन प्रजासत्ताक, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर हे देश आणि आसियान या प्रादेशिक सहकार्य संघटनेशी सुरक्षा संबंध विकसित करण्यासाठी ठोस यंत्रणा उभारण्याला प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे बिमस्टेक, आशिया सहकार्य संवाद (एशिया कोऑपरेशन डायलॉग – ACD), मेकाँग-गंगा सहकार्य (MGC) आणि हिंदी महासागराभोवतीच्या देशांची इंडियन ओशन रिम असोसिएशन (IORA) आदी प्रादेशिक संघटनांच्या कामात भारत सक्रिय सहभाग नोंदवू लागला. 'पूर्वेत कृती करा' (ॲक्ट ईस्ट) या धोरणामुळे भारतातील अरुणाचल प्रदेशासह इतर पूर्वोत्तर राज्यांच्या विकासासाठी आशियान देशांशी व्यापार व इतर सहकार्याबाबत अनेक गोष्टी सुलभ होतील.

पूर्व आशिया विभागातील भारताचे महत्त्वाचे हितसंबंध पुढीलप्रमाणे सांगता येतीलः

(i) **प्रादेशिक आर्थिक सुरक्षा :** पूर्व आशियात प्रादेशिक विस्तार करण्याची कोणतीही महत्वाकांक्षा भारताला नाही. मात्र, या प्रदेशातील आर्थिक व्यवहार अधिक सुरळीत व विनाअडथळा व्हावेत, अशी भारताची इच्छा आहे. त्या दृष्टीने पूर्व आशियातील अनेक देशांशी भारताने मुक्त व्यापार आणि आर्थिक सहकार्याचे अनेक करार केले आहेत.

(ii) **सुरक्षा संवाद (डिफेन्स डिप्लोमसी) :** इंडो-पॅसिफिक प्रदेशातील देशांशी सामरिक संबंधांचा विस्तार करण्याची भारताची इच्छा आहे. या प्रदेशातील शांतता आणि स्थैर्यासाठी भारतीय नौदलाचे अस्तित्व महत्त्वाचे आहे, असे भारताला वाटते. या प्रदेशातील भारताच्या संरक्षण धोरणात भारतीय नौदलाची महत्त्वाची भूमिका आहे. आग्नेय आशियातील अनेक देशांच्या बंदरांना भारताच्या युद्धनौका अनेकदा भेट देतात. सन २०१० मध्ये भारताने अंदमान व निकोबार बेटांच्या परिसरात आसियान देशांमधील नौदलांचा संयुक्त सराव आयोजित केला होता. द्विपक्षीय पातळीवर भारताने सिंगापूर आणि व्हिएतनामसमवेत संरक्षणविषयक करार केले आहेत. तसेच, जपान, चीन आणि दक्षिण कोरियाशी संरक्षण संबंधांमध्ये त्याने वाढ केली आहे.

(iii) **दक्षिण चिनी समुद्र :** हिंदी महासागर आणि प्रशांत महासागरातील महत्त्वाचे सागरी मार्ग खुले राहण्यासाठी दक्षिण चिनी समुद्र महत्त्वाचा आहे. यात भारताचे मोठे सामरिक हितसंबंध गुंतलेले आहेत. जपान आणि कोरियाकडून होणाऱ्या ऊर्जासाधनांच्या वाहतुकीसाठी हा मार्ग महत्त्वाचा आहे. तसेच, भारताची आशिया-प्रशांत विभागातील जवळपास निम्म्याहून अधिक मालवाहतूक या समुद्रातूनच होते. त्यामुळे भारताचे या समुद्रात सामरिक हितसंबंध गुंतलेले आहेत.

(iv) **पूर्वोत्तर राज्ये :** 'पूर्वेकडे पहा' आणि 'पूर्वेत कृती करा' या धोरणांमुळे भारतातील पूर्वोत्तर राज्यांच्या विकासाच्या अनेक संधी उपलब्ध होत आहेत. भारताची पूर्वोत्तर राज्ये भौगोलिकदृष्ट्या आग्नेय आशियातील प्रदेशांशी जोडली गेली आहेत. या राज्यांच्या विकासासाठी आग्नेय आशियातील देशांशी आर्थिक सहकार्य आणि सामाजिक-सांस्कृतिक व सुरक्षा संबंध विकसित करणे अत्यंत आवश्यक आहे.

**See the following websites for additional details:**

1. Briefs of Foreign Relations, Ministry of External Affairs, Government of India. https://mea.gov.in/foreign-relations.htm
2. Annual report, Ministry of Defence, Government of India (latest available) https://mod.gov.in/sites/default/files/AR1718.pdf

## स्वाध्याय

**प्र. १ (अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.**

(i) ब्रिटिश काळात ............... या देशांदरम्यान अफगाणिस्तान हे मध्यगत राष्ट्र होते.

(अ) भारत आणि इराण
(ब) भारत आणि रशिया
(क) भारत आणि तिबेट
(ड) भारत आणि पाकिस्तान

(ii) झारंज-डेलाराम मार्ग .................. मध्ये आहे.

(अ) पाकिस्तान
(ब) इराण
(क) अफगाणिस्तान
(ड) उझबेकिस्तान

**(ब) योग्य कारण देऊन वाक्य पूर्ण करा.**

(i) सागरी सीमा समस्या हे भारत आणि श्रीलंकेदरम्यानच्या तणावाचे कारण आहे. कारण......

**(क) गटात न बसणारा शब्द शोधा.**

(i) आसियान, बिमस्टेक, IORA, सिएटो.

**प्र. २ खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण लिहा.**

(i) इ.स. २००० मध्ये स्थापन केलेले मेकाँग-गंगा कार्पोरेशन (MGC) द्वारे भारताने दक्षिण पूर्व आशियाशी निकट संबंध स्थापित केले.

(ii) "स्ट्रिंग ऑफ पर्ल्स" म्हणजे चीनने दक्षिण चीन समुद्रात विकसित केलेले लष्करी-व्यापारी सुविधांचे जाळे

**प्र. ३ सहसंबंध स्पष्ट करा.**

(i) श्रीलंका व 'स्ट्रिंग ऑफ पर्ल्स'मधील हम्बनटोटा बंदर

**प्र. ४ आपले मत नोंदवा.**

(i) भारत अफगाणिस्तानात बरेच विकासकार्य करण्याचा प्रयत्न करीत आहे. सुरक्षेच्या दृष्टीने हे भारताला लाभदायी कसे ठरते ?

**प्र. ५ खालील प्रश्नाचे उत्तर लिहा.**

(i) विस्तारित सरहद्द म्हणजे काय ? भारताशी त्याचा संबंध काय ?

**उपक्रम**

वृत्तपत्रे, मासिके इत्यादींद्वारे पश्चिम आशियातील (अरब देश, इराण, तुर्कस्तान आणि इस्त्रायल) घटनाक्रमांची माहिती जमा करा. त्याआधारे वर्गात सादरीकरण करा.

# प्रकरण ४ भारताची आण्विक, अवकाश आणि सागरी धोरणे

## आण्विक धोरण



तुर्भे–अणुभट्टी

स्वातंत्र्यानंतर लगेचच भारताचा अणुसंशोधन कार्यक्रम सुरू झाला. भारताच्या आण्विक धोरणाची उभारणी प्रामुख्याने दोन तत्वांवर झाली:

(i) अणुऊर्जेचा शांततामय कामांसाठी विकास व संशोधनाला प्रोत्साहन

(ii) अणुसंशोधन क्षेत्रात स्वयंपूर्णता प्राप्त करणे.

या तत्त्वांच्या आधारावर भारताने तीन टप्प्यांतील आण्विक धोरण तयार केले. या धोरणाचे प्रमुख घटक पुढीलप्रमाणे:

(i) नैसर्गिक युरेनियमवर चालणाऱ्या अणुभट्ट्यांचा विकास,

(ii) पहिल्या टप्प्यातून निर्माण होणाऱ्या प्लुटोनियमवर चालणाऱ्या 'फास्ट ब्रीडर' अणुभट्ट्यांचा विकास,

(iii) भारतात थोरियमयुक्त वाळूचे मोठे साठे असल्याने थोरियम–युरेनियम इंधनावर चालू शकणाऱ्या अणुभट्ट्यांचा विकास व त्या दृष्टीने संशोधन.

भारताने मुंबईतील तुर्भे येथे १९५६ मध्ये अप्सरा ही

### तुम्हांला माहीत आहे का?

**अणुऊर्जेसंबंधीचे धोरण :** ऊर्जानिर्मितीसाठी अणुशक्तीचा उपयोग हे भारताच्या अणुसंशोधन कार्यक्रमाचे पहिले लक्ष्य होते. त्यात युरेनियम आणि थोरियमचा आण्विक इंधन म्हणून वापर करण्याला प्राधान्य होते.

भारतातील किरणोत्सारी पदार्थांचे उपलब्ध साठे पुढीलप्रमाणे सांगितले जातात:

**नैसर्गिक युरेनियम :** ७० हजार टन, **नैसर्गिक थोरियम :** ३ लाख ६० हजार टन

भारताचा तीन टप्प्यांतील आण्विक कार्यक्रम पुढीलप्रमाणे:

**पहिला टप्पा :** युरेनियम ऑक्साईड आणि जड पाण्याचा वापर करून उच्च दाबाखाली जड पाण्यावर प्रक्रिया करणाऱ्या अणुभट्ट्यांची (हेवी वॉटर रिॲक्टर्स) उभारणी. या टप्प्यात शिल्लक राहणाऱ्या इंधनावर फेरप्रक्रिया करणारे प्रकल्प विकसित करण्याचाही समावेश आहे.

**दुसरा टप्पा :** पहिल्या टप्प्यातून निर्माण झालेल्या प्लुटोनियम २३९ इंधनावर आधारित 'फास्ट ब्रीडर' अणुभट्ट्यांची उभारणी. त्यात पहिल्या टप्प्यातून निर्माण झालेले प्लुटोनियम २३९ आणि थोरियमचा वापर करून त्याचे युरेनियम २३३ मध्ये रूपांतर करणे.

**तिसरा टप्पा :** युरेनियम २३३ या इंधनावर आधारित 'फास्ट ब्रीडर' अणुभट्ट्यांचा विकास. याच टप्प्यात भारतात मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेल्या थोरियमचा अणुइंधन म्हणून वापर करून वीज निर्मिती मोठ्या प्रमाणावर करता येईल.

अधिक माहितीसाठी भाभा अणुसंशोधन केंद्राच्या पुढील संकेतस्थळाला भेट द्या.
(http://barc.gov.in/about/anushakti_sne.html)

पहिली संशोधन अणुभट्टी उभारली. या अणुभट्टीची उभारणी पूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञानावर करण्यात आली होती. पुढे १९६० मध्ये कॅनडा, भारत आणि अमेरिकेच्या संयुक्त मोहिमेतून (कॅनडा-इंडिया-रिॲक्टर-युनायटेड स्टेट्स CIRUS) ही अणुभट्टी उभारण्यात आली. त्यानंतर १९६१ मध्ये झर्लिना या अणुभट्टीचे काम सुरू करण्यात आले. भारताच्या अणुसंशोधन कार्यक्रमात इंधनावर फेरप्रक्रिया हा भाग महत्त्वाचा मानला गेला. अणुभट्टीत वापरलेल्या इंधनाच्या साक्यातून प्लुटोनियम वेगळे काढणे व ते नव्याने वापरणे, ही फेरप्रक्रिया त्यात अपेक्षित होती. भारतात थोरियमचे मोठे साठे असल्याने त्यांचा अणुऊर्जा निर्मितीसाठी वापर करणे, ही गोष्ट अतिशय आवश्यक होती. त्यामुळेच तिसऱ्या टप्प्यात भारतातील अणुभट्ट्या थोरियमवर चालतील असे तंत्रज्ञान विकसित करण्याची योजना आखण्यात आली. सुरुवातीपासून एक दशकभराच्या काळातच भारतीय अणुसंशोधन कार्यक्रम उभारी घेण्याच्या स्थितीत आला.

भारत आणि चीनदरम्यान १९६२ मध्ये युद्ध झाले. त्यानंतर चीनने दोन वर्षांतच अणुचाचणी केल्याने भारताला त्याच्या आण्विक धोरणाचा फेरविचार करणे भाग पडले. १९६४ मध्ये पंडित नेहरूंचे निधन होईपर्यंत शांततामय कारणांसाठी अणुशक्तीचा उपयोग हे भारताचे ब्रीद कायम राहिले. त्यांच्या निधनानंतर काहीच महिन्यांनी चीनने केलेल्या अणुचाचणीमुळे भारताला वेगळा विचार करणे आवश्यक होते. सुरुवातीला प्रधानमंत्री लालबहादूर शास्त्री हे नेहरूंच्या धोरणात बदल करण्यास राजी नव्हते. कालांतराने शास्त्रींच्या विचारांमध्ये बदल झाला आणि संशोधनाच्या हेतूने अणुस्फोट किंवा अणुचाचणी करण्यास त्यांनी संमती दिली. डॉ. होमी भाभांचे असे मत होते की, भारत केवळ दीड वर्षांतच अणुबॉम्ब बनवण्याची क्षमता मिळवू शकेल. परंतु, दुर्दैवाने डॉ. होमी भाभा आणि लालबहाद्दूर शास्त्रींचे १९६६ मध्ये निधन झाले. याच काळात शीतयुद्धाच्या पार्श्वभूमीवर जग अण्वस्त्र प्रसारबंदी कराराची (नॉनप्रोलिफेरेशन ट्रीटी- NPT) चर्चा करत होता. १९६८ मध्ये विविध देशांनी या करारावर स्वाक्षरी केली. मात्र, हा करार अण्वस्त्रधारी आणि अण्वस्त्रे नसलेल्या देशांमध्ये भेदभाव करत असल्याचे प्रतिपादन करून भारताने त्यावर स्वाक्षरी करण्यास नकार दिला. या करारामुळे अद्याप अण्वस्त्रे विकसित न केलेल्या देशांवर बंधने येणार होती. त्यामुळे अण्वस्त्रांचा विविध देशातील प्रसार (होरिझोंटल एक्स्पान्शन) रोखला जाणार होता, हे खरे असले तरी आधीच अण्वस्त्रसज्ज असलेल्या देशांवर त्यांची संहारक शक्ती वाढवत नेण्यावर (व्हर्टिकल एक्स्पान्शन) कोणतीही बंधने नाहीत, याकडे भारताने जगाचे लक्ष वेधले.

भारताने १९७४ मध्ये पोखरणच्या वाळवंटात पहिली अणुचाचणी केली. या चाचणीतून अण्वस्त्र बनवू शकण्याच्या आपल्या क्षमतेचे भारताने प्रदर्शन केले. अण्वस्त्रे बनवण्यासाठी आवश्यक सामग्री आणि त्यासाठी आवश्यक वैज्ञानिक मनुष्यबळ भारताकडे असल्याचे सिद्ध झाले. तरीही ही अणुचाचणी शांततेसाठी असल्याची (पीसफुल न्युक्लिअर एक्स्प्लोजन - PNE) भारताने जगाला ग्वाही दिली. अण्वस्त्रे बनवण्याचा आपला कोणताही उद्देश नसल्याचे भारताने सांगितले. त्यावेळी संसदेत निवेदन करताना प्रधानमंत्री इंदिरा गांधी म्हणाल्या की, अणुशक्तीचा शांततामय उद्देशांसाठी उपयोग करण्याच्या दृष्टीने भारताच्या अणुऊर्जा मंडळाने (ॲटोमिक एनर्जी एजन्सी ऑफ इंडिया) केलेल्या संशोधन व विकास कार्यक्रमाचे या चाचणीतून जगाला दर्शन घडले. मात्र, तसे करताना भारताने कोणत्याही आंतरराष्ट्रीय कायद्याचे किंवा बंधनांचे उल्लंघन केलेले नाही. अमेरिका आणि कॅनडाने भारताच्या या अणुचाचणीचा निषेध केला. मात्र, सोव्हिएत रशियाने याबाबत तटस्थ भूमिका घेतली, तर फ्रान्सने भारताच्या अणुचाचणीचे स्वागत केले.

या चाचणीनंतर भारताच्या आण्विक धोरणाकडे 'जाणीवपूर्वक राखलेली संदिग्धता' असे संबोधले जाऊ लागले. भारताने अण्वस्त्र बनवू शकण्याची क्षमता तर जगाला दाखवून दिली, मात्र अण्वस्त्रे बनवण्याची कोणतीही इच्छा नसल्याचे सांगितले. तसेच, अण्वस्त्रप्रसारबंदी करारावर स्वाक्षरी करण्याचेही नाकारले.

त्यानंतर सत्तेवर आलेल्या प्रधानमंत्री राजीव गांधी आणि पी. व्ही. नरसिंह राव यांच्या सरकारांनी आण्विक धोरणांबाबत जाणीवपूर्वक संदिग्धतेचे इंदिरा गांधींचे धोरण अनुसरले. मात्र, इंद्रकुमार गुजराल प्रधानमंत्री असताना ही संदिग्धता दूर करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. भारताच्या सुरक्षेच्या दृष्टीने अण्वस्त्रे बनवण्याचा पर्याय खुला राखण्याचा त्यांचा मनोदय होता.

१९९० च्या दशकात घडलेल्या विविध घटनांनी भारताचे आण्विक धोरण बदलत गेले. अण्वस्त्रप्रसारबंदी कराराला बेमुदत वाढ देण्यात आली. सर्वसमावेशक चाचणी बंदी करार (कॉम्प्रिहेन्सिव्ह टेस्ट बॅन ट्रीटी – CTBT) हा संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेने मंजूर केला. हे दोन करार चर्चेत राहिल्याने भारतानेही अणुचाचणीवर बंदीची भूमिका स्वीकारावी, यासाठी भारतावर जागतिक दबाव वाढत गेला. त्यातून पुन्हा एकदा अणुचाचणी करण्याच्या दिशेने भारताचे पाऊल पडले. पोखरणला १९७४ मध्ये केलेल्या पहिल्या अणुचाचणीला २४ वर्षे उलटल्यानंतर मे १९९८ मध्ये भारताने पुन्हा त्याच ठिकाणी एकापाठोपाठ एक अणुचाचण्या केल्या. तसेच, आपण आता अण्वस्त्रसज्ज देश असल्याचे भारताने जाहीर केले. त्यातून भारताच्या आण्विक धोरणात इतकी वर्षे 'जाणीवपूर्वक राखलेली संदिग्धता' दूर झाली. प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांनी संसदेत त्यामागची कारणमीमांसा स्पष्ट केली. भारताच्या शेजारील देशांमध्ये अण्वस्त्रे आणि क्षेपणास्त्रांच्या झालेल्या प्रसारामुळे भारताच्या हितसंबंधांना धोका निर्माण झाला होता. विशेषतः १९८० व १९९० च्या दशकांत भारताची सुरक्षा व्यवस्था खालावली होती. तसेच, अण्वस्त्रधारी देश अण्वस्त्रमुक्त जग निर्माण करण्यासाठी कोणतेही प्रयत्न करत नव्हते. त्यामुळे भारताला हे पाऊल उचलावे लागल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, त्याचबरोबर भारताची अण्वस्त्रे केवळ स्वसंरक्षणासाठी आहेत, कोणावरही आक्रमणासाठी भारत त्यांच्या वापर करणार नाही, असेही वाजपेयींनी स्पष्ट केले.

याचेच पुढचे पाऊल म्हणून भारताने जानेवारी २००३ मध्ये 'न्यूक्लिअर कमांड ॲथॉरिटी' (NCA) (अण्वस्त्र संचालन यंत्रणा) स्थापन केली. तिची पहिली बैठक सप्टेंबर २००३ मध्ये झाली. जानेवारी २००३ मध्येच भारताने अण्वस्त्रांच्या वापराबाबतचे त्याचे पहिले अधिकृत धोरण जाहीर केले. भारताची आण्विक क्षमता भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेचा अविभाज्य भाग व्हावा, या दृष्टीने NCA ने पुढची पावले उचलली.

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या सुरक्षा समितीने २००३ मध्ये भारताच्या जाहीर केलेल्या आण्विक धोरणाची मुख्य वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे:

(i) शत्रूच्या मनात धाक उत्पन्न होईल अशा प्रकारची किमान व विश्वासार्ह आण्विक प्ररोधनाची (क्रेडिबल मिनिमम डेटरन्स) स्थिती निर्माण करणे व कायम राखणे.

(ii) 'अण्वस्त्रांचा प्रथम वापर नाही' ही भूमिकाः भारत कोणत्याही परिस्थितीत अण्वस्त्रांचा पहिल्यांदा वापर करणार नाही. भारताच्या प्रदेशावर किंवा भारतीय सेनादलांवर जगात कोठेही अण्वस्त्रांचा हल्ला झाल्यासच भारत प्रतिहल्ला म्हणून अण्वस्त्रांचा वापर करेल.

(iii) भारताचा अण्वस्त्रांचा पहिलाच प्रतिहल्ला इतका तीव्र असेल की, शत्रूचे प्रचंड आणि कधीही न भरून येणारे नुकसान होईल.

(iv) भारताच्या नागरी राजकीय नेतृत्वाने अण्वस्त्र संचालन यंत्रणेमार्फत निर्णय घेतल्यानंतरच अशा तऱ्हेचा आण्विक प्रतिहल्ला करण्यात येईल.

(v) अण्वस्त्रे नसलेल्या कोणत्याही देशावर भारत अण्वस्त्रांनी हल्ला चढवणार नाही.

(vi) मात्र, भारतीय प्रदेशावर किंवा भारतीय सेनादलांवर जगात कुठेही जैविक किंवा रासायनिक अस्त्रांचा मारा झाल्यास अण्वस्त्रांनी प्रतिहल्ला करण्याचे स्वातंत्र्य भारत राखून ठेवत आहे.

(vii) किरणोत्सारी पदार्थ नियंत्रण करारासंबंधी (फिसाईल मटेरियल कटऑफ ट्रीटी) चर्चेत भारत सहभागी असल्याने अण्वस्त्रे व क्षेपणास्त्रांसंबंधी पदार्थ आणि

तंत्रज्ञानाच्या निर्यातीवर भारत कठोर नियंत्रण राखील. तसेच, अणुचाचणीबंदीच्या तत्त्वांचे उल्लंघन करणार नाही.

(viii)जागतिक पातळीवर विश्वासार्ह आणि कोणताही भेदभाव नसलेल्या आण्विक नि:शस्त्रीकरणाच्या प्रयत्नांना भारताचा पाठिंबा राहील, त्या माध्यमातून अण्वस्त्रमुक्त जगाचे स्वप्न साकार करण्याच्या उद्‌दिष्टाशी भारताची बांधिलकी यापुढेही कायम राहील.

**तुम्हांला माहीत आहे का?**

**अण्वस्त्र तंत्रज्ञानाचा प्रसार रोखण्यासाठी करण्यात आलेल्या विविध आंतरराष्ट्रीय उपाययोजना पुढीलप्रमाणे:**

**आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा आयोग (इंटरनॅशनल ॲटोमिक एनर्जी एजन्सी – IAEA) (१९५७)**

आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा आयोग ही संस्था शांततापूर्ण उपयोगांसाठी अणुऊर्जेच्या प्रसाराला उत्तेजन देते आणि अणुऊर्जेचा कोणत्याही लष्करी कारणांसाठी (अण्वस्त्रांसह) वापराला प्रतिबंध करते.

**अण्वस्त्र प्रसारबंदी करार (न्युक्लिअर नॉनप्रॉलिफेरेशन ट्रीटी – NPT) (१९६८)**

जगभरात अण्वस्त्रांचा व अण्वस्त्र तंत्रज्ञानाचा प्रसार रोखण्यासाठी हा आंतरराष्ट्रीय करार करण्यात आला. अणुऊर्जेच्या शांततापूर्ण वापराला उत्तेजन देण्याबरोबरच आण्विक नि:शस्त्रीकरण आणि सर्वसाधारण व संपूर्ण नि:शस्त्रीकरण करण्याचा त्याचा उद्‌देश आहे. हा करार १९६८ मध्ये अस्तित्वात आला. भारताने आजवर त्यावर स्वाक्षरी केलेली नाही. ज्या देशांकडे अण्वस्त्रे नाहीत, त्यांनी ती मिळवण्याला किंवा त्याचे तंत्रज्ञान विकसित करण्याला हा करार प्रतिबंध करतो. परंतु, आधीच अण्वस्त्रसज्ज असलेल्या देशांवर तो कोणतेही निर्बंध घालत नाही. त्यामुळे तो पक्षपाती व भेदभाव करणारा असल्याची भारताची भूमिका आहे. त्यामुळेच या करारात सहभागी होण्यास भारताने नकार दर्शवला आहे. १९९५ मध्ये या कराराची मुदत अनंत काळापर्यंत वाढवण्यात आली.

**अणुपुरवठादार देश (न्युक्लिअर सप्लायर्स ग्रुप – NSG)**

अण्वस्त्रांच्या निर्मितीसाठी आवश्यक किरणोत्सारी पदार्थ, उपकरणे आणि तंत्रज्ञानाचा प्रसार रोखण्यासाठी अणुपुरवठादार देशांचा हा गट स्थापन करण्यात आला आहे. त्यातून किरणोत्सारी पदार्थ व अणुतंत्रज्ञानाच्या प्रसारावर बहुस्तरीय नियंत्रणाची आणखी एक यंत्रणा उपलब्ध झाली आहे.

**सर्वंकष चाचणी बंदी करार (कॉम्प्रिहेन्सिव्ह टेस्ट बॅन ट्रीटी – CTBT) (१९९६)**

या कराराने जगभरात कोठेही आणि कोणाकडूनही लष्करी वा नागरी उपयोगासाठी कोणत्याही प्रकारची अणुचाचणी करण्यावर बंदी घालण्यात आली. जीनिव्हात झालेल्या नि:शस्त्रीकरणासंबंधी परिषदेत या करारासंबंधी चर्चा करण्यात आली. नंतर संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने १९९६ मध्ये या कराराला मान्यता दिली.

**World Nuclear Forces, 2018**

| Country | Deployed warheads | Other warheads | Total inventory |
|---|---|---|---|
| USA | 1750 | 4435 | 6185 |
| Russia | 1600 | 4900 | 6500 |
| UK | 120 | 80 | 200 |
| France | 280 | 20 | 300 |
| China | - | 290 | 290 |
| India | - | 130-140 | 130-140 |
| Pakistan | - | 150-160 | 150-160 |
| Israel | - | 80-90 | 80-90 |
| North Korea | - | (20-30) | (20-30) |

-=zero; ( ) = uncertain figure not included in the total.

'Other warheads' includes operational warheads held in storage and retired warheads awaiting dismantlement. The figures for Russia and the USA do not necessarily correspond to those in their 2010 Treaty on Measures for the Further Reduction and Limitation of Strategic Offensive Arms (New START) declarations because of the treaty's counting rules. Total figures include the highest estimate when a range is given. All estimates are approximate and as of Jan. 2019. Source: SIPRI Year Book 2019

भारत स्वतंत्र झाल्यानंतर प्रारंभीच्या वर्षांत विविध प्रकारचे संशोधन, प्रकल्प आणि संस्थांना समाविष्ट करून घेऊ शकेल, अशा सुसंगत आणि नियोजनबद्ध विज्ञान व तंत्रज्ञान धोरणाचा देशात अभाव होता. या समस्येवर मात करण्यासाठी १९५८ मध्ये 'वैज्ञानिक धोरण ठराव' (सायंटिफिक पॉलिसी रिझोल्युशन) करण्यात आला. विज्ञानाच्या जवळपास सर्वच क्षेत्रांमध्ये मूलभूत संशोधन करण्यावर आणि वैज्ञानिक संशोधनाच्या विकासासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करण्यावर त्यात भर होता. त्यानंतर १९८३ मध्ये जारी करण्यात आलेले तंत्रज्ञान धोरण भूमिकेस (टेक्नॉलॉजी पॉलीसी स्टेटमेंट) हे धोरण पुढे नेणारे होते. विविध क्षेत्रांमधील तंत्रज्ञानाच्या क्षमता आत्मसात करणे आणि देशाला स्वयंपूर्णतेकडे नेणे हे त्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले. त्यानंतरच्या दहा वर्षांत अवकाश आणि इलेक्ट्रॉनिक क्षेत्रात भरीव कामगिरी करण्यात आली. २००३ मध्ये नवे विज्ञान व तंत्रज्ञान धोरण जाहीर करण्यात आले. त्यात राष्ट्रीय पातळीवरील संशोधन आणि विकासाची सामाजिक-आर्थिक प्रगतीशी संबंधित उद्दिष्टांशी सांगड घालण्यात आली. २०१३ मध्ये विज्ञान तंत्रज्ञान आणि नवोपक्रम (इनोव्हेशन) धोरण जाहीर करण्यात आले. त्यात देशातील जनतेच्या वेगवान, शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासाचे उद्दिष्ट मांडण्यात आले. विज्ञान तंत्रज्ञानाच्या काही आघाडीच्या क्षेत्रांमध्ये भारताचे नेतृत्व प्रस्थापित करण्यासाठी देशात जागतिक दर्जाच्या संशोधन व विकास सुविधांचा विकास करण्याचे उद्दिष्ट त्यात ठरवण्यात आले.

देशातील इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात प्रगतीसाठी संशोधन, विकास आणि औद्योगिक सुविधांची पाहणी करण्यासाठी १९७१ मध्ये इलेक्ट्रॉनिक्स आयोग स्थापन करण्यात आला. पुढे १९८४ मध्ये त्यावेळी झालेला विकास लक्षात घेऊन भारताने सुधारित संगणकविषयक धोरण जाहीर केले.

भारतीय अवकाश संशोधन संस्था (इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन ISRO - इस्रो) १९६९ मध्ये स्थापन करण्यात आली. भारताचा पहिला स्वदेशी बनावटीचा उपग्रह 'आर्यभट्ट' १९७५ मध्ये अवकाशात सोडण्यात आला. त्यासाठी सोव्हिएत रशियाचे प्रक्षेपक वाहन वापरण्यात आले होते. भारताची पहिली यशस्वी अवकाश मोहीम १९८३मध्ये साकारली. रोहिणी या उपग्रह प्रक्षेपक वाहनापासून सुरुवात करून इस्रोने वर्धित (ऑगमेंटेड) उपग्रह प्रक्षेपक वाहन, ध्रुवीय उपग्रह प्रक्षेपक वाहन, भूस्थिर उपग्रह प्रक्षेपक वाहन अशी उत्तरोत्तर प्रगती केली. इस्रो आता या तंत्रज्ञानाचा व्यावसायिक कारणांसाठीही उपयोग करत आहे.

भारतीय सेनादलांना टेहळणीसाठी उपयोग व्हावा, या दृष्टीने भारतीय दूरसंवेदन उपग्रहांचे (इंडियन रिमोट सेन्सिंग सॅटेलाइट - IRS) प्रक्षेपण करण्यात आले. श्रीलंकेतील भारतीय शांतिसेनेच्या कामात सुसूत्रता व समन्वयासाठी इन्सॅट-1डी या उपग्रहाचा वापर करण्यात आला होता. उपग्रहांमार्फत मिळालेल्या छायाचित्रांचे संगणकीय विश्लेषण करून लष्करी लक्ष्य निश्चित करण्यासाठीची यंत्रणा डिफेन्स इलेक्ट्रॉनिक्स अँड ॲप्लिकेशन्स लॅबोरेटरी (DEAL) विकसित करत आहे. आतापर्यंत अशा यंत्रणाचा विकास पूर्णतः भारतीय इलेक्ट्रॉनिक्स महामंडळाच्या अखत्यारित करण्यात आला. आता खासगी क्षेत्रातील कंपन्याही त्यात योगदान देण्यासाठी इच्छुक आहेत.

भारताच्या क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमाची सुरुवात तशी १९५० च्या दशकातच झाली. संरक्षण विकास आणि संशोधन संघटनेच्या (DRDO) अखत्यारित हा प्रकल्प होता. मात्र, त्याला खरी उभारी १९८० च्या दशकात आली. १९८३ मध्ये भारताने एकात्मिक क्षेपणास्त्र विकास कार्यक्रम (इंटिग्रेटेड गाईडेड मिसाईल डेव्हलपमेंट प्रोग्रॅम) सुरू केला. त्यात शत्रूच्या सामरिक ठिकाणांवर अचूक मारा करू शकणाऱ्या व तशा मार्गदर्शक यंत्रणा असलेल्या क्षेपणास्त्रांचा विकास सुरू झाला. त्याअंतर्गत प्रथम पृथ्वी आणि अग्नी या दोन क्षेपणास्त्र यंत्रणा विकसित करण्यात आल्या. पृथ्वी हे जवळच्या टप्प्यावर मारा करू शकणारे लघु पल्ल्याचे क्षेपणास्त्र आहे, तर अग्नी ही मध्यम व दूरच्या पल्ल्यावर

मारा करू शकणारी क्षेपणास्त्र यंत्रणा आहे. याचबरोबर जमिनीवरून आकाशातील लक्ष्यावर मारा करू शकणारी आकाश आणि त्रिशूल ही क्षेपणास्त्रे आणि रणगाडाविरोधी नाग या क्षेपणास्त्रांचाही विकास करण्यात आला.


भारताचा क्षेपणास्त्र विकास कार्यक्रम आता एका विशिष्ट टप्प्यावर पोहोचला आहे. सर्व प्रकारच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांबरोबरच ध्वनीच्या वेगापेक्षाही जास्त वेगाने मारा करू शकणारी सुपरसॉनिक आणि पाणबुड्यांवरूनही शत्रूच्या युद्‌धनौकांवर आघात करू शकणारी स्वतःची मार्गदर्शक यंत्रणा असलेली क्रूझ क्षेपणास्त्रे भारताने विकसित केली आहेत. भारताच्या पायदळ, नौदल आणि हवाईदलाकडे अशा क्षेपणास्त्रांचा सुसज्ज ताफा आता आहे. या क्षेपणास्त्रांच्या साह्याने पारंपरिक तसेच अपारंपरिक अस्त्रांचा शत्रूवर मारा करता येतो. अण्वस्त्रांनी सज्ज असलेली क्षेपणास्त्रे भारताच्या आण्विक संचालन यंत्रणेच्या अखत्यारित आहेत. त्यासाठी विशेष सामरिक दल (स्ट्रॅटेजिक फोर्सेस कमांड) स्थापन करण्यात आले असून, त्याच्या नियंत्रणाखाली क्षेपणास्त्रसज्ज लष्करी पथके (मिसाईल युनिट्स) काम करत आहेत.

भारताने २७ मार्च २०१९ रोजी मिशन शक्तीअंतर्गत उपग्रहभेदी क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली. उच्च तंत्रज्ञानाचा समावेश असलेल्या या मोहिमेतील यशाने बाह्य अवकाशातील उपग्रहाच्या हालचालींचा अचूक मागोवा घेणे व त्यावर अचूक निशाणा साधण्याच्या क्षमतेचे भारताने जगाला दर्शन घडवले. ही मोहीम संपूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारलेली होती. अमेरिका, रशिया आणि चीन या देशांपाठोपाठ भारताने ही क्षमता सिद्‌ध केली आहे. तसेच, भारताचे सुरक्षा धोरण केवळ पाकिस्तानपुरते मर्यादित नसून, त्याच्याही खूप पलीकडच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी भारत स्वतःला सज्ज करत असल्याचा संदेश त्यातून जगाला मिळाला.

## Missile Types

| Missile | Class | Range | News |
|---|---|---|---|
| Prithvi-3 | SRBM | 300-350 km | Operational |
| Prithvi-2 | SRBM | 250-350 km | Operational |
| Exocet | ASCM | 40-180 km | Operational |
| Sagarika/Shau-rya | SLBM | 700 km / 3500 km | In Development |
| Prithvi-1 | SRBM | 150 km | Operational |
| Prahaar | SRBM | 150 km | In Development |
| Nirbhay | CruiseMissile | 800-1000 km | In Development |
| Dhanush | SRBM | 250-400 km | Operational |
| BrahMos | CruiseMissile | 300-500 km | Operational |
| Agni-5 | ICBM | 5000-8000 km | In Development |
| Agni-4 | IRBM | 3500-4000 km | In Development |
| Agni-3 | IRBM | 3000-5000 km | Operational |
| Agni-2 | MRBM | 2000-3500 km | Operational |
| Agni-1 | SRBM | 700-1200 km | Operational |

Source: Missile Defense Project, “Missiles of India,” Missile Threat, Center for Strategic and International Studies, June 14, 2018, last modified June 15, 2018, https://missilethreat.csis.org/country/india/.




**India's Ballistic Missiles**

## सागरी धोरण


भारताच्या मध्ययुगीन इतिहासात हिंदी महासागर हा तसा दुर्लक्षितच राहिला. मध्ययुगातील भारतातील बहुतांश राजे आणि सत्तांनी सागरी सामर्थ्याकडे दुर्लक्षच केले. त्यामुळे भारताला जेव्हा स्वातंत्र्य मिळाले, तेव्हा आपल्याकडे युद्धनौका आणि व्यापारी नौकांचा संपूर्ण अभाव होता. भारताने हळूहळू आपली बंदरे आणि नौकाबांधणीची क्षमता विकसित करण्यास प्रारंभ केला. त्यावेळी माझगाव आणि सिंदिया या दोनच ठिकाणी नौकाबांधणीची सुविधा उपलब्ध होती. तेथे नौकादुरुस्तीच्या सुविधाही फारशा समाधानकारक नव्हत्या.

भारत स्वतंत्र झाला त्यावेळी पंडित जवाहरलाल नेहरू आणि अर्ल माऊंटबॅटन यांनी भारताच्या नौदलाच्या विकासाची एक योजना आखली. त्यावेळी पुढे भारतीय नौदलाचे प्रमुख झालेले व्हाईस ॲडमिरल सर एडवर्ड विल्यम पॅरी यांनी डिसेंबर १९४७ मध्ये भारताच्या नौदलविकासाची दीर्घकालीन योजना सादर केली. मात्र, आर्थिक व इतर मर्यादांमुळे, जम्मू-काश्मीरवरून झालेल्या पहिल्या भारत-पाकिस्तान युद्धात नौदलाला कोणतीही भूमिका बजावता आली नाही. १९४९ मध्ये भारताने इंडियन नेव्हल शिप विक्रांत (आयएनएस विक्रांत) ही पहिली विमानवाहू युद्धनौका खरेदी केली. नौदलासाठी काही विमानांची खरेदीही करण्यात आली.

हिंदी महासागरात भारतीय द्वीपकल्पीय स्थान भूराजकीय दृष्ट्या अतिशय मोक्याच्या ठिकाणी आहे. भारतीय सेनादलांचे सामर्थ्य वाढत असल्याने हिंदी महासागर विभागात महत्त्वाची सत्ता म्हणून भारताकडे पाहिले जाते. तरीही भूराजकीय दृष्ट्या भारताच्या हितसंबंधांच्या दृष्टीने कमकुवत दुवे (चोक पॉईंट्स) ठरू शकणारी काही महत्त्वाची ठिकाणे पुढीलप्रमाणे:

- पश्चिमेकडे अरबी समुद्रातील होर्मुझचे आखात, सुएझ कालवा आणि तांबडा समुद्र, बाब-एल-मंडबचे आखात आणि हॉर्न ऑफ आफ्रिका नावाने ओळखला जाणारा आफ्रिका खंडाच्या किनारपट्टीचा प्रदेश.
- पूर्वेकडे मलाक्का सामुद्रधुनी, लोंबोक सामुद्रधुनी आणि सुंदा सामुद्रधुनी हा प्रदेश.
- भारतीय सागरी सीमेला लागून असलेल्या सिक्स डिग्री चॅनेल आणि नाइन डिग्री चॅनेल म्हणून ओळखला जाणारा भाग.

या सामरिक दृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणांवर वर्चस्व राखणे भारतीय नौदलासाठी अतिशय आवश्यक आहे. अन्यथा भारताची सागरी कोंडी करण्यासाठी शत्रू या ठिकाणांचा उपयोग करू शकतो.




**चोक पॉईंट्स; हिंदी महासागर**

भारतीय नौदलाची दीर्घकालीन सागरी योजना पहिल्यांदा १९४८ मध्ये नेव्ही प्लॅन्स पेपरमध्ये (नौदल योजनेची कागदपत्रे) मांडण्यात आली. त्यावेळी भारतीय किनारपट्टी आणि सागरी दळणवळणाच्या मार्गांचे रक्षण करण्याच्या दृष्टीने छोट्या विमानवाहू नौकांभोवती युद्धनौका आणि विनाशिकांचा (क्रूझर्स अँड डिस्ट्रॉयर्स) ताफा कार्यरत राखण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले. काश्मीरच्या प्रश्नावरून भारत आणि पाकिस्तानमध्ये झालेल्या पहिल्या युद्धात नौदलाची कोणतीही भूमिका नव्हती. तसेच, १९६५ च्या युद्धात भारताच्या व्यापारी मार्गांना संरक्षण देण्यापलीकडे भारतीय नौदलाची भूमिका नव्हती. १९७१ च्या युद्धात मात्र भारतीय नौदलाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

भारतीय नौदलाच्या दीर्घकालीन सागरी व्यूहनीतीमध्ये (मेरिटाईम स्ट्रॅटेजी) भारताच्या परराष्ट्र धोरणांमध्ये नौदलाचे सामर्थ्य प्रतिबिंबित व्हावे, अशी अपेक्षा आहे. भारतीय नौदलाने त्यादृष्टीने निश्चित केलेली लक्ष्ये आणि महत्त्वाचे प्रदेश पुढीलप्रमाणे:

(अ) अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरात भारताची मुख्य भूमी आणि भारतीय बेटांच्या किनारपट्टीलगतचा उथळ भाग आणि विस्तारित आर्थिक क्षेत्राचा (एक्स्टेंडेड इकॉनॉमिक झोन) समावेश होतो. त्यांचे रक्षण भारतासाठी अतिशय महत्त्वाचे आहे.

(ब) हिंदी महासागरात प्रवेश करण्याचे किंवा बाहेर जाण्याचे चिंचोळे सागरी मार्ग – उदाहरणार्थ, मलाक्का सामुद्रधुनी, होर्मुझचे आखात, बाब-एल-मंडबचे आखात, केप ऑफ गुड होपचा किनारा

(क) हिंदी महासागरातील बेटांवर वसलेले देश

(ड) खनिज तेल आणि नैसर्गिक वायूच्या सुरक्षित पुरवठ्यासाठी पर्शियाचे आखात

(ई) हिंदी महासागरातून जाणारे महत्वाचे आंतरराष्ट्रीय व्यापारी मार्ग

दुय्यम, तरीही भारताच्या हितसंबंधांवर प्रभाव टाकू शकणारे प्रदेश ;

(अ) हिंदी महासागराचा दक्षिणेकडील प्रदेश

(ब) तांबडा समुद्र

(क) दक्षिण चिनी समुद्र

(ड) प्रशांत महासागराचा पूर्वेकडील प्रदेश

भारतीय नौदलाच्या व्यूहनीतीमध्ये (इंडियन मेरिटाइम डॉक्ट्रीन) नौदलाला बळाचा वापर करून हस्तक्षेप करावा लागण्याच्या शक्यता पुढीलप्रमाणे:

(i) भारताच्या सीमांना लागून असलेल्या देशांशी संघर्ष किंवा या प्रदेशात बाहेरील शक्तींच्या हितसंबंधांशी संघर्ष

(ii) भारताशी मैत्रीचे संबंध असलेल्या एखादया शेजारी किंवा सामरिक संबंध असलेल्या देशाने मदतीसाठी केलेली विनंती

(iii) एकतर्फी किंवा इतर देशांच्या साहाय्याने एखादी महत्त्वपूर्ण दहशतवादविरोधी मोहीम

(iv) विविध देशांशी केलेल्या द्‌विपक्षीय सामरिक भागीदारीनुसार येणाऱ्या कर्तव्यांचे पालन करताना होऊ शकणारा संघर्ष

(v) शस्त्रास्त्रे किंवा मादक पदार्थांची चोरटी वाहतूक किंवा अप्रत्यक्ष युद्‌धाच्या स्थितीत प्रतिहल्ला म्हणून कराव्या लागू शकणाऱ्या कमी तीव्रतेच्या नाविक मोहिमा (लो इंटेसिटी मेरिटाईम ऑपरेशन्स)

(vi) हिंदी महासागरातील आंतरराष्ट्रीय सागरी मार्गांचे रक्षण करण्याची असलेली जबाबदारी

(vii) परदेशातील मूळ भारतीय वंशाचे नागरिक किंवा भारताच्या राष्ट्रीय हितसंबंधांच्या रक्षणासाठी आखाव्या लागणाऱ्या मोहिमा

(viii) संयुक्त राष्ट्रांच्या मार्गदर्शनाखाली किंवा इतर बहुदेशीय मोहिमांचा भाग म्हणून शांतता प्रस्थापनेसाठी आखाव्या लागणाऱ्या मोहिमा

भारतीय नौदलाच्या गेल्या काही वर्षांतील कामगिरीचा आढावा घेतला असता सामरिक हितसंबंधांच्या रक्षणासाठी पुढाकार घ्यावी लागणारी उदाहरणे आपल्याला सापडतात. उदाहरणार्थ, १९९८ मध्ये मालदीवमध्ये लोकशाही मार्गाने नियुक्त सरकारच्या रक्षणासाठी भारताला वेगाने कारवाई करावी लागली. श्रीलंकेच्या संदर्भात किनारपट्टीला उद्‌भवणाऱ्या धोक्यांवर उपाययोजनेपासून ते समुद्रात अडकलेल्या लोकांच्या सुटकेसाठीच्या हालचालींचा समावेश आहे. लेबनॉनमध्ये २००६ मध्ये अडकलेल्या भारतीय, नेपाळी आणि श्रीलंकेच्या नागरिकांच्या सुखरूप सुटकेसाठी भारतीय नौदलाने मोठे योगदान दिले. एडनच्या आखातात होणाऱ्या समुद्री चाच्यांच्या उपद्रवाला पायबंद बसावा म्हणून भारतीय नौदलाने २००८ पासून तेथे सक्रियपणे कारवाया केल्या आहेत.

**ऑपरेशन राहत**

२०१५मध्ये सौदी अरेबियाने येमेनमध्ये लष्करी हस्तक्षेप केला. तेव्हा एप्रिल २०१५ मध्ये भारतीय सेनादलांनी येमेनमध्ये अडकलेल्या भारतीय व इतर परकीय नागरिकांच्या सुटकेसाठी महत्त्वपूर्ण मोहीम राबवली. ती "ऑपरेशन राहत" म्हणून ओळखली जाते. या मोहिमेत ४६४० पेक्षा जास्त भारतीय नागरिक आणि ४१ देशांमधील सुमारे ९६० परकीय नागरिकांची सुटका भारतीय सेनादलांनी येमेनमधून केली. आय एन एस सुमित्रा, आय एन एस मुंबई, आय एन एस टर्कश या तीन भारतीय नौसेनेच्या जहाजांनी मोहिमेत सहभाग घेतला. एडन बंदरातून ही कार्यवाही राबवली गेली.

बदलत्या काळात भारतीय नौदल हा युद्‌धनौका खरेदी करणाऱ्यांचा देश अशी प्रतिमा बदलून युद्‌धनौकांची बांधणी करणारा देश अशी प्रस्थापित करण्यासाठी योजनाबद्‌ध प्रयत्न सुरू आहेत. भारत आता इतर प्रगत देशांच्या बरोबरीने आधुनिक युद्‌धनौकांची बांधणी करत आहे. भारताने एखाद्या देशाशी युद्‌धनौका खरेदीचा करार केला, तरी त्यातील बहुतांश साहित्य- विशेषतः

संवेदक (सेन्सर्स) आता भारतीय बनावटीचे असतात. १९६० च्या दशकाच्या मध्यावर भारताने पाणबुड्यांच्या बांधणीलाही सुरुवात केली. अण्वस्त्रसज्ज आणि अणुऊर्जेवर चालणाऱ्या पाणबुड्या तयार करण्यासाठी भारताने तीस वर्षे कालावधीची महत्त्वाकांक्षी योजनाही आखली आहे.

**तुम्हांला माहीत आहे का?**

देशोदेशींच्या नौदलांची 'ब्राऊन वॉटर' आणि 'ब्ल्यू वॉटर' अशी दोन प्रकारे वर्गवारी करण्यात येते. देशांच्या युद्धनौका किनाऱ्यालगत कारवाई करतात की खुल्या महासागरात यावरून त्यांची कारवाई करण्याची क्षमता किती आहे, ही वर्गवारी करण्यात येते. १९६० च्या दशकापर्यंत भारतीय नौदलाकडे अतिशय तुटपुंज्या प्रमाणात युद्धनौका होत्या, त्यांची क्षमताही फार नव्हती. त्यामुळे भारतीय नौदल ब्राऊन वॉटर नेव्हीतच गणले जात होते.

**तुम्हांला माहीत आहे का?**

**इंडियन ओशन नेव्हल सिंपोझियम (IONS) (हिंदी महासागर क्षेत्रातील नाविक संमेलन)**

हिंदी महासागराच्या क्षेत्रातील किनारी देशांच्या नौदलांनी पुढाकार घेऊन एकत्रित येऊन २००८ मध्ये एक संमेलन घेतले. हे संमेलन भारताच्या नौदलाच्या नेतृत्वाखाली घेतले गेले. सागरी क्षेत्रातील सहकार्य आणि प्रादेशिक पातळीवर सुरक्षाविषयक सहकार्य हे या संमेलनाचे उद्दिष्ट होते. हिंदी महासागराच्या क्षेत्रात सागरी सुरक्षिततेच्या रचनेची बांधणी करण्यासाठी या देशांमध्ये शांततेचे संबंध असणे गरजेचे असते. एकत्रितपणे सहकार्याने कार्य करण्यासाठी चर्चेच्या मार्गाने नाविक रणनीतीची आखणी करणे गरजेचे असते. हे कार्य IONS करते. आज IONS ची २३ सभासद राष्ट्रे आणि ९ निरीक्षक राष्ट्रे आहेत.

**For further details see:**

Technology Areas: Missiles, DRDO, India.
https://www.drdo.gov.in/drdo/English/index.jsp?pg=tech_missiles.jsp
Indian Navy: Indian Maritime Doctrine - 2015 Version
https://www.indiannavy.nic.in/content/indian-maritime-doctrine-2015-version

## स्वाध्याय

**प्र. १ (अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.**

(i) आण्विकप्रसारबंदी कराराचे उद्दिष्ट .............................. आहे.
(अ) सुरक्षित अणुचाचण्यांचा विकास करणे.
(ब) अण्वस्त्रांच्या प्रसारावर बंदी घालणे.
(क) क्षेपणास्त्र तंत्रज्ञानाच्या प्रसारावर बंदी घालणे.
(ड) अण्वस्त्रधारी देश आणि अण्वस्त्र नसलेल्या देशांत चर्चा करणे.

(ii) हिंदी महासागरातील क्षेत्रातील एक चोक पॉईंट (बंदिस्त करता येणारे ठिकाण) भारताच्या सागरकिनाऱ्याजवळ ................... येथे आहे.
(अ) ६° चॅनल
(ब) सुवेझ कालवा
(क) सुंदा सामुद्रधुनी
(ड) मलाक्का सामुद्रधुनी

**(ब) योग्य कारण देऊन वाक्य पूर्ण करा.**

(i) १९७४ नंतरच्या भारताच्या चाचण्यानंतरच्या आण्विक धोरणाला 'जाणीवपूर्वक संदिग्धता' असे म्हणतात.

(ii) भारताला जहाज बांधणी करून नौदल उभारावयाचे आहे.

**(क) खालील विधानाबाबत योग्य संकल्पना लिहा.**

(i) खुल्या महासागरात राहून कारवाई करण्याची क्षमता असणारे नाविक दल

**(ड) गटात न बसणारा शब्द शोधा.**

(i) सायरस, अग्नी, पृथ्वी, ब्राह्मोस

**प्र. २ खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण लिहा.**

(i) युरेनियम आणि थोरियम या आण्विक इंधनांवर भारताचा अणुऊर्जा कार्यक्रम आधारित आहे.

(ii) नागरी आणि लष्करी हेतूने कोणीही व कोठेही अणुस्फोट करण्यावर अणुप्रसार बंदी करारानुसार बंदी आहे.

**प्र. ३ सहसंबंध स्पष्ट करा.**

(i) अण्वस्त्रप्रसारबंदी करार आणि सर्वसमावेशक चाचणी बंदी करार.

(ii) ब्लू वॉटर नेव्ही आणि ब्राऊन वॉटर नेव्ही

**प्र. ४ खालील चित्र पहा आणि त्याबद्दल थोडक्यात माहिती लिहा.**



**प्र. ५ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(i) भारतीय नौदलाची आजची सागरी युद्धनीती कोणती ?

(ii) भारताच्या आण्विक सिद्धांताचे मुख्य स्वरूप कोणते ?

**उपक्रम**

भारताच्या उपग्रहविरोधी क्षेपणास्त्राच्या चाचणी संदर्भातील शक्ती मोहिमेसंबंधीची माहिती संकलित करा. त्याच्या महत्त्वाबाबत वर्गात चर्चा करा.

# अंतर्गत सुरक्षा

राष्ट्रीय सुरक्षेकडे बघण्याचा पारंपरिक दृष्टिकोन बहुधा सैनिकी सामर्थ्यापुरता मर्यादित राहतो. देशाच्या सीमांचे रक्षण करणे, याच्या पलीकडे त्याची सहसा मजल जात नाही. मात्र, १९७० च्या दशकातील जागतिक तेलसंकटाने अनेक देशांच्या या पारंपरिक समजुतीला मोठा धक्का दिला. त्यातून सध्याचे जग हे आता परस्परांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असल्याची प्रकर्षाने जाणीव झाली. तसेच, विकसित देशही अनेक प्रकारच्या साधनसंपत्तीसाठी विकसनशील देशांवर अवलंबून असतात, हेही सर्वांना कळून चुकले. विविध देश परस्परांवर अवलंबून असणाऱ्या या जगात आर्थिक सुरक्षेची कल्पना त्यामुळेच महत्वाची ठरते.

**तुम्हांला माहीत आहे का?**

**१९७३ चे तेलसंकट :** ऑर्गनायझेशन ऑफ अरब पेट्रोलियम एक्स्पोर्टिंग कंट्रीज (OAPEC) या संघटनेत ऑईल प्रोड्युसिंग अँड एक्स्पोर्टिंग कंट्रीजमधील (तेल उत्पादक देशांची संघटना – OPEC) अरब देशांव्यतिरिक्त इजिप्त आणि सिरियाचाही यात समावेश आहे. इस्राईलच्या सिरिया आणि इजिप्तशी झालेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर इस्राईलला पाठिंबा देणाऱ्या देशांना आपण खनिज तेल देणार नाही, अशी भूमिका या संघटनेने घेतली. त्यामुळे अमेरिकेसह पश्चिम युरोपमधील देशांच्या खनिज तेलाच्या पुरवठ्यावर परिणाम झाला. त्याचबरोबर तेलउत्पादक देशांच्या संघटनेने खनिज तेलाच्या किमतीतही वाढ केली. या हालचालींचा जागतिक अर्थव्यवस्थेवर घातक परिणाम झाला. त्याला '१९७३ चे तेलसंकट' असे संबोधले जाते.

सोव्हिएत रशियाचे १९९१मध्ये विघटन झाल्यानेही राष्ट्रीय सुरक्षेसंबंधीच्या कल्पनांमध्ये मोठे बदल झाले. सुरक्षेच्या पारंपरिक संकल्पनेत राज्याच्या भूमिकेला मोठे महत्व आहे. मात्र, आता हा केंद्रबिंदू राज्यसंस्थेकडून जनतेकडे सरकला आहे. सर्वंकष सुरक्षा (कॉम्प्रिहेन्सिव्ह सिक्युरिटी) ही संकल्पना आता प्राधान्याने मांडण्यात येत आहे. या संकल्पनेत राज्यसंस्थेच्या सुरक्षाविषयक गरजा आणि जनतेच्या सुरक्षाविषयक गरजा यांची सांगड घालण्याचा प्रयत्न होत आहे. सर्वसामान्य जनता आणि समाजावर सुरक्षेचा मोठा परिणाम होत असल्याने त्याकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहता यावे, या हेतूने सर्वंकष सुरक्षा ही संकल्पना मांडण्यात येत आहे. या संकल्पनेत पुढील विषयांचा गांभीर्याने विचार करण्यात येतो :

(i) **पर्यावरण सुरक्षा :** पर्यावरणाशी संबंधित अनेक बाबींचा यात समावेश होतो. उदाहरणार्थ, ऊर्जाविषयक समस्या, लोकसंख्यावाढीचे परिणाम, अन्नधान्य निर्मितीच्या समस्या, परिसंस्थेत होणारे बदल, दीर्घकाळ चालू न शकणाऱ्या उत्पादनव्यवस्थेमुळे होणारे आर्थिक परिणाम, पर्यावरणाचा नागरी जीवनावर होणारा परिणाम इत्यादी.

(ii) **आर्थिक सुरक्षा :** राज्यसंस्थेच्या सामर्थ्याचा एक घटक म्हणून आर्थिक प्रगती साधण्यावर आर्थिक सुरक्षेचा भर असतो. आर्थिक साधनसंपत्ती आणि त्यांच्या पुरवठ्याचे संरक्षण हा आर्थिक सुरक्षेचा महत्वाचा भाग आहे.

(iii) **समाजाची सुरक्षा (सोसायटल सिक्युरिटी) :** स्थलांतरितांचे प्रश्न, सामाजिक व वांशिक विच्छेदनाचे प्रयत्न, विविध सामाजिक गटांमध्ये आर्थिक स्पर्धा आणि त्यातून उद्‌भवू शकणारे सामाजिक संघर्ष आदी बाबींचा समाजाच्या सुरक्षिततेत समावेश होतो.

(iv) **राजकीय सुरक्षा :** राज्यसंस्थेच्या अस्तित्वाला असलेल्या अंतर्गत सुरक्षा धोक्यांचा यात प्रामुख्याने समावेश होतो. त्यात बंडखोरी, हिंसक कारवाया, दहशतवाद आदींचा समावेश होतो.

यासंबंधीची चर्चा आता व्यापक प्रमाणात घडत असून, मानवी सुरक्षा हा शब्दप्रयोगही त्यासंदर्भात वापरला जाऊ लागला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या मानवी विकास अहवालातही सुरक्षेसंबंधी या नव्या विचारांचे प्रतिबिंब आता उमटत आहे. उदाहरणार्थ, १९९४च्या मानवी विकास अहवालात मानवी सुरक्षेसंबंधी दोन घटकांचा उल्लेख केला आहे. मानवी हक्क रक्षणाच्या वैश्विक जाहीरनाम्यातही त्यांचा उल्लेख आहे. हे घटक म्हणजेः भयापासून मुक्ती आणि गरजांपासून मुक्ती. १९९४च्या अहवालात मानवी सुरक्षेचे इतर सात पैलूही नमूद केले आहेत. ते याप्रमाणेः आर्थिक, अन्नधान्य, आरोग्य, पर्यावरण, वैयक्तिक, समुदाय आणि राजकीय. मानवी सुरक्षा संकल्पनेचा केंद्रबिंदू लोक (जनता) आहे. त्यामुळे या संकल्पनेला देशोदेशींच्या सीमांचेही त्या अर्थाने बंधन नाही. त्यांचा भर मानवी मूल्ये, व्यक्तींच्या प्रतिष्ठेचे रक्षण, सामाजिक न्याय, स्वातंत्र्य आणि समानता आदींवर आहे. या कल्पना आता भविष्यातल्या बहुदेशीय जागतिक व्यवस्थेच्या भाग बनल्या आहेत. ह्या बदलत्या संदर्भात अंतर्गत सुरक्षिततेच्या संकल्पनेचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

### अंतर्गत सुरक्षा

अंतर्गत सुरक्षा ही राष्ट्रीय सुरक्षेच्या पारंपरिक कल्पनेपेक्षा वेगळी आहे, ही बाब आता स्पष्ट झाली आहे. तिचा भर लोकांवर परिणाम करणाऱ्या राजकीय, आर्थिक आणि सामाजिक-सांस्कृतिक पैलूंशी आहे. विविध देशांची सरकारे, कायदा अंमलबजावणीच्या यंत्रणा आणि सुरक्षा यंत्रणाही आता हीच परिभाषा वापरत आहेत. केवळ देशांच्या सीमांचे संरक्षण याच्या पलीकडे जाऊन विविध गोष्टींचा साकल्याने विचार करणारी ही संकल्पना आहे. त्यात महापूर, वादळ, भूकंपासारख्या नैसर्गिक आपत्तींत लोकांचे संरक्षण करण्यापासून ते मादक पदार्थांची तस्करी, सायबर क्राईम, स्थलांतरितांचे प्रश्न यांसारख्या मानवनिर्मित समस्यांचाही समावेश होतो. त्यात पोलिस, निमलष्करी दले, सशस्त्र सेनादले यांच्या जोडीला स्थलांतर व सीमाशुल्कसंबंधित खाती, अग्निशमन दल आणि नागरी संघटनांचाही (सिव्हिल सोसायटी) समस्या निवारणासाठी/सुरक्षा कार्यासाठी एकत्रितरीत्या समन्वयाने उपयोग करण्याचा समावेश होतो.

अंतर्गत सुरक्षा हा शब्दप्रयोग १९८० आणि १९९० च्या दशकांमध्ये प्रामुख्याने प्रचलित झाला, तरी ही संकल्पना राष्ट्र-राज्य संकल्पनेइतकीच जुनी आहे. भारतीय संदर्भातही सुरक्षा या विषयाचे अनेक पैलू विचारात घेण्यात आले आहेत. उदाहरणार्थ, त्यासाठी संस्कृतमध्ये अनेक शब्द आहेत. रक्षः, रक्षणम्, रक्षकः असे शब्द 'रक्ष' या मूळ धातूपासून तयार झाले आहेत. रक्षचा अर्थ संरक्षण करणे, बचाव करणे, लक्ष ठेवणे असा आहे. तसेच, सुरक्षा हा शब्दही सर्व प्रकारच्या संरक्षणासाठी वापरला जातो. तसेच, अभयम् हा शब्द निर्भीड असणे, भयापासून मुक्त व सुरक्षित असणे यासाठी वापरला जातो. कौटिल्याच्या अर्थशास्त्रातही सुरक्षेचे अंतर्गत आणि बाह्य संरक्षण असे दोन पैलू सांगितले आहेत. अंतर्गत सुरक्षा नीट राखण्यासाठी 'दंडनीती' सांगितली आहे. कायदा सुव्यवस्था नीट राखणे आणि देशाच्या संपत्तीचे संरक्षण, संवर्धन व देखभाल करणे ही राजाची मूलभूत कर्तव्ये सांगितली आहेत.

संयुक्त राष्ट्राने २००४ मध्ये सध्याच्या काळातील बदल, धोके आणि आव्हाने यांच्या अभ्यासासाठी उच्चस्तरीय गट (यूएन हाय लेव्हल पॅनेल ऑन थ्रेट्स, चॅलेंजेस् अँड चेंज) स्थापन केला होता. सध्याच्या काळातील धोक्यांना राष्ट्रीय सीमांचे कोणतेही बंधन नाही, ते एकमेकांशी जोडलेले आहेत आणि त्यांचा सामना राष्ट्रीय, प्रादेशिक व जागतिक पातळीवर एकत्र येऊनच केला पाहिजे, असे प्रतिपादन या गटाने केले होते. या गटाने धोक्यांची सहा प्रकारांमध्ये वर्गवारी केली आहे, ती पुढीलप्रमाणेः

- आर्थिक आणि सामाजिक धोके. यात गरीबी, संसर्गजन्य रोगांचा प्रसार, पर्यावरणाची हानी, आदी बाबींचा समावेश आहे.
- आंतरराज्य संघर्ष
- अंतर्गत संघर्ष. यात यादवी युद्ध, वंशविच्छेदाचे प्रयत्न आणि मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या

अत्याचाराच्या इतर घटनांचा समावेश आहे.

- आण्विक, किरणोत्सारी, रासायनिक आणि जैविक अस्त्रांचा वापर
- दहशतवाद
- आंतरराष्ट्रीय संघटित गुन्हेगारी

भारतातही राष्ट्रीय सुरक्षेसंबंधी स्थापन करण्यात आलेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या एका मंत्रिगटाने दिलेल्या अहवालाद्वारे (२००१) अंतर्गत सुरक्षेसंबंधी पुढील गोष्टींकडे देशाचे लक्ष वेधले आहे.

- पूर्वोत्तर राज्यांमधील विप्लव (इन्सर्जन्सी)
- पंजाबमधील काही खलिस्तानवादी घटकांना पाकिस्तानकडून मिळणारी मदत व पाठिंबा
- पाकिस्तानच्या इंटरसर्व्हिसेस इंटेलिजन्स (आयएसआय) या संघटनेच्या भारतातील कारवाया आणि इस्लामी मूलतत्त्ववादाचा धोका
- शस्त्रास्त्रे आणि मादक पदार्थांची चोरटी वाहतूक आणि त्यांच्यातील परस्परसंबंध
- खोट्या चलनी नोटा बाजारात आणणे आणि अवैध मार्गाने पैशांचे हस्तांतर करणे
- बांगलादेशातून होणारे बेकायदेशीर स्थलांतर
- जातीय, जमातवादी आणि पांथिक हिंसाचार
- कडव्या डाव्या विचारसरणीच्या (माओवादी) चळवळी

केंद्रीय गृह मंत्रालयाच्या अंतर्गत सुरक्षा विभागाकडे देशाची अंतर्गत सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी आहे. त्यात विविध दहशतवादी संघटना व गटांच्या देशविरोधी आणि घातपाती कारवाया रोखणे, दहशतवाद्यांना होणारा वित्तपुरवठा रोखणे, दहशतवादविरोधी कारवाईत सुस्पष्टता येण्यासाठी धोरणे ठरवणे, आयएसआयच्या हालचालींवर लक्ष ठेवणे, विविध सुरक्षा परवाने वितरित करणे आणि दहशतवादविरोधी मोहिमेसाठी पाकिस्तानशी गृहसचिव पातळीवर चर्चांचे आयोजन करणे आदी गोष्टींचा समावेश होतो. केंद्रीय गृहमंत्रालयाच्या २०१७-१८ च्या वार्षिक अहवालात अंतर्गत सुरक्षेसंबंधी पुढील गोष्टींवर लक्ष केंद्रित करण्यास सुचवले आहे.

(i) देशाच्या अंतर्गत भागात होणारे दहशतवादी हल्ले

(ii) जम्मू-काश्मीरमध्ये सीमेपलीकडून घडवले जाणारे दहशतवादी हल्ले (क्रॉसबॉर्डर टेररिझम)

(iii) पूर्वोत्तर राज्यांमधील विप्लव समस्या

(iv) देशाच्या काही भागात कडव्या डाव्या विचारसरणीच्या (माओवादी) संघटनांकडून होणाऱ्या हिंसक कारवाया

या प्रकरणात भारताच्या अंतर्गत सुरक्षेला असलेल्या वरील चार प्रमुख धोक्यांचा आपण विचार करू.

**अंतर्गत सुरक्षेच्या संदर्भात भारताला करावे लागलेले संघर्ष**

| अ.क्र. | संघर्ष | कालावधी | वर्ष |
|---|---|---|---|
| १. | नागालँड | ऑगस्ट १९४७ ते आजपर्यंत | ७२ वर्षांहून अधिक काळ |
| २. | मणिपूर | १९६४ ते आजपर्यंत | ५५ वर्षांहून अधिक काळ |
| ३. | मिझोराम | १९६६-८८ | २२ वर्षे |
| ४. | मेघालय | १९८८ ते आजपर्यंत | ३१ वर्षांहून अधिक काळ |
| ५. | त्रिपुरा | १९६५ ते आजपर्यंत | ५४ वर्षांहून अधिक काळ |
| ६. | आसाम | १९७९ ते आजपर्यंत | ४० वर्षांहून अधिक काळ |
| ७. | पंजाब | १९७८ ते १९९३ | १६ वर्षे |
| ८. | जम्मू-काश्मीर | १९८८ ते आजपर्यंत | ३१ वर्षांहून अधिक काळ |
| ९. | डाव्या विचारसरणीचा हिंसाचार नक्षलवाद/माओवाद | १९६७ ते आजपर्यंत | ५२ वर्षांहून अधिक काळ |

# दहशतवाद

समाजात दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने घडवून आणलेला हिंसाचार म्हणजे दहशतवाद असे सामान्यपणे समजले जाते. त्याबाबत आणखी स्पष्टता येण्यासाठी अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याने केलेली दहशतवादाची व्याख्या आपण पाहू. 'भूमिगत पद्धतीने काम करणाऱ्या संघटना किंवा वेगळी राष्ट्रीय अस्मिता जोपासणाऱ्या (सबनॅशनल) गटांनी समाजात मोठ्या प्रमाणावर प्रभाव (दहशत) निर्माण व्हावा या उद्देशाने सर्वसामान्य किंवा सैनिकेतर लक्ष्यांविरुद्ध घडवून आणलेला पूर्वनियोजित व राजकीय हेतूंनी प्रेरित हिंसाचार म्हणजे दहशतवाद' असे त्यात म्हटले आहे. बाह्यतः ही गनिमी काव्याच्या पद्धतीने चाललेली लढाई वाटू शकते. परंतु, गनिमी काव्याच्या युद्धाप्रमाणे एखाद्या विशिष्ट भूप्रदेशावर नियंत्रण मिळवण्याच्या हेतूपुरत्या दहशतवादी कारवाया मर्यादित नसतात. त्याला विषम किंवा असमान युद्ध (असिमेट्रिक वॉरफेअर) असेही म्हटले जाते. याचे कारणही सहसा विषम सैनिकी सामर्थ्य असलेल्या दोन बाजूंमधली लढाई असते आणि हिंसाचार कधी, कुठे व कसा घडवला जाईल, याची कोणतीही खात्री नसते. ज्या निरपराध व्यक्ती वा समूहांकडे स्वतःचे संरक्षण करण्याची शक्ती नसते, अशांना लक्ष्य बनवून समाजात मोठ्या प्रमाणावर भयाचे किंवा दहशतीचे वातावरण तयार करण्याचा दहशतवाद्यांचा उद्देश असतो. अशा लक्ष्यांना 'सॉफ्ट टार्गेट्स' किंवा 'मृदू लक्ष्य' म्हटले जाते. सामान्य नागरिकांच्या प्रवासाची साधने असलेल्या बस व रेल्वेगाड्या, बस वा रेल्वेस्थानके, सिनेमागृहे, बाजारपेठा, मॉल अशी गर्दीची ठिकाणे दहशतवादी हल्ल्यांसाठी निवडतात. अशा हल्ल्यांमागे त्यांचा निश्चित असा राजकीय किंवा वैचारिक उद्देश असतो.

दहशतवादाची समस्या जगाला मोठ्या प्रमाणावर आता भेडसावत असली, तरी दहशतवाद हा शब्दप्रयोग प्रथम फ्रान्समधील १७९३-९४ च्या 'रेन ऑफ टेरर'च्या (दहशतीचे साम्राज्य) संदर्भात प्रथम वापरण्यात आला. फ्रान्समधील ऐतिहासिक राज्यक्रांतीचे नेतृत्व करणाऱ्यांनी क्रांतिकारी शक्तींमधील गद्दार किंवा क्रांतिद्रोही व्यक्ती-प्रवृत्तींना उखडून टाकण्यासाठी हिंसाचाराचा वापर केला. स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी दहशत उत्पन्न करणे हाच उत्तम उपाय असल्याचे समर्थन त्यांनी केले. मात्र, फ्रेंच राज्यक्रांती जसजशी पुढे गेली, तसा हा शब्द राज्यसंस्थेने घडवलेल्या हिंसाचाराशी (स्टेट व्हायोलन्स) आणि गिलोटिनच्या साह्याने क्रांतिकारी नेत्यांना मृत्यूदंड देण्याच्या घटनांशी जोडला गेला.

आधुनिक काळातील दहशतवादाचा आपण विचार करतो, तेव्हा १९७२ च्या म्युनिच ऑलिंपिकमध्ये इस्रायली खेळाडूंचे करण्यात आलेले अपहरण व हत्येच्या घटनेकडे निर्देश केला जातो. त्यानंतर जगभरात विविध ठिकाणी दहशतवादाच्या अनेक घटना घडल्या आहेत.

दहशतवादी अनेकदा एखादी अमूर्त विचारसरणी किंवा श्रद्धेच्या रक्षणासाठी लढत असतात. त्यांच्या विचारांना खतपाणी घालणाऱ्या दहशतवादी संघटनांचे ते सदस्य असतात. आधुनिक काळातील दहशतवाद हा प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा आहे. आताच्या घडीला जगातील अनेक देशांमध्ये दहशतवादी संघटना हिंसक कारवाया करत आहेत.

**आंतरराष्ट्रीय पातळीवरील दहशतवादी हल्ल्यांची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे:**

१.अमेरिकेमध्ये न्यूयॉर्क येथील वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या टॉवर्सवर ११ सप्टेंबर २००१ रोजी दहशतवाद्यांनी विमाने धडकवून या इमारती उद्ध्वस्त केल्या. याच दिवशी राजधानी वॉशिंग्टनसह इतर ठिकाणीही दहशतवाद्यांनी हल्ले केले. हे हल्ले '९/११ चे हल्ले' म्हणून ओळखले जातात.

२.इंडोनेशियातील बाली बेटांवर २००५ मध्ये दहशतवाद्यांनी एका पाठोपाठ एक बॉम्बस्फोटांची मालिका घडवली. दक्षिण बालीतील जिंब्रान आणि कुटा या पर्यटकांसाठी प्रसिद्ध असलेल्या चौपाट्यांवर हे स्फोट घडवण्यात आले.

३.२०१५ मध्ये फ्रान्सची राजधानी पॅरिसमध्ये फुटबॉलचा सामना सुरू असताना आत्मघातकी

हल्ला झाला. पाठोपाठ पॅरिस शहर आणि उपनगरातही काही ठिकाणी गोळीबार आणि आत्मघातकी हल्ल्यांच्या घटना घडल्या.

४.२०१७ मध्ये युनायटेड किंग्डममधल्या (ब्रिटन) लंडन ब्रिजवर एका भरधाव वाहनाने रस्ता सोडून पादचाऱ्यांना चिरडले. वाहन एके ठिकाणी धडकून थांबल्यानंतर हल्लेखोराने जवळच्याच बाजारपेठेत घुसून अनेकांवर सुऱ्याने वार केले.



गडचिरोलीतील भूसुरुंगाचा स्फोट : १ मे २०१९



पुलवामातील दहशतवादी हल्ला : १४ फेब्रुवारी २०१९

**भारतातील दहशतवादी हल्ल्यांची काही उदाहरणे:**

१. **संसदेवर हल्ला :** २६ डिसेंबर २००१ रोजी नवी दिल्लीतील संसदभवन परिसरात पाच सशस्त्र अतिरेकी घुसले. हल्लेखोर लष्कर-ए- तैयबा आणि जैश-ए-महंमदचे सदस्य होते.

२. **मुंबईवर हल्ला :** २६ नोव्हेंबर २००८ रोजी पाकिस्तानातून समुद्रमार्गे आलेले काही सशस्त्र दहशतवादी मुंबईत घुसले आणि त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, कामा हॉस्पिटल, लिओपोल्ड कॅफे, ताज हॉटेल, ओबेरॉय ट्रायडेन्ट हॉटेल, नरिमन हाऊस अशा विविध ठिकाणी हल्ले केले. हे सर्व पाकिस्तानातील लष्कर-ए-तैयबा या दहशतवादी संघटनेचे सदस्य होते.

३. **उरी लष्करी तळावर हल्ला :** १८ सप्टेंबर २०१६ रोजी पहाटे काश्मीरमधील उरी येथील लष्करी तळावर जैश-ए-महंमदच्या दहशतवाद्यांनी हल्ला केला.

४. **पुलवामा हल्ला :** १४ फेब्रुवारी २०१९ रोजी केंद्रीय राखीव पोलिस दलाचा ताफा जम्मू-श्रीनगर महामार्गाने जात असताना त्यावर मोठ्या प्रमाणात स्फोटके लावलेली मोटार धडकवण्यात आली. या हल्ल्याची जबाबदारी पाकिस्तानातील जैश-ए-महंमदने स्वीकारली.

५. **गडचिरोलीतील नक्षली हल्ला :** १ मे २०१९ रोजी महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यात भूसुरुंगाच्या स्फोटात पंधरापेक्षा जास्त जवान हुतात्मा झाले. हा स्फोट नक्षलवादी संघटनांनी घडवून आणला.

**आपण साधारणपणे पाच प्रकारांत दहशतवादाची विभागणी करू शकतो.**

**(अ) स्वतंत्र राष्ट्राची निर्मिती किंवा एखाद्या देशापासून फुटून निघण्याच्या उद्देशाने केला जाणारा दहशतवाद :** स्वतःच्या स्वतंत्र राष्ट्रीय किंवा वांशिक अस्मितेतून एखाद्या देशापासून फुटून निघण्याच्या मागणीसाठी हिंसाचाराचा वापर केला जातो, तेव्हा तो या प्रकारातला दहशतवाद समजला जातो. (उदाहरणार्थ, ब्रिटिशांच्या जोखडातून उत्तर आयर्लंड स्वतंत्र करणे आणि संपूर्ण आयर्लंडच्या एकीकरणाच्या उद्देशाने 'आयरिश रिपब्लिकन आर्मी' ही दहशतवादी संघटना कार्यरत आहे. इराकमध्ये स्वतंत्र कुर्दिस्तानसाठी 'कुर्दिश वर्कर्स पार्टी (PKK)' ही दहशतवादी संघटना काम करते. श्रीलंकेत स्वतंत्र तामिळ राष्ट्राच्या मागणीसाठी हिंसक कारवाया करणारी लिबरेशन टायगर्स ऑफ तामिळ ईलम (LTTE) ही दहशतवादी संघटनाच होती. भारतातही स्वतंत्र खलिस्तानच्या मागणीसाठी पंजाबमध्ये दहशतवादी कारवायांचा आगडोंब उसळला होता.

**(ब) धार्मिक दहशतवाद :** धर्माच्या अमूर्त संकल्पना व धार्मिक समजुतींचा गैरवापर करून दैवी आदेश पाळण्यासाठी लोकांची मनोभूमिका तयार करून माजवला जाणारा हिंसाचार या प्रकारात मोडतो. या प्रकारात प्रस्थापित यंत्रणेत बदल घडवून आणण्यासाठी शत्रूबद्दलच्या विशिष्ट कल्पना किंवा प्रतिमा प्रसारित केल्या जातात आणि त्याआधारे हिंसाचाराला उद्युक्त केले जाते. (उदाहरणार्थ, जपानमधील ओम शिनिरिक्यो या पंथाला जगातील अनेक देशांनी दहशतवादी संघटना म्हणून जाहीर केले. तथाकथित भ्रष्ट राजवटी उलथून त्या जागी शुद्ध इस्लामी सरकारे स्थापन करण्याच्या उद्देशाने अल कायदा ही दहशतवादी संघटना काम करते. इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड सिरिया (आयसिस) या दहशतवादी संघटनेचा उद्देश इस्लामी कायद्यांची कठोर अंमलबजावणी करणारी खिलाफत स्थापन करणे हे होते.)

**(क) कडव्या डाव्या विचारसरणीतून उभा राहिलेला दहशतवाद :** भांडवलशाही समूळ नष्ट करून त्या जागी साम्यवादी सत्ता स्थापन करण्याच्या उद्देशाने हिंसेचे समर्थन व अवलंब करणाऱ्या दहशतवादी संघटना या प्रकारात येतात. उदाहरणार्थ, रेड आर्मी फॅक्शन हा भूतपूर्व पश्चिम जर्मनीतील कडव्या डाव्या विचारसरणीचा हिंसक दहशतवादी गट होता. भारतातील नक्षलवाद किंवा माओवादाचे उदाहरणही यासंदर्भात देता येईल.

**(ड) कट्टर उजव्या विचारसरणीतून उभा राहिलेला दहशतवाद :** उदारमतवादी लोकशाहीवादी सरकारांच्या विरोधात कट्टर उजव्या विचारसरणीच्या संघटनांकडून केला जाणारा हिंसाचार व दहशतवाद या प्रकारात मोडतो. (उदाहरणार्थ, जर्मनीतील निओनात्झी संघटना किंवा अमेरिकेतील क्लू क्लक्स क्लॅन संघटनेने केलेला हिंसाचार.)

**(ई) राज्यसंस्था पुरस्कृत दहशतवाद :** या प्रकारात एखादा देश किंवा राज्यसंस्था तिची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी स्वतःच दहशतवादी हिंसेचा मार्ग अवलंबते किंवा दहशतवादी संघटनांना आश्रय, प्रशिक्षण व शस्त्रास्त्रे आदींची मदत करून विरोधी देश किंवा संघटनांविरुद्ध त्यांचा उपयोग करते. (उदाहरणार्थ, भारताच्या पठाणकोट हवाईतळ (२०१६), उरी (२०१६) आणि पुलवामा (२०१९) येथील दहशतवादी हल्ल्यांमागे पाकिस्तानने उभी केलेली जैश-ए-महंमद ही संघटना आहे.)

### दहशतवादाचा सामना कसा करता येतो ?

**(i) संघर्ष व्यवस्थापन आणि समस्या निवारण:** दहशतवादाचा सामना करण्यासाठी भारताने त्रिस्तरीय दृष्टिकोन विकसित केला आहे. पहिली गोष्ट म्हणजे दहशतवादी हिंसेचे प्रमाण कमी करणे

आणि त्यापासून असलेला धोका विशिष्ट क्षेत्रापुरता मर्यादित करणे. याला संघर्ष व्यवस्थापन असेही म्हणतात. दहशतवादी त्यांच्या उद्दिष्टांसाठी हिंसाचार घडवत असल्याने तो निपटून काढण्यासाठी राज्यसंस्थेने बळाचा वापर करणे अपरिहार्य ठरते. पोलिस, निमलष्करी दले किंवा सैन्याचा वापर त्यासाठी केला जातो. दुसरी गोष्ट म्हणजे दहशतवादी हिंसेने ग्रस्त प्रदेशात विविध प्रकारच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासाच्या योजना सुरू करणे. तिसरी बाब म्हणजे लोकशाही यंत्रणेत सर्व घटकांना योग्य राजकीय प्रतिनिधित्व मिळण्याची खातरजमा करणे. यातल्या दुसऱ्या आणि तिसऱ्या बाबीचा समावेश सुशासनामध्ये होतो. स्थानिक जनता दहशतवाद्यांना आणि त्यांच्या हिंसक कारवायांना थारा देणार नाहीत, यासाठी सुशासन आवश्यक आहे; तर पहिल्या बाबीत यश मिळण्यासाठी आधुनिक शस्त्रास्त्रे आणि इतर साधनांच्या उपयोगातून दहशतवादी गटांवर आघात करणे आवश्यक ठरते.

(ii) **दहशतवादाविरोधात आंतरराष्ट्रीय आघाडी उभी करणे :** संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने २००६ मध्ये दहशतवादविरोधी लढ्याची जागतिक व्यूहनीती (ग्लोबल काऊंटर टेररिझम स्ट्रॅटेजी) स्वीकृत केली. त्याचे चार प्रमुख भाग आहेत. ते असे :

(अ) मानवी हक्कांचे उल्लंघन होणार नाही, वांशिक, राष्ट्रीय वा धार्मिक आधारावर भेदभाव होणार नाही, कोणताही समुदाय राजकीय प्रक्रियेच्या बाहेर राहणार नाही किंवा सामाजिक-आर्थिक दृष्ट्या परिघावर राहणार नाही, याबाबतची दक्षता सर्व देशांनी घ्यावी.

(ब) दहशतवाद रोखण्यासाठी आणि त्याचा सामना करण्यासाठी विविध देशांनी परस्परांना सहकार्य करावे.

(क) दहशतवादविरोधी लढ्यात संयुक्त राष्ट्राच्या भूमिकेला पाठबळ द्यावे

(ड) मानवी हक्कांबद्दल आदर बाळगावा.

(iii) **दहशतवादी संघटनांविरुद्ध कारवाई करणे:** अनेकविध प्रयत्नांनंतरही दहशतवादाची समस्या कायम राहत असेल, तर दहशतवाद्यांच्या जाळ्यांवर आणि त्यांच्या ठिकाणांवर कारवाई करणे अत्यावश्यक ठरते.

(iv) **वैचारिक लढाई :** दहशतवादी संघटना अनेक वेळा विशिष्ट राजकीय वा धार्मिक विचारसरणीसाठी लढत असतात. त्यांची ज्या विचारांवर श्रद्धा आहे, त्यांच्या रक्षणासाठी ते लढत असतात. ही गोष्ट लक्षात घेऊन दहशतवादी विचारांचा वैचारिक पातळीवरही सामना करणे अत्यावश्यक आहे.

## जम्मू आणि काश्मीर

जम्मू आणि काश्मीर राज्याचे ऑगस्ट २०१९ पूर्वी तीन ठळक विभाग होते. लडाख, काश्मीर आणि जम्मू. या राज्याच्या सीमा पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि चीनला लागून असल्याने भारताच्या दृष्टीने त्याचे सामरिक महत्त्व खूप आहे.

ब्रिटिशांनी भारत सोडताना भारतीय स्वातंत्र्याचा कायदा (इंडिया इंडिपेन्डन्स ॲक्ट) संमत केला. त्यानुसार भारत आणि पाकिस्तान अशी फाळणी झाली आणि कोणत्या देशात सामील व्हायचे किंवा स्वतंत्र रहायचे, याचे अधिकार संस्थानिकांना देण्यात आले. जम्मू-काश्मीर पाकिस्तानमध्ये सामील करावे, यासाठी महाराजा हरिसिंहांवर दबाव आणण्याचे प्रयत्न पाकिस्तानने केले. त्यासाठी ऑक्टोबर १९४७ मध्ये पठाणी टोळीवाल्यांनी जम्मू-काश्मीरवर आक्रमण केले. त्यात पाकिस्तानी सैनिकांचाही सहभाग होता. अशा परिस्थितीत महाराजा हरिसिंहांनी भारताकडे मदतीची विनंती केली आणि जम्मू-काश्मीर संस्थानच्या भारतात विलीनीकरणाच्या करारावर स्वाक्षरी केली.

काश्मीरी जनतेचे पाकिस्तानी टोळीवाल्यांपासून रक्षण करण्यासाठी भारताने जम्मू-काश्मीरमध्ये सैन्य पाठवले. अशा रीतीने भारत आणि पाकिस्तानमध्ये काश्मीरच्या मुद्द्यावरून १९४७-४८ मध्येच पहिले

युद्ध घडले. संयुक्त राष्ट्राच्या ठरावाने युद्धविराम झाला, मात्र काश्मीरचा काही भाग पाकिस्तानच्या ताब्यात राहिला. या प्रदेशाला 'पाकव्याप्त काश्मीर (POK)' असे संबोधले जाते.

जम्मू-काश्मीर भारतापासून मिळवण्यासाठी पाकिस्तानने वेळोवेळी हिंसेचा वापर केला आहे. १९६५ मध्ये पाकिस्तानने ऑपरेशन जिब्राल्टर ही मोहीम आखली. ती उघडकीस आल्यानंतर भारत-पाकिस्तान दरम्यान दुसरे युद्ध झाले. १९६५ मध्येच पाकिस्तानच्या चिथावणीने अमानुल्ला खान याने पाकव्याप्त काश्मीरमध्ये प्लेबिसाईट फ्रंट नावाची संघटना स्थापन केली. या संघटनेचा नॅशनल लिबरेशन फ्रंट नावाने अनधिकृत सशस्त्र विभाग आहे. या गटाने अनेक वर्षे जम्मू-काश्मीरमध्ये घातपाती कारवाया केल्या. १९७६ मध्ये प्लेबिसाईट फ्रंटचे रूपांतर जम्मू-काश्मीर लिबरेशन फ्रंट (JKLF) या नव्या दहशतवादी संघटनेत करण्यात आले. JKLF ची प्रमुख मागणी होती,काश्मीरच्या स्वतंत्र राज्याची निर्मिती.

**जम्मू-काश्मीरमधील दहशतवादी गट**

- जम्मू काश्मीर लिबरेशन फ्रंटची (JKLF) स्थापना १९७७ मध्ये युनायटेड किंग्डममध्ये (ब्रिटन) करण्यात आली.
- अफगाणिस्तानातील सोव्हिएत युनियनच्या फौजांशी लढण्यासाठी १९८० मध्ये हरकत-उल-मुजाहिदीनची स्थापना करण्यात आली. १९९३ मध्ये या संघटनेचे नाव हरकत-उल-अन्सार असे बदलण्यात आले. या दहशतवादी संघटनेच्या कारवाया प्रामुख्याने काश्मीरपुरत्याच मर्यादित होत्या. मात्र, यातूनच पुढे सन २००० मध्ये जैश-ए-महंमद ही दहशतवादी संघटना स्थापन झाली. मौलाना मसूद अजहर हा तिचा म्होरक्या आहे.
- लष्करे तैयबा या दहशतवादी संघटनेची स्थापना १९८७ मध्ये झाली. मरकझ-दवा-उल-इर्शाद (योग्य धार्मिक शिकवणीचे व प्रसाराचे केंद्र) या संघटनेची ती सशस्त्र आघाडी आहे. तिचे मुख्यालय पाकिस्तानातील लाहोरजवळील मुरिदके येथे आहे. जगभरात इस्लामी जिहादचा प्रसार करणाऱ्या सौदी अरेबियातील वहाबी इस्लामशी या संघटनेची जवळीक आहे.
- हिज्बुल मुजाहिदीन ही हरकत-उल-मुजाहिदीन, हरकत-उल-अन्सार, लष्करे तैयबा, जैश-ए-महंमद आदी दहशतवादी संघटनांनी स्थानिक काश्मिरी तरुणांची दिशाभूल (ब्रेनवॉशिंग) करून उभी केलेली दहशतवादी संघटना आहे.

जम्मू-काश्मीरमधील अंतर्गत सुरक्षेचा प्रश्न १९८० च्या दशकाच्या उत्तरार्धात उग्र होण्यास सुरुवात झाली. १९८९ मध्ये नॅशनल कॉन्फरन्स या पक्षाच्या कार्यकर्त्याची गोळी झाडून हत्या करण्यात आली. ही काश्मीरमधली पहिली राजकीय हत्या ठरली. त्याच सुमारास जेकेएलएफने तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री मुफ्ती महंमद सईद यांची मुलगी रुबियाचे अपहरण केले. जम्मू-काश्मीरचे स्वातंत्र्य ही या दहशतवादी संघटनेची प्रमुख मागणी होती.

अफगाणिस्तानातून सोव्हिएत फौजा माघारी गेल्यानंतर तिथल्या आघाडीवरून मोकळे झालेले मुजाहिदीन जम्मू-काश्मीरमध्ये वापरण्याची योजना पाकिस्तानने आखली. त्यासाठी हिज्बुल मुजाहिदिन ही पाकिस्तानी दहशतवादी संघटना स्थापन करण्यात आली. त्यामुळे काश्मीरमधील हिंसाचाराचे स्वरूप बदलले. पाकिस्तानने जेकेएलएफचा पाठिंबा व मदत बंद केली आणि त्याऐवजी काश्मीरमध्ये मुजाहिदिन घुसवण्यास सुरुवात केली. त्यामुळे १९९०च्या दशकात काश्मीरमध्ये धार्मिक मूलतत्त्ववाद पसरवून दहशतवाद सुरू झाला. परिणामी काश्मीर खोऱ्यातील पंडितांना तेथून स्थलांतर करणे भाग पडले.

कारगिलच्या संघर्षातही पाकिस्तानने केवळ मुजाहिदिन भारतीय सैन्याबरोबर लढत असल्याचे चित्र उभे करण्याचा प्रयत्न केला. प्रत्यक्षात पाकिस्ताननेच योजनाबद्ध पद्धतीने ही घुसखोरी केली आणि पाकिस्तानी सैन्याने मुजाहिदिनांचा आभास निर्माण करून त्याचा वापर केला, याचे ठोस पुरावे उपलब्ध आहेत.

गेल्या काही वर्षांत दहशतवादी कारवायांसाठी सुरू झालेला लहान मुलांचा वापर ही काश्मीरमधील एक चिंतेची गोष्ट आहे. सरकारकडे उपलब्ध माहितीनुसार, जम्मू-काश्मीरमधील किमान ३०  शाळा दहशतवादी संघटनांनी पूर्णपणे किंवा अर्धवट उद्‌ध्वस्त केल्या आहेत. या मुलांचा वापर रस्त्यांवर असंतोष फैलावण्यासाठी आणि पोलिसांवर दगड फेकण्यासाठी केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे.

जम्मू-काश्मीरमध्ये घातपाती कारवाया करणाऱ्या लष्कर-ए-तैयबा, हरकत-उल-मुजाहिदिन, जैश-ए-महंमद यासारख्या दहशतवादी संघटनांना पाकिस्तानने नेहमीच पाठिंबा दिला आहे व सर्व प्रकारची मदत केली आहे. उरी आणि पुलवामासारख्या दहशतवादी हल्ल्यांमागे याच संघटना होत्या. जम्मू-काश्मीरमधील दहशतवादी आणि फुटिरतावादी हिंसाचार हा सीमेपलीकडील शक्तींनी पुरस्कृत केलेला आणि पाठिंबा दिलेला हिंसाचार आहे. गेल्या अडीच दशकापेक्षा अधिक काळ जम्मू-काश्मीरला या समस्येचा सामना करावा लागत आहे.

### तुम्हांला माहीत आहे का?

**सर्जिकल स्ट्राईक** हा शब्द प्रयोग पत्रकारितेतून पुढे आला, जो प्रसारमाध्यमांनी वापरावयास सुरुवात केली. जमीन, समुद्र किंवा हवाई मार्गे शत्रूच्या ठिकाणांवर अचानक हल्ला किंवा छापा घालणे याला लष्करी दृष्ट्या लक्ष्यभेदी हल्ला म्हणतात. अशा हल्ल्यात नागरी वस्तीचे किंवा जनतेची कमीत कमी हानी होईल याची काळजी घेतली जाते. अशा हल्ल्यासाठी शासन, गुप्तचर संघटना आणि लष्कर यांच्यात समन्वय असण्याची गरज असते.

- उरीवर झालेल्या हल्ल्यानंतर भारताने २९ सप्टेंबर २०१६ रोजी पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांविरुद्‌ध सर्जिकल स्ट्राईक केला.
- २६ फेब्रुवारी २०१९ रोजी पाकिस्तानमधील खैबर-पख्तून प्रांतात असलेल्या बालाकोट शहराजवळील दहशतवादी छावण्यांवर भारताने हवाई हल्ला केला.


**ऐतिहासिक उदाहरण :** १६६० साली मराठी स्वराज्यावर आक्रमण करणाऱ्या शाहिस्तेखान या मोगल सरदारावर पुणे येथील लाल महालात वास्तव्य असताना छत्रपती शिवाजी महाराजांनी छापा घातला. या छाप्यामध्ये शाहिस्तेखानाला गंभीर इजा झाली. त्यानंतर शाहिस्तेखानाने पुण्याहून पलायन केले. पुणे शहराला किंवा रयतेला कोणतीही इजा न पोहचता हा छापा/हल्ला करून मोगलांना पुण्यातून हाकलण्याचे उद्‌दिष्ट साध्य झाले.

### चर्चा करा


ऑगस्ट २०१९ मध्ये भारतीय संविधानातील कलम ३७० अंतर्गत जम्मू काश्मीरला असलेला विशेष दर्जा रद्द करण्यात आला. जम्मू काश्मीर राज्याचे दोन केंद्र शासित प्रदेश म्हणून विभाजन केले गेले ते असे;

(i) जम्मू काश्मीर (विधानसभा असणार आहे.)

(ii) लडाख (विधानसभा असणार नाही.)



## भारताची पूर्वोत्तर राज्ये




भारताच्या पूर्वोत्तर किंवा ईशान्येकडील प्रदेशात आसाम, अरुणाचल प्रदेश, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, सिक्कीम आणि त्रिपुरा अशा आठ राज्यांचा समावेश होतो. या प्रदेशात स्वतःची स्वतंत्र भाषा, बोली आणि सामाजिक-सांस्कृतिक वैशिष्ट्ये असलेले दोनशेपेक्षा अधिक वांशिक समूह आहेत. ईशान्य भारत किंवा पूर्वोत्तर राज्ये म्हणून ओळखला जाणारा हा प्रदेश भारतासाठी सामरिकदृष्ट्या अतिशय महत्त्वाचा आहे. याचे कारण चीन, म्यानमार, बांगलादेश आणि भूतान या देशांशी त्यांच्या सीमा लागून आहेत.

ईशान्य भारतात बंडखोरीची पहिली गंभीर समस्या स्वातंत्र्यानंतर लगेचच नागा जमातीच्या बंडातून उभी राहिली. केंद्र सरकारने ते नियंत्रणात आणण्यासाठी सुरुवातीला मध्य प्रदेश विशेष सशस्त्र दलाचे पथक पाठवले. त्यानंतर भारतीय लष्कर आणि राज्य सशस्त्र पोलिस दलांच्या तुकड्या नागा बंडखोरांविरुद्ध लढण्यासाठी पाठवण्यात आल्या. नागालँडमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी १९६० च्या दशकात अनेक प्रयत्न झाले. पुढे १९७५ मध्ये केंद्र सरकार आणि नागा जमातींमध्ये शिलाँग करार होऊन नागांनी भारतीय संविधान मान्य केले. मात्र, पुढे नागा संघटनांमध्ये फूट पडली आणि त्यातून तयार झालेले अतिरेकी गट त्यानंतरही हिंसाचार करत राहिले. १९९० च्या दशकात प्रधानमंत्री पी. व्ही. नरसिंह राव यांनी नागा बंडखोरांशी संवादाचे पुन्हा प्रयत्न केले. त्यातून झालेला शांतता करार नंतरच्या सरकारांनी पुढे चालू ठेवला. भारतीय जनता पक्षाच्या सरकारने ४ ऑगस्ट २०१५ रोजी नॅशनल सोशलिस्ट कौन्सिल ऑफ नागालँड (इसाक-मुइवा) या बंडखोर गटाबरोबर शांततेसाठीचा करार केला. त्यातून नागालँडमध्ये कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

आसाममधील प्रमुख समस्या आधी पूर्व पाकिस्तान आणि नंतर बांगलादेशातून होणाऱ्या बेकायदेशीर घुसखोरीची आहे. त्याशिवायही वेगळ्या आसामच्या किंवा स्थानिक जमातींच्या वेगळ्या राज्यासाठी मागणी करणाऱ्या काही दहशतवादी संघटना तेथे कार्यरत आहेत. युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ आसाम (ULFA), नॅशनल डेमॉक्रॅटिक फ्रंट ऑफ बोडोलँड (साओराई ग्वारा NDFB-S), कार्बी पीपल्स लिबरेशन टायगर्स (KPLT) अशी काही नावे त्यासंदर्भात सांगता येतील.

**तुम्हांला माहीत आहे का?**

राष्ट्रीय नागरिक नोंदणी (National Register for citizens, NRC) असलेले भारतात आसाम हे एकमेव राज्य आहे. यात आसाममधील सर्व भारतीय नागरिकांची नावे, पत्ते आणि फोटो आहेत. आसाममध्ये बांगलादेशातून (पूर्वीचे पूर्व पाकिस्तान) मोठ्या प्रमाणात अवैध स्थलांतरीतांनी प्रवेश केला आहे. भारताच्या गृह मंत्रालयाने भारतीय नागरिक आणि अवैध स्थलांतरीत यांच्यात फरक करण्यासाठी १९५१ मध्ये ही राष्ट्रीय नागरिक नोंदणीचे दस्ताऐवज तयार केले. १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धाच्या दरम्यानच्या काळात आसाममध्ये मोठ्या प्रमाणात अवैध स्थलांतरीत आले होते. त्याचा परिणाम म्हणजे, सुमारे दहा वर्षे आसाममध्ये आंदोलन झाले. १९८५ मध्ये आसाम करार झाला आणि हे आंदोलन थांबले. त्या करारानुसार राष्ट्रीय नागरिक नोंदणी नव्याने करण्याचे ठरले.

आसाम कराराने स्थलांतरित व्यक्तींचे तीन गट केले.

- आसाममध्ये १९५१-६१ दरम्यान जे परदेशी नागरिक स्थलांतरीत झाले होते त्यांना पूर्ण नागरिकत्व देण्यात येईल तसेच मतदानाचा अधिकारदेखील मिळेल.
- १९६१-७१ दरम्यानच्या स्थलांतरितांना दहा वर्षे मतदानाचा अधिकार नसेल,परंतु त्यांना नागरिकत्व दिले जाईल.
- २४ मार्च १९७१ नंतरच्या स्थलांतरितांना हद्दपार केले जाईल.

स्थलांतरितांच्या वैधतेबाबत निर्णय घेण्यासाठी आसाम करारानुसार राष्ट्रीय नागरिक नोंदणीची प्रक्रिया नव्याने करण्यात आली. त्या प्रक्रियेची सुरुवात २०१३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या निरीक्षणाखाली झाली. ३१ ऑगस्ट २०१९ रोजी ही यादी जाहीर झाली.

अरुणाचल प्रदेशात एकही बंडखोर गट किंवा दहशतवादी संघटना नाही. मात्र, नागा बंडखोरांच्या घातपाती कारवायांचा उपद्रव या राज्याला अधूनमधून होत असतो.

मणिपूरमधील बंडखोरी ही प्रामुख्याने मैतेयी, नागा, कुकी, झोमी, हमार या स्थानिक जमातींमधील आपापसांतील संघर्षाचा परिणाम आहे. काही मुस्लीम दहशतवादी संघटनाही तेथे कार्यरत आहेत. मेघालयात गारो टेकड्यांमधील बंडखोरांच्या घातपाती कारवायांना पुन्हा उठाव देण्याचा प्रयत्न काही घटकांकडून सुरू आहे.

त्रिपुरामधील समस्याही आसामप्रमाणेच पूर्व पाकिस्तानातून झालेले स्थलांतर आणि नंतर बांगलादेशातून मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या बेकायदेशीर घूसखोरीची आहे. भारताची फाळणी झाली, त्यावेळी पूर्व पाकिस्तानातून त्रिपुरात मोठ्या प्रमाणावर निर्वासित आले. हे बहुसंख्येने बंगाली भाषिक होते. स्थानिक आदिवासी जमातींशी त्यांचा संघर्ष सुरू झाला. बांगलादेशाच्या निर्मितीनंतर बेकायदेशीर घुसखोरी चालूच राहिली. या सर्वांतून त्रिपुराच्या लोकसंख्येचे स्वरूप बदलले आहे. या राज्याची बांगलादेशाला लागून असलेली सीमा सच्छिद्र (पोरस) म्हणजे केव्हाही ये-जा करण्याइतकी सोपी आहे.

ईशान्य भारतातील विकास आणि सुरक्षेसंबंधीच्या विशेष गरजा लक्षात घेऊन केंद्रीय गृहमंत्रालयाने त्याच्या अंतर्गत स्वतंत्र पूर्वोत्तर राज्ये किंवा ईशान्य भारत विभाग स्थापन केला आहे. या प्रदेशाच्या विकासाचे नियोजन व कार्यवाहीसाठी याआधीच १९७२ मध्ये ईशान्य भारत परिषदेची (नॉर्थ ईस्टर्न कौन्सिल) स्थापना करण्यात आली आहे. या परिषदेने पूर्वोत्तर राज्यांमध्ये पायाभूत सुविधांचा विकास आणि सामाजिक-आर्थिक विकासासाठी अनेक महत्त्वाचे प्रकल्प हाती घेतले आहेत.

पूर्वोत्तर राज्ये किंवा ईशान्य भारतातील बंडखोरीमागे नेहमीच भारतबाह्य शक्तींचा हात राहिला आहे. उदाहरणार्थ, नागा बंडखोर नेता फिझो १९५६ मध्ये तेव्हाच्या पूर्व पाकिस्तानात गेला आणि तेथून ब्रिटनमध्ये आश्रयाला गेला. तिथूनच त्याने नागा बंडखोरांचे नियंत्रण

व नेतृत्व केले. उल्फा या दहशतवादी संघटनेने १९८५ पासूनच बांगलादेश आणि म्यानमारमध्ये प्रशिक्षण तळ उभारले होते. या संघटनेचे म्यानमारमधील काचीन इंडिपेंडन्स आर्मी या संघटनेशी लागेबांधे होते. मणिपूरमधील युनायटेड नॅशनल लिबरेशन फ्रंट (UNLF) या दहशतवादी संघटनेने पूर्व पाकिस्तानातील सिल्हेट येथे त्यांचे समांतर सरकार (गव्हर्नमेंट इन एक्साइल) स्थापन केले होते.

चीनने पूर्वोत्तर राज्यांमधील विविध बंडखोर गटांना नेहमीच उत्तेजन आणि अप्रत्यक्ष मदत दिली आहे. मैतेयी, मिझो, काचीन आणि आसामी दहशतवादी संघटना किंवा बंडखोर गटांमधील समन्वयाचे कामही चीन करत असे. ईशान्य भारतातील बंडखोरांसाठी बांगलादेश हे तर सर्वाधिक सुरक्षित आश्रयस्थान होते. मात्र, बांगलादेशालाच त्याची झळ पोहोचू लागल्यानंतर आणि २०१३ मध्ये तेथे घातपाती कारवाया झाल्यानंतर तेथील सरकारने दहशतवादी संघटनांविरुद्ध कारवाई सुरू केली आहे.

## कडव्या डाव्या विचारसरणीतून उभा राहिलेला दहशतवाद

नक्षलवादी किंवा आता माओवादी नावाने ओळखल्या जाणाऱ्या चळवळीला भूमिहीन शेतमजुरांचा पाठिंबा असल्याचे मानले जाते. भारतातील या चळवळीचा उगम १९४६ ते १९५१ दरम्यानच्या तेलंगणातील उठावात असल्याचे सांगितले जाते.

नक्षल चळवळीची खरी सुरुवात १९६७ मध्ये पश्चिम बंगालमधील नक्षलबारी येथे जमीनदारांविरुद्ध झालेल्या उठावातून झाली. या ठिकाणाच्या नावावरूनच ही नक्षलवादी चळवळ म्हणून ओळखली जाऊ लागली. चारू मुजुमदार यांनी केलेल्या मार्क्स, लेनिन आणि माओ झे डाँग या साम्यवादी नेत्यांच्या वैचारिक मांडणीतून या चळवळीचा पाया उभा राहिला.

या चळवळीचे हिंसक स्वरूप आणि धोका लक्षात घेऊन १९७०च्या दशकात सरकारने त्याविरुद्ध कठोर कारवाई सुरू केली. मुजुमदार व अन्य नेत्यांच्या अटकेने काही काळ ही चळवळ थंडावली. परंतु, १९८० मध्ये चळवळीने पुन्हा जोर धरला आणि दहशतवादी स्वरूप धारण केले. तिथून पुढे या चळवळीला कोणताही ठोस वैचारिक पाया राहिला नाही.

**तेलंगणा आंदोलन : (१९४६–१९५१)**

तेलंगणा नावाने ओळखला जाणारा आधीच्या आंध्र प्रदेशातील भाग आता स्वतंत्र राज्य बनला आहे. स्वातंत्र्याच्या वेळी हा भाग हैद्राबाद राज्याचा भाग होता. स्वातंत्र्यानंतर हैद्राबादचे भारतात विलीनीकरण करण्यात आले. त्याच सुमारास तेलंगणातील शेतमजुरांनी एकत्र येऊन जमीनदारांविरुद्ध मोठा उठाव केला. हा उठाव तेलंगणा आंदोलन म्हणून ओळखला जातो. हे आंदोलन घडवण्यामागे साम्यवादी आणि समाजवादी पक्षांनी उभे केलेले शेतमजुरांचे संघटन होते. अन्याय करणाऱ्या जमीनदारांविरुद्ध त्यांच्यात प्रचंड असंतोष होता.

सन २००४ मध्ये नक्षलवादी चळवळीशी संबंधित कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सवादी–लेनिनवादी) आणि इतर गट एकत्रित आले. त्यांनी कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (माओईस्ट) अशी नवी संघटना स्थापन केली. तेव्हापासून या दहशतवाद्यांना माओवादी म्हटले जाते. घनदाट जंगले किंवा पर्वतराजीच्या सामरिक दृष्ट्या महत्त्वाच्या परिसरात लोकांचे मुक्तिलढे उभारणे, गनिमी युद्धतंत्राचा विकास व विस्तार करणे अशी उद्दिष्टे या चळवळीने तिच्यासमोर ठेवली.

भारतातील साधारण १७० जिल्हे नक्षलवादी हिंसेने बाधित आहेत असे मानले जाते. नेपाळपासून ते कर्नाटक, केरळपर्यंत भारताच्या मध्य भागातून जाणाऱ्या दाट जंगलाच्या आणि आदिवासी वस्तीच्या परिसरात नक्षलवाद्यांनी वर्चस्व निर्माण केले आहे. त्याला रेड कॉरिडॉर किंवा लाल पट्टा असे म्हटले जाते. त्यात बिहार, झारखंड, ओरिसा, छत्तीसगड, मध्य प्रदेश, तेलंगणा आणि आंध्र प्रदेश आणि कर्नाटक आणि महाराष्ट्रातील काही भागांचा समावेश होतो.

२००६ मध्ये तत्कालीन प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंह यांनी देशाच्या सुरक्षेला असलेला सर्वांत मोठा, गंभीर व अंतर्गत धोका अशा शब्दांत नक्षलवादी

हिंसाचाराचे वर्णन केले होते. वाढत्या नक्षलवाद हिंसाचाराबद्दल बोलताना ते म्हणाले होते, "डाव्या विचारसरणीतून प्रभावित झालेला हिंसाचार हा आपल्या अंतर्गत सुरक्षेला असलेला सर्वांत मोठा धोका आहे."

माओवादी संघटनांच्या कारवाया देशातील प्रामुख्याने ग्रामीण आणि अविकसित भागात सुरू आहेत. हा प्रदेश मुख्यतः दाट जंगलाचा आणि दुर्गम डोंगराळ असा आहे. तेथे रस्ते, तसेच दळणवळणाच्या आणि आधुनिक संपर्क-संवादाच्या यंत्रणांचा अभाव आहे. त्यामुळे पोलिस आणि सुरक्षा दले या भागात प्रभावीपणे काम करू शकत नाहीत. याचा गैरफायदा घेऊन माओवादी/नक्षलवादी गटांनी प्रामुख्याने या प्रदेशांमध्ये त्यांचे वर्चस्व निर्माण केले आहे.

**माओवादी कारवायांची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील :**

(i) सरकारविरुद्ध अपप्रचार किंवा प्रचारतंत्राचा वापर करणे, तशा घोषणा तयार करणे

(ii) या घोषणांचा वापर करून सरकारविरोधात माओवादी विचारांवर आधारित आंदोलन उभे करणे किंवा प्रत्यक्ष हिंसक कृती घडवून आणणे

(iii) सर्वसामान्य लोक (मासेस) आणि बुद्धिजीवी वर्ग (क्लास) यांच्यात प्रचाराच्या यंत्रणा उभारणे

(iv) सरकार आणि प्रस्थापित यंत्रणांच्या विरोधात मोठ्या प्रमाणावर जनआंदोलन (मास मुव्हमेंट) उभे करणे

(v) महिला, आदिवासी आणि अल्पसंख्याकांना क्रांतीसाठी तयार करणे (मोबिलायझेशन)

(vi) नागरी भागातील वस्त्यांमध्ये क्रांतिकारक जनआंदोलनांना पूरक अशी मानसिकता तयार करणे

(vii) वेगवान आणि अनपेक्षित कारवायांसाठी 'आघात करा व पळून जा' यांसारखे डावपेच वापरणे

(viii) सशस्त्र क्रांतिकारी संघटनांचे वेगवेगळे नमुने (आकृतिबंध) उभे करणे

विविध देशांतील दहशतवादी संघटना त्यांच्या हिंसक कारवायांसाठी लहान मुलांचा वापर करत असल्याचे संयुक्त राष्ट्रांच्या एका अहवालात म्हटले आहे. त्यात नक्षलवादी संघटनांचाही उल्लेख आहे. नक्षलवादी संघटना परिसरातील लहान मुलांना बळजबरीने संघटनेत भरती करून त्यांची पथके (बालदस्ता) उभारतात. त्यांना विविध प्रकारचे प्रशिक्षण देतात. त्यांचा खबरे किंवा निरोपे म्हणून वापर करतात. तसेच, पायवाटा व रस्त्यांवर आधुनिक स्फोटके (इम्प्रोव्हाईज्ड एक्स्प्लोजिव्ह डिव्हायसेस – IED) पेरण्याचे कामही या मुलांमार्फत केले जाते. काही प्रसंगी पोलिस किंवा सैनिकांसमोर संरक्षक ढाल म्हणून लहान मुलांना उभे करण्याचे प्रसंगही घडले आहेत.

**डाव्या विचारसरणीतून उभा राहिलेला दहशतवाद म्हणजे काय?**

सन २००४ मध्ये तत्कालीन आंध्र प्रदेशात कार्यरत असलेला पीपल्स वॉर ग्रुप (PWG), बिहारमधील माओईस्ट कम्युनिस्ट सेंटर ऑफ इंडिया आणि इतर नक्षलवादी गट एकत्र येऊन त्यांनी कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (माओईस्ट) नावाने एकच दहशतवादी संघटना स्थापन केली. ही संघटना कडव्या डाव्या विचारसरणीवर आधारित आहे. बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायदा (अनलॉफुल एक्टिव्हिटीज प्रिव्हेन्शन ॲक्ट), १९६७ मधील तरतुदींनुसार ही संघटना व तिच्याशी संबंधित सर्व संस्था, नागरी भागात काम करणारे गट (फ्रंट ऑर्गनायझेशन्स) यांचा समावेश देशातील दहशतवादी संघटनांच्या यादीत करण्यात आला आहे. (लोकशाही मार्गाने सत्तेवर आलेले) सरकार उलथून टाकण्यासाठी सशस्त्र हिंसाचाराचा मार्ग अशी बंदी घातलेल्या माओवादी संघटनेची मुख्य विचारसरणी आहे.

**For details please see:**

**(1)** PM's speech at the Chief Minister's meet on Naxalism, April 13, 2006, New Delhi **See:**
https://archivepmo.nic.in/drmanmohansingh/speech-details.php?nodeid=302

(2) For legal details on Terrorism see: Counter Terrorism and Counter Radicalization Division, Ministry of Home, Government of India. The Division deals with matter relating to terrorism, counter-terrorism, radicalization, counter-radicalization, UAPA, NIA Act, FICN, FATF.

https://mha.gov.in/division_of_mha/counter-terrorism-and-counter-radicalization-division

**(2)** Chapter on Internal Security, Annual report, Ministry of Home, Government of India (Latest Report)

**https://mha.gov.in/documents/annual-reports**

OR https://mha.gov.in/sites/default/files/MINISTRY%20OF%20HOME%20AFFAIR%20AR%202017-18%20FOR%20WEB.pdf

## स्वाध्याय

**प्र. १ (अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.**

**(i)** सुरक्षा या संकल्पनेचा पारंपरिक अर्थ .................. यावर केंद्रित होतो.

(अ) राज्य

(ब) लोक

(क) लष्कर

(ड) शासन

**(ii)** नक्षलवाद म्हणून संबोधल्या गेलेल्या डाव्या विचारसरणीचा उगम ......... मध्ये झाला.

(अ) तेलंगणा चळवळ

(ब) बोल्शेविक क्रांती

(क) चीन येथील कम्युनिस्ट क्रांती

(ड) क्युबा येथील क्रांती

**(ब) योग्य कारण देऊन वाक्य पूर्ण करा.**

(i) आसाममधील अंतर्गत सुरक्षिततेची समस्या ही त्या ठिकाणाहून होणाऱ्या बेकायदेशीर स्थलांतरामुळे निर्माण झाली.

**(क) गटात न बसणारा शब्द शोधा.**

(i) IRA, LTTE, ETA, OPEC

**प्र. २ संकल्पना चित्र पूर्ण करा.**

भारताच्या पूर्वोत्तर भागात असलेली राज्ये खालीलप्रमाणे..

| | | | |
|---|---|---|---|
| आसाम | | | |
| | | | |

**प्र. ३ खालील विधान चूक की बरोबर ते सकारण लिहा.**

(i) नक्षलवादाची सुरुवात ही १९६७ मध्ये पश्चिम बंगालमधील नक्षलबारी येथे सरंजामशाही विरुद्धच्या लढ्याने झाली.

**प्र. ४ सहसंबंध स्पष्ट करा.**

(i) प्लेबिसाईट फ्रंट आणि जम्मू काश्मीर लिबरेशन फ्रंट.

**प्र. ५ खालील चित्र बघून त्यावर आपले विचार लिहा.**



**प्रश्न ६ खालील प्रश्नाचे उत्तर लिहा.**

(i) भारताचा दहशतवादविरोधी दृष्टिकोन काय आहे ते स्पष्ट करा.

**प्रश्न ७ दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सविस्तर उत्तर लिहा.**

(i) सर्वसमावेशक सुरक्षा म्हणजे काय ?

(अ) पर्यावरण सुरक्षा (ब) आर्थिक सुरक्षा

(क) सामाजिक सुरक्षा (ड) राजकीय सुरक्षा

**उपक्रम**

ईशान्य भारताचा नकाशा बघा. तेथील कोणतेही एक राज्य निवडा आणि त्याच्या सुरक्षाविषयक समस्यांचा अभ्यास करा. त्यावर टिपण लिहून वर्गात चर्चा करा.

# भारताचे स्वातंत्र्योत्तर सशस्त्र संघर्ष

भारताला स्वातंत्र्योत्तर काळात शेजारी देशांशी अनेक युद्धे लढावी लागली. त्यातील चार पाकिस्तानच्या विरुद्ध, एक चीनच्या विरुद्ध आणि एक पंधराव्या शतकापासून पोर्तुगीजांच्या अमलाखाली असलेल्या गोव्याला मुक्त करण्यासाठी होते. या सगळ्या युद्धांमुळे भारताच्या राजकारणावर आणि वित्तीय व्यवस्थेवर अत्यंत गंभीर परिणाम झाले. परंतु, या युद्धांमुळे भारत अधिक सक्षमही झाला. सामरिक शास्त्राचे विद्यार्थी या नात्याने तुम्हांला या युद्धांचा आढावा घेणे गरजेचे आहे. भारताला खाली दिलेली युद्धे लढावी लागली होती :

१. भारत – पाकिस्तान युद्ध १९४७-४८

२. जुनागड मुक्ती संग्राम – ऑक्टोबर १९४७

३. हैद्राबाद मुक्ती संग्राम – सप्टेंबर १९४८

४. गोवा दीव-दमण मुक्ती संग्राम – डिसेंबर १९६१

५. भारत – चीन युद्ध १९६२

६. भारत – पाकिस्तान युद्ध – १९६५

७. भारत – पाकिस्तान युद्ध – १९७१

८. पाकिस्तानविरुद्ध कारगिल संग्राम – १९९९

२२ ऑक्टोबर १९४७ रोजी पाकिस्तानने काश्मीरमध्ये छापे मारून प्रदेश काबीज करण्यासाठी घुसखोर पाठवले (त्यात प्रामुख्याने अफगाणिस्तानातील ड्युरंड रेषेच्या आसपासचे टोळीवाले होते), आणि त्यांची पाठराखण करायला पाकिस्तानच्या लष्करातील काही सैन्य होते. या टोळ्या सुरुवातीला पाकिस्तानच्या अबोटाबाद आणि मुझफ्फराबादमधून काश्मीरच्या पूंछ आणि राजौरी भागात आणि नंतर उत्तरेकडे गिलगिट व हुंझा भागातून घुसल्या. काही दिवसातच पाकिस्तानी सैन्याने जम्मू-काश्मीरच्या सीमेवर चौफेर हल्ले चढवले. महाराज हरिसिंगांच्या डोगरा फौजेने या हल्ल्यांचा प्रखरतेने सामना केला. परंतु ही डोगरा फौज संख्येने अपुरी पडली. २४ ऑक्टोबरला जेव्हा हे घुसखोर श्रीनगरच्या जवळ पोहोचले तेव्हा महाराज हरिसिंगांनी भारताकडे मदत मागितली. भारताने या मागणीचा विचार केला, परंतु, काश्मीर हे स्वतंत्र राज्य म्हणून घोषित झाले असल्यामुळे जोपर्यंत काश्मीर भारताचा अविभाज्य भाग म्हणून विलीन होत नाही तोपर्यंत ही मदत देण्यास नकार दिला. कारण भारत इतर राज्यांच्या या पेचात हस्तक्षेप करू इच्छित नव्हते. जर काश्मीर राज्य भारतात विलीन झाले तरच भारत मदत




भारत – पाकिस्तान युद्ध १९४७ – ४८

करू शकेल या भारताच्या भूमिकेमुळे, अखेरीस, जम्मू-काश्मीर संस्थान २७ ऑक्टोबर १९४७ रोजी भारतात विलीन झाले (या विलीनीकरणाच्या दस्ताऐवजाला "इंस्ट्रूमेंट ऑफ ॲक्सेशन" असे म्हणतात).

या दस्तऐवजावर स्वाक्षरी झाल्यावर काश्मीर भारताचा एक घटक झाले आणि भारताने आपली पहिली सैनिकी तुकडी डकोटा विमानांनी श्रीनगरला उतरवली आणि पाठोपाठ आणखी तुकड्या घुसखोरांना प्रत्युत्तर देण्यासाठी हवाई तसेच भूमार्गाने पाठवल्या. हळूहळू, शर्थीच्या चकमकी लढत, घुसखोरांना पीर-पंजाल पर्वतरांगांच्या आणि उत्तर काश्मीरमध्ये 'झोजी-ला' च्या (ला म्हणजे खिंड) पलीकडे रेटण्यात भारतीय लष्कराला यश मिळाले. त्याचबरोबर भारताने संयुक्त राष्ट्रांकडे या संघर्षात मध्यस्थी करण्याची मागणी केली. संथ गतीने चालणारा हा संघर्ष १९४८च्या वर्षात तसाच चालू राहिला आणि भारतीय सैन्य घुसखोरांना मागे मागे रेटतच राहिले.

१ जानेवारी १९४९ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या मध्यस्थीने युद्धबंदी करण्यात आली आणि त्यानंतर कराची येथे करार करण्यात आला. त्या करारानुसार दोन्ही देशांच्या प्रत्यक्ष ताब्यात असलेल्या भूप्रदेशाला स्पर्श करणारी रेषा ही 'युद्धबंदीरेषा' मानण्यात आली. या युद्धबंदीबरोबरच भारताचे स्वातंत्र्योत्तर पहिले युद्ध संपुष्टात आले. पण, या युद्धानंतर मूळ काश्मीरचा ५३% भाग पाकिस्तानच्या ताब्यात राहिला आणि उरलेला ४७% प्रदेश भारताच्या ताब्यात राहिला.

**माहिती शोधा आणि चर्चा करा.**

भारत आणि पाकिस्तानातील संयुक्त राष्ट्रांचा सैनिक परिवेक्षण समूह (UNMOGIP)काय आहे? हा समूह काय भूमिका निभावतो ?

## जुनागड मुक्ती संग्राम : ऑक्टोबर १९४७




जुनागड

जुनागड हे सौराष्ट्र भागातील (आजच्या गुजरात राज्यात) एक संस्थान होते. नवाब मुहंमद महाबत खान तिसरा हा जुनागडचा राजा होता आणि त्या संस्थानात प्रजा बहुसंख्य हिंदू होती. या संस्थानात एक सीमा अरबी समुद्रालगत तर इतर सीमा नवनिर्मित भारताशी जोडलेल्या होत्या. आपले राज्य पाकिस्तानात सामील करून घ्यावे अशी नवाबाची इच्छा होती.

जुनागडच्या सैन्याने शेजारील मंगरोल आणि बाबारियावाड या राज्यात घुसखोरी आणि हिंसाचार सुरू केला. जुनागडच्या हिंदू प्रजेने नवाबाच्या विरोधात उठाव सुरू केला. या माहितीच्या आधारे भारत सरकारने त्वरेने जुनागड मुक्त करण्यासाठी सैनिकांची जमवाजमव करण्याचे ठरवले. पायदलाची एक ब्रिगेड राजकोट येथे एकत्र केली गेली, जाफ्राबादमध्ये (काठियावाड भागात) भू-जल कारवाईसाठी नौसेनेची एक तुकडी जमवण्याचे हुकूम देण्यात आले. तसेच जामनगर येथे हवाईदलाचे एक स्क्वॉड्रन तातडीच्या प्रतिक्रियेसाठी सज्ज ठेवण्यात आले. तिन्ही दलांच्या एकत्रित कारवाईचे स्वातंत्र्य मिळाल्यानंतरचे हे पहिले उदाहरण होते.

एवढ्या मोठ्या संख्येने सैन्य जमा होत असलेले पाहून जुनागडचा नवाब पाकिस्तानात निघून गेला. ऑक्टोबरच्या अखेरीस भारतीय सैन्य जुनागडमध्ये शिरले. हवाईदलाने जुनागडवरून विमानांची उड्डाणे केली आणि नौदलाच्या तुकड्या जाफ्राबादेत उतरल्या. त्यानंतर जुनागडमध्ये जनमत घेण्यात आले त्यामते ९१% लोकांनी भारतात विलीनीकरणाची इच्छा व्यक्त केली.

## हैद्राबाद मुक्तिसंग्राम: सप्टेंबर १९४८




हैद्राबाद

जेव्हा भारत स्वतंत्र झाला, तेव्हा हैद्राबादच्या निझामाने स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला. पण, भारताच्या भूभागाने वेढलेले हैद्राबादचे स्वतंत्र राष्ट्र भविष्यात भूराजकीय प्रश्न निर्माण करू शकले असते. जुलै १९४८ पर्यंत भारतीय फौजा आणि निझामाचे रझाकार यांच्यातल्या सीमेवरील चकमकी वाढल्या होत्या. पाकिस्तानने वरंगळ आणि बिदर या हैद्राबादमधील विमानतळांवर हवाईमार्गे बंदुका उतरवल्या.


भारताने लष्करी कारवाई केली, तिचे सांकेतिक नाव ‘ऑपरेशन पोलो’ असे ठेवले होते. ही मोहीम १२ सप्टेंबर १९४८ रोजी सुरू करण्यात आली. भारतीय सैन्याने पाच ठिकाणी आघाडी उघडली. सोलापूर – हैद्राबाद या दिशेची मोहिम ही सगळ्यांत महत्वाची होती. कारण तो सर्वात कमी लांबीचा मार्ग होता. भारतीय हवाईदलाने बिदर आणि वरंगळ या हवाईतळांवर हल्ला केला आणि आपल्या पायदळाला परिणामकारक पाठिंबा दिला. भारतीय सैन्याने हैद्राबादच्या सैन्याचा आणि रझाकारांचा विरोध मोडून काढत हैद्राबाद काबीज केले. निझामाने १७ सप्टेंबर १९४८ रोजी शरणागती पत्करली.

## गोवा, दमण व दीव मुक्ती संग्राम : डिसेंबर १९६१

भारतामध्ये गोवा, दीव आणि दमण येथे पोर्तुगीजांचे राज्य होते. भारत स्वतंत्र झाल्यानंतरदेखील पोर्तुगीजांनी या प्रदेशावरील हक्क सोडला नाही. या प्रदेशाला पोर्तुगीजांपासून मुक्त करणे हा भारताच्या वसाहतवादविरोधी धोरणाचा एक भाग होता.

भारताने पायदळाची एक डिव्हिजन सैन्य, रणगाडे व तोफखाना; तसेच हवाई दलाची लढाऊ व बॉम्बफेकी विमाने यांच्या साहाय्याने पोर्तुगीजांच्या ताब्यातील गोव्यावर हल्ला करण्याचे योजले. भारतीय नौसेनेला गोव्याच्या तीन बंदरांची नाकेबंदी करण्याचे काम सोपवण्यात आले. ज्यायोगे या बंदरांत इतर युद्धनौका येऊ नयेत. याबरोबर, पायदळाच्या दोन बटालियन आणि जामनगरच्या तळावरून हवाई दलाच्या साहाय्याने आणि नौदलाच्या साहाय्याने दीवच्या किनारपट्टीवरील किल्ला आणि तिथले प्रदेश काबीज करण्याची योजना केली. या मोहिमेची सुरुवात १८ डिसेंबर १९६१ रोजी झाली.

पोर्तुगीजांनी १९ डिसेंबर १९६१ रोजी शरणागती पत्करली आणि लढाई संपली. या लढाईत सुमारे ३००० पोर्तुगीज सैनिक कैद झाले.




दीव




दमण





गोवा

## माहिती शोधा आणि चर्चा करा.

पोर्तुगीजांसाठी गोव्याचे महत्त्व काय होते ?

## भारत – चीन युद्ध : १९६२






लडाख

१९४९ साली चीनच्या साम्यवादी सरकारला प्रथम मान्यता देण्याऱ्यांमध्ये भारत हा एक देश होता. १९५५ च्या बांडुंग परिषदेत चीनचा सहभाग होता. असे असूनदेखील या दोन देशांमधील संबंध बिघडत गेले. १९५८ मध्ये अक्साई चीन परिसरात चकमकी झाल्या होत्या. पुढे १९६२ साली या दोन्ही देशांमध्ये युद्ध झाले.

भारत आणि चीनदरम्यानच्या तणावांची मुख्य कारणे खालीलप्रमाणे– १९५० साली चीनच्या पीपल्स लिबरेशन आर्मीने तिबेटवर बळजबरीने ताबा मिळवला.

- चीनने मॅकमहॉन सीमारेषा अमान्य केली आणि संपूर्ण अरूणाचल प्रदेशावर (पूर्वीचे NEFA परिसरात) आपले सार्वभौमत्व असल्याचा दावा केला.
- १९५६ मध्ये लडाख येथील अक्साई चीन प्रदेशात घुसखोरी करून त्या प्रदेशावर ताबा मिळवला.
- १९५९ साली चौदावे दलाई लामा आणि अनेक तिबेटी निर्वासित भारतात आले. भारत सरकारने दलाई लामा यांना आश्रय दिला.
- अलिप्ततावादी धोरणाच्या आधारे भारताचे आफ्रो–आशियायी देशांमधील वाढते महत्त्वही चीनला सलत होते.

२० ऑक्टोबर १९६२ साली चीनच्या पीपल्स लिबरेशन आर्मीने लडाख आणि अरुणाचल प्रदेश (त्यावेळचा नेफा) यावर एकाच वेळी हल्ला केला. हे युद्ध २१ नोव्हेंबर १९६२पर्यंत चालले. या युद्धात भारताचा पराभव झाला. नंतर अरुणाचल प्रदेशामधून चीनने आपणहून माघार घेतली. हिमवृष्टी होऊन खिंड बंद होण्याआधी ही माघार घेतली होती. लडाखमधील अक्साई चीन परिसरातून मात्र चीनच्या सैन्याने माघार घेतली नाही.

**भारताच्या पराभवाची कारणे :**

(i) भारताच्या राजकीय नेतृत्वाला चीनच्या उद्‌देशांबाबत अंदाज बांधता आला नाही. याबाबत भारताच्या लष्करी सल्लागारांनी आपण योग्य तयारी करण्याची गरज आहे याची पूर्वसूचना दिली होती.

(ii) चीनने भारताविरुद्ध मर्यादित युद्ध करण्याच्या दृष्टीने लागणारे सैनिकी बळ व साधनसामुग्री यांची योग्य तयारी केली होती.

(iii) भारतीय सैन्य जेव्हा युद्धात उतरले तेव्हा अनेक गोष्टींची कमतरता होती. त्यात योग्य रस्ते, पुरवठा योजनेचा अभाव, डोंगराळ प्रदेशात युद्धासाठीच्या योग्य शस्त्रांचा अभाव आणि अतिउंच प्रदेशात लढण्यासाठी लागणाऱ्या या साधनसामग्रीचा अभाव होता.

(iv) भारतीय हवाईदलाचा योग्य वापर केला गेला नाही.




भारत – चीन युद्ध : १९६२

## भारत – पाकिस्तान युद्ध : १९६५




कच्छचे रण




भारत–पाकिस्तान सीमा (काश्मीर)

१९६५ च्या भारत–पाकिस्तान युद्धाची कारणे जम्मू–काश्मीरबाबतच्या पाकिस्तानच्या दृष्टिकोनात शोधता येतात. १९४७ साली जम्मू काश्मीरच्या महाराजांनी भारतात सामील होण्याचा जो निर्णय घेतला तो पाकिस्तानला मान्य नव्हता. त्याचा परिणाम म्हणजे १९४७–४८ चे पहिले भारत–पाकिस्तान युद्ध होय. १९६५ च्या भारत पाकिस्तान युद्धाची कारणे काय होती ? ती जाणून घेऊया.

१९६२ च्या भारत चीन युद्धामध्ये भारताचा जो पराभव झाला होता त्यामुळे भारताच्या लष्करी सामर्थ्यावर, तसेच नीतीधैर्यावर होणाऱ्या या परिणामांबद्दल पाकिस्तानने केलेला अंदाज योग्य नव्हता. तसेच जम्मू–काश्मीरच्या जनतेच्या विचारांबाबतही त्यांचे अंदाज चुकले होते. भारतीय लष्कराचे मनोधैर्य आणि नेतृत्व यांची चाचपणी करण्यासाठी पाकिस्तानने कच्छच्या रणात एप्रिल १९६५ मध्ये एक छोटी मोहीम आखली. ती यशस्वी झाली नाही. त्यानंतर 'ऑपरेशन जिब्राल्टर' नावाने १९४७च्या प्रमाणे पाकिस्तानने जम्मू काश्मीरमध्ये मोहीम आखली. ५ ऑगस्ट १९६५ मध्ये सुमारे ३००० पाकिस्तानी सैनिक स्थानिक काश्मीरी जनतेच्या वेषात प्रत्यक्ष ताबारेषा ओलांडून काश्मीरमध्ये घुसले. काश्मीरी नागरिकांनी या घुसखोरीची माहिती तातडीने दिली. भारतीय लष्कराने घुसखोरांना अडवून त्यांचा पराभव केला. १ सप्टेंबर १९६५ रोजी ऑपरेशन ग्रँड स्लॅम नावाने पाकिस्तानने छांब–जौरीयन क्षेत्रातील जम्मू–श्रीनगर रस्ता अडवण्याच्या दृष्टीने कारवाई सुरू केली. पाकिस्तानच्या या आक्रमणाच्या विरोधात भारतीय हवाई दलाने प्रतिकार करून त्याला थोपवण्यात यश मिळवले. त्यानंतर सियालकोट व लाहोर क्षेत्रात भारताने प्रतिहल्ला चढवला. या प्रतिहल्ल्यात धोक्याची जाणीव होऊन पाकिस्तानने छांब क्षेत्रातून चिलखती तुकड्या काढून सियालकोट व लाहोर परिसरात तैनात करण्यास सुरुवात केली. भारतीय सैन्याने पूर्व लाहोरमधील इचोगिल कालव्यावर लक्ष केंद्रित केले व सियालकोट क्षेत्रात घनघोर युद्ध झाले.

दरम्यानच्या काळात पाकिस्तानने लाहोरच्या दक्षिणेस आपले रणगाडा दल एकत्रित केले आणि ९ ते ११ सप्टेंबर १९६५ च्या दरम्यान खेमकरण क्षेत्रात प्रतिहल्ला सुरू केला. भारतीय सेनेने त्या भागात कालवे फोडून दलदल निर्माण केली आणि असल उत्तर या

गावात पाकिस्तानी रणगाड्यांना अडवले. पाकिस्तानचे अनेक पॅटन रणगाडे तेथे उद्‌ध्वस्त करण्यात आले. २३ सप्टेंबर १९६५ रोजी युद्‌धबंदी जाहीर होईपर्यंत सर्व क्षेत्रात युद्‌ध झाले. १९६६ मध्ये ताश्कंद येथे शांतता परिषद झाली. दोन्ही बाजूंनी ताब्यात घेतलेल्या प्रदेशातून सैन्य माघार घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

या युद्‌धामुळे १९६२ च्या युद्‌धात भारतीय सेनेने गमवलेला आत्मविश्वास पुन्हा परत मिळवला. या युद्‌धात भारताची शस्त्रास्त्रे ही पाकिस्तानला अमेरिकेने दिलेल्या शस्त्रास्त्रांपेक्षा जुनी होती. दुसऱ्या महायुद्‌ध काळातील शेअरमन रणगाडे व व्हॅंपायर आणि हंटर विमाने होती तर पाकिस्तानकडे पॅटन रणगाडे व F 86 सेबरजेट आणि F 104 स्टार फायटर्स ही आधुनिक विमाने होती. या युद्‌धानंतर भारतीय लष्कराचे आधुनिकीकरण करण्यास सुरुवात करण्यात आली. त्याचा फायदा भारताला १९७१ च्या युद्‌धात झाला.



भारत – पाकिस्तान युद्‌ध: १९६५

## भारत –पाकिस्तान युद्‌ध : १९७१

पाकिस्तानात १९७०मध्ये संसदेच्या सार्वजनिक निवडणुका झाल्या. शेख मुजीबूर रहमान यांच्या नेतृत्वाखाली पूर्व–पाकिस्तानस्थित अवामी लीग या पार्टीला बहुमत मिळाले. परंतु, पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष याह्या खान यांनी शेख मुजीबूर रहमान यांना सरकारस्थापनेपासून दूर ठेवले. त्यामुळे पूर्व पाकिस्तानात मोठ्या प्रमाणात निदर्शने सुरू झाली. याह्या खान यांनी निदर्शकांवर कारवाईचा बडगा उगारला (याला 'ऑपरेशन सर्चलाईट' म्हणतात). अवामी लीगचे प्रमुख मुजीबूर रहमान यांनी स्वातंत्र्याची मागणी केली. पाकिस्तानी सैन्याने लोकांचा संहार करण्यास सुरुवात केली आणि पूर्व पाकिस्तानातून लाखोंच्या संख्येने निराश्रित लोक भारतामध्ये येऊ लागले. संयुक्त राष्ट्राने मध्यस्थी करून हा संहार थांबवावा या भारताच्या विनंतीचा काही परिणाम झाला नाही. भारतीय लष्कर आणि पाकिस्तानी लष्कर यांच्यात चकमकी सुरू झाल्या.

भारताने शेख मुजीबूर यांच्या अवामी लीगला आणि मुक्ती वाहिनीच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य चळवळीला पाठिंबा दिला. पाकिस्तानने ३ डिसेंबर १९७१ रोजी भारताच्या पश्चिम विभागातील आठ विमान तळांवर




हवाई हल्ले करून लढाईची सुरुवात केली. हे हवाई हल्ले परिणामकारी नव्हते. पण त्यामुळे भारताने पाकिस्तानविरुद्ध युद्ध पुकारले.


ही लढाई दोन आघाड्यांवर लढली गेली– पश्चिम आघाडी आणि पूर्व पाकिस्तान आघाडी. भारतीय सैन्याने मुक्ती वाहिनीच्या मदतीने पूर्व पाकिस्तानात चारही बाजूंनी चढाई केली. भारतीय भूदल, हवाईदल आणि नौदल यांच्यात उत्तम समन्वय साधला गेला. नौदलाने पूर्व पाकिस्तानच्या चितगाँव, खुलना आणि कोक्सबझार या महत्वाच्या बंदरांची नाकेबंदी केली. हवाईदलाने पूर्व पाकिस्तानवर हवाई वर्चस्व निर्माण केले. पायदळाने ढाक्का शहरापर्यंत आगेकूच केली.

पश्चिम आघाडीवर पाकिस्तानचे आक्रमण यशस्वीरीत्या थोपवण्यात आले आणि त्याचबरोबर भारतीय सेनेने 'शक्करगड' भागात बराच परिसर पादाक्रान्त केला. पाकिस्तानचे अनेक रणगाडे उद्ध्वस्त केले आणि पाकिस्तानी हवाईदलाचे मोठे नुकसान केले. १६ डिसेंबर १९७१ रोजी पाकिस्तानच्या सेनेने ढाक्का येथे शरणागती पत्करली आणि ही लढाई संपली. पूर्व पाकिस्तान एक स्वतंत्र देश झाला, जो आज बांगलादेश या नावाने ओळखला जातो.

या युद्धामध्ये भारताला १९७१च्या भारत–सोव्हिएत रशिया कराराचा फायदा झाला. त्याउलट अमेरिकेने बंगालच्या उपसागरात भारतावर दबाव आणण्यासाठी त्याचे विमानवाहू जहाज युएसएस एंटरप्राईज पाठवून पाकिस्तानला मदत केली.

**माहिती शोधा आणि चर्चा करा.**

१९७१ च्या युद्धात भारतीय नौसेनेने कराची बंदराविरोधात काय भूमिका निभावली होती ?



१६ डिसेंबर १९७१ : ढाक्का येथे पाकिस्तानची शरणागती

## भारत–पाकिस्तान संघर्ष, कारगिल १९९९




१९९० च्या दशकाच्या उत्तरार्धात जम्मू काश्मीरमधील राजकीय परिस्थितीत थोडे स्थैर्य होते. १९९८ मध्ये प्रधानमंत्री वाजपेयी यांनी पाकिस्तानचे प्रधानमंत्री नवाझ शरीफ यांची लाहोर येथे भेट घेतली. त्या भेटीद्‌वारे दोन्ही देशांदरम्यान शांतता प्रस्थापित करण्याबाबत चर्चा झाली. याच काळात पाकिस्तानने कारगिलमध्ये अस्थिरता निर्माण करण्याचे कारस्थान रचले.

जोझिला, द्रास, कारगिल आणि बटालिकमार्गे श्रीनगर ते लेह या भारत-पाकिस्तानच्या प्रत्यक्ष ताबारेषेजवळून जाणाऱ्या मार्गावर अडथळा आणण्याचे नियोजन पाकिस्तानने सुरू केले. भारताचा लेहकडे जाणारा मार्ग, तसेच सियाचीनला जाणारा मार्ग या कारवाईमुळे धोक्यात येत होता. नोव्हेंबर १९९८ ते एप्रिल १९९९ या हिवाळ्याच्या काळात पाकिस्तानने तेथील चौक्यांवर ताबा मिळवला. या चौक्या हिवाळ्यातील प्रचंड थंडी व बर्फामुळे मोकळ्या केल्या जात असत.या चौक्या ताब्यात घेण्यासाठी पाकिस्तानने त्यांच्या नॉदर्न लाईट इन्फंट्रीच्या जवानांचा वापर केला. हे लष्करी जवान नसून मुजाहिदिन आहेत असे पाकिस्तान सांगत

होता. या चौक्यांवर पाकिस्तानने ताबा मिळवला आहे हे भारताला मे १९९९ मध्ये तेथे गस्त घालीत असताना समजले. भारताच्या टेहळणी तुकडीला पाकिस्तानी सैन्याने ताब्यात घेऊन त्यांच्यावर अत्याचार करून मारले.

त्यानंतर भारताने सैन्य पाठवून पहिल्यांदा पाकिस्तानचा हस्तक्षेप रोखला व त्यानंतर त्यांना तेथून हुसकावून लावले. पाकिस्तानवर या कारवाईविरुद्ध आंतरराष्ट्रीय पातळीवरदेखील मोठा दबाव आणला गेला. भारतीय सेनेने शर्थीने पाकिस्तानी घुसखोरांना माघार घेण्यास भाग पाडले. यात भारतीय हवाई दलाचे मोठे योगदान होते. शेवटी २६ जुलै १९९९ रोजी भारताने कारगिलवर विजय मिळवला.

**माहिती शोधा आणि चर्चा करा.**

श्रीनगर– लेह महामार्गाच्या दृष्टिकोनातून कारगिलचे भूराजकीय महत्त्व काय आहे ?



कारगिल १९९९

**For details of the various wars fought by the Indian Army look at the following website:**

History - The Official Home Page of the Indian Army

https://indianarmy.nic.in/Site/FormTemplete/frmTempSimple.aspx?MnId=+50.




**कारगिल युद्ध स्मारक :** 'ऑपरेशन विजय' या लष्करी कारवाईत हुतात्मा झालेल्या शूर जवानांच्या स्मृतिप्रीत्यर्थ द्रास येथे स्मारक उभारले आहे.

## स्वाध्याय

**प्र. १ (अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.**

**(i)** "रझाकार" हा शब्दप्रयोग ................. यांच्याशी संबंधित आहे.

(अ) हैद्राबादचा निझाम

(ब) जम्मू काश्मीरचे महाराज

(क) बांगलादेशचे मुजीबूर रहमान

(ड) गोव्याचे पोर्तुगीज

**(ii)** जुनागड हे संस्थान .................... या राज्यात होते.

(अ) गुजरात

(ब) गोवा, दमण आणि दीव

(क) महाराष्ट्र

(ड) पश्चिम बंगाल

**(ब) योग्य कारण देऊन वाक्य पूर्ण करा.**

(i) भारताने कारगिल क्षेत्रात सैन्य पाठवले , कारण.............

**(क) खालील विधानाबाबत योग्य संकल्पना लिहा.**

(i) जम्मू-काश्मीर भारताचे अंग बनले त्या दस्तऐवजास संबोधतात.....

**(ड) गटात न बसणारा शब्द शोधा.**

(i) छांब, शक्करगढ, अखनुर, अंजदीव

**प्र. २ खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण लिहा.**

(i) युनायटेड नेशन्स ऑब्जरव्हर ग्रुपची निर्मिती १९४७-४९ च्या भारत-पाकिस्तान युद्धानंतर करण्यात आली.

**प्र. ३ खालील विधानावर तुमचे मत लिहा.**

(i) कारगिलसारखी परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ नये म्हणून भारत काय करू शकतो ?

**प्र. ४ खालील प्रश्नाचे उत्तर लिहा.**

(i) १९६१ मध्ये भारताने गोवा कसा ताब्यात घेतला ते स्पष्ट करा.

**उपक्रम**

पूर्व पाकिस्तानच्या नकाशाचा अभ्यास करा. १९७१ चे भारत-पाकिस्तान युद्ध, भारतीय पायदळाने पूर्व पाकिस्तानात कसे लढले ? त्याचे वर्गात वाचन करून त्यावर चर्चा करा.

## परिशिष्ट

### अ : संक्षिप्त रूपे

**ANZUS:** Australia New Zealand United States

**ARF:** ASEAN Regional Forum

**ASEAN:** Association of South East Asian Nations

**ATGM:** Anti-tank guided missile

**BIMSTEC:** Bay of Bengal Initiative for Multi-Sectoral Technical and Economic Cooperation

**BRICS:** Brazil, Russia, India, China, South Africa

**CENTO:** Central Treaty Organisation

**CFL:** Cease Fire Line

**CTBT:** Comprehensive Test Ban Treaty

**DEAL:** Defence Electronics and Applications Laboratory

**DRDO:** Defence Research and Development Organisation

**ECJ:** European Court of Justice

**ECOSOC:** Economic and Social Council

**ECSC:** European Coal and Steel Community

**EEC:** European Economic Community

**ETA:** Euskadi Ta Askatasuna (Basque separatist group, Spain)

**EU:** European Union

**G 20:** Group of 20

**GATT:** General Agreement on Tariffs and Trade

**GCC:** Gulf Cooperation Council

**IAEA:** International Atomic Energy Agency

**IONS:** Indian Ocean Naval Symposium

**IORA:** Indian Ocean Rim Association

**IRA:** Irish Republican Army

**IRS:** Indian Remote Sensing Satellite

**ISRO:** Indian Space Research Organisation

**JKLF:** Jammu Kashmir Liberation Front

**KPLT:** Karbi Peoples Liberation Tigers

**LTTE:** Liberation Tigers of Tamil Eelam

**MGC:** Mekong-Ganga Cooperation

**NATO:** North Atlantic Treaty Organisation

**NCA:** Nuclear Command Authority

**NDFB-S:** National Democratic Front of Bodoland - (Saoraigwra), (NDFB-S)

**NEC:** North Eastern Council

**NEFA:** North East Frontier Agency

**NPT:** Nuclear Non-proliferation Treaty

**NSCN(IM):** National Socialist Council of Nagaland (led by Isak Chishi Swu and Thuingaleng Muivah.)

**NSG:** Nuclear Suppliers Group

**OAPEC:** The Organization of Arab Petroleum Exporting Countries

**OIC:** Organisation of Islamic Cooperation

**OPEC:** Organisation of Petroleum Exporting Countries

**POK :** Pakistan Occupied Kashmir

**PKK:** Kurdish Workers Party

**PLA:** People's Liberation Army of China

**PLO:** Palestine Liberation Army

**QUAD:** Quadrilateral Security Dialogue (United States, Australia, India, Japan)

**SAARC:** South Asian Association for Regional Cooperation

**SAFTA:** South Asian Free Trade Area

**SAM:** surface to air missiles

**SAPTA:** South Asian Preferential Trading Arrangement

**SCO:** Shanghai Cooperation Organisation

**SEATO:** South East Treaty Organisation

**SSB:** Sashastra Seema Bal

**TRIPS:** Agreement on Trade-Related Aspects of Intellectual Property Rights

**ULFA (I):** United Liberation Front of Asom – (Independent)

**ULFA:** United Liberation Front of Asom

**UNCED:** UN Conference on Environment and Development

**UNLF:** United National Liberation Front

**UNMOGIP:** United Nations Military Observer Group in India and Pakistan

**WTO:** World Trade Organisation

## ब : संकेतस्थळे

**Some useful websites that the students and teachers can access for more information on the topics discussed in the various chapters:**

### CHAPTER I

See the following website for additional information:

1. College of Engineering, (COEP) Pune, History Club Lectures:

   (i) The World after World War II: Dr Shrikant Paranjpe (in Marathi)

   https://www.youtube.com/watch?v=4LY_j_NLJBE

   (ii)“१९९१ नंतरचे जग आणि प्रवाह “ – डॉ. श्रीकांत परांजपे |

   ‘World After 1991’ -Dr. Shrikant Paranjpe.

   https://www.youtube.com/watch?v=lsVNgjzmW94
2. India and United Nations Peacekeeping Operations, By Lt Gen Satish Nambiar (Retd) January 26, 2014, Media Centre, Ministry of External Affairs, Government of India

   https://mea.gov.in/articles-in-indian-media.htm?dtl/22776/India+and+United+Nations+Peacekeeping+Operations
3. India and the United Nations, Ministry of External Affairs, Government of India

   https://www.mea.gov.in/india-and-the-united-nations.htm
4. Annual Reports, Ministry of Defence, Government of India

   https://mod.gov.in/documents/annual-report
5. Annual reports, Ministry of External Affairs, Government of India.
   https://www.mea.gov.in/annual-reports.htm?57/Annual_Reports

### CHAPTER II

See the following website for additional information:

1. Ministry of External Affairs, Government of India, Briefs on Foreign Relations

   This website provides:
   (i) Briefs on India and Regional Organisations and
   (ii) Briefs on Bilateral Relations with various countries.
   https://mea.gov.in/foreign-relations.htm

### CHAPTER III

See the following website for additional information:

1. Ministry of External Affairs, Government of India, Briefs on Foreign Relations
   This website provides:
   (i) Briefs on India and Regional Organisations and
   (ii) Briefs on Bilateral Relations with various countries.

   https://mea.gov.in/foreign-relations.htm

## CHAPTER IV

See the following website for additional information:

1. Statement to Parliament on Nuclear Tests in Pokhran by Prime Minister Atal Bihari Vajpayee. (Twelfth Lok Sabha, Session: 2, Date : 27-05-1998 ,Participants : Vajpayee Prime Minister Atal Bihari. Source : Lok Sabha, Debates, http://164.100.47.194/Loksabha/Debates/Result12.aspx?dbsl=248)

   https://www.vifindia.org/sites/default/files/national-security-vol-1-issue-1-document-statement-to-parliament.pdf

2. "Evolution of India's Nuclear Policy" PAPERS LAID ON THE TABLE XII LOK SABHA DEBATES, Session II, (Budget), Wednesday,May 27, 1998 / Jyaistha 6, 1920 (Saka).

   https://parliamentofindia.nic.in/ls/lsdeb/ls12/ses2/0527059801.htm

3. Technology Areas: Missiles, DRDO, India. https://www.drdo.gov.in/drdo/English/index.jsp?pg=tech_missiles.jsp

4. Indian Navy: Indian Maritime Doctrine - 2015 Version https://www.indiannavy.nic.in/content/indian-maritime-doctrine-2015-version

## CHAPTER V

See the following website for additional information:

1. PM's speech at the Chief Minister's meet on Naxalism, April 13, 2006, New Delhi

   See:https://archivepmo.nic.in/drmanmohansingh/speech-details.php?nodeid=302

2. For legal details on Terrorism see: Counter Terrorism and Counter Radicalization Division, Ministry of Home, Government of India. The Division deals with matter relating to terrorism, counter-terrorism, radicalization, counter-radicalization, UAPA, NIA Act, FICN, FATF.

   https://mha.gov.in/division_of_mha/counter-terrorism-and-counter-radicalization-division

3. Chapter on Internal Security, Annual report, Ministry of Home, government of India (Latest Report)

   https://mha.gov.in/documents/annual-reports

## CHAPTER VI

See the following website for additional information:

1. History - The Official Home Page of the Indian Army https://indianarmy.nic.in/Site/FormTemplete/frmTempSimple.aspx?MnId=+50.

2. Annual Reports, Ministry of Defence, Government of India https://mod.gov.in/documents/annual-report

## विद्यार्थ्यांसाठी अतिरिक्त अद्ययावत माहिती

### फोर स्टार जनरलच्या हुद्यामध्ये संरक्षण प्रमुख पदाच्या निर्मितीस केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिली

**नवी दिल्ली, २४ डिसेंबर २०१९**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने एक ऐतिहासिक निर्णय घेत, देशातील सर्वोच्च संरक्षण व्यवस्थापनात सुधारणा करत फोर स्टार जनरलच्या हुद्यामध्ये संरक्षण प्रमुख पद सी डी एस (Chief 0f Defence Staff) स्थापन करण्यास मान्यता दिली आहे, यांचा पगार आणि अतिरीक्त सुविधा सेवाप्रमुखांप्रमाणेच असतील. संरक्षण मंत्रालयाने निर्माण केलेले संरक्षण प्रमुख हे सैनिक विभागाचे देखील प्रमुख असतील, आणि ते त्याचे सचिव म्हणून कार्यभार बघतील.

सीडीएसच्या अध्यक्षतेखालील सैनिकी व्यवहार विभाग खालील बाबींवर कार्य करील:

(i) देशाच्या सशस्त्र सेना, त्यात स्थल सेना, लष्कर, नौदल आणि वायू दल.

(ii) स्थल सेना मुख्यालय, नौदल मुख्यालय, हवाई मुख्यालय आणि संरक्षण कर्मचारी मुख्यालय असलेले संरक्षण मंत्रालयाचे एकात्मिक मुख्यालय.

(iii) प्रादेशिक सैन्य

(iv) स्थल सेना, नौदल आणि हवाई दलाशी संबंधित कामे.

(v) प्रचलित नियम आणि कार्यपद्धतीनुसार भांडवल संपादन वगळता इतर सेवांसाठीची खरेदी.

**या व्यतिरिक्त सैन्य व्यवहार विभागाच्या आदेशामध्ये पुढील बाबींचा समावेश असेल:**

(अ) एकत्रित संयुक्त योजना आणि आवश्यकतांच्या माध्यमातून खरेदी, प्रशिक्षण आणि कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीच्या प्रक्रियेचे समन्वय

(ब) सैन्य तुकड्यांचे पुनर्गठन करणे आणि संयुक्त कारवाईद्वारे स्रोतांच्या तर्कशुद्ध वापरासाठी संयुक्त आदेश तयार करणे.

(क) स्वदेशी उपकरणाच्या वापरास चालना देणे.

सैन्य व्यवहार विभागाचे प्रमुख असण्याव्यतिरिक्त संरक्षण प्रमुख, चीफ ऑफ स्टाफ कमिटीचे स्थायी अध्यक्षही असतील. ते संरक्षण मंत्रालयाच्या सर्व सैन्य सेवाविषयक सल्लागार म्हणून काम करतील. हे तीन सेना प्रमुख रक्षा मंत्र्यांना त्यांच्या संबंधित सेवेसंबंधित बाबींचा सल्ला देत राहतील. सीडीएस तिन्ही सैन्य प्रमुखांसह कोणत्याही सैन्य कमांडचा उपयोग करणार नाही, जेणेकरून राजकीय नेतृत्वाला नि: पक्षपाती सल्ला देण्यात सक्षम होतील.

चीफ ऑफ स्टाफ कमिटीचे कायमस्वरुपी अध्यक्ष म्हणून, सीडीएस खालील कार्ये पार पाडावी लागतील.

- सीडीएस तीनही सेना दलांच्या संघटनांचे प्रशासन बघतील .सायबर आणि अंतराळाशी संबंधित सेवा संस्था /कमांड सीडीएसच्या अखत्यारीत असतील.

- संरक्षण मंत्री आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांच्या (एनएसएच्या) अध्यक्षतेखाली संरक्षण योजना समितीच्या आणि संरक्षण अधिग्रहण समितीचे सीडीएस सदस्य असतील.
- न्युक्लीअर कमांड अथॉरिटीचे लष्करी सल्लागार म्हणून काम पाहतील.
- सीडीएस पदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर तीन वर्षांच्या आत तीन सेवांमध्ये कार्यवाही, लॉजिस्टिक्स, वाहतूक, प्रशिक्षण, पाठबळ देवा, दळणवळण, दुरुस्ती आणि देखभाल इ. मध्ये संयुक्तता आणणे.
- पायाभूत सुविधांचा जास्तीतजास्त वापर करून सेवांमध्ये तर्कसंगतपणा आणणे.
- एकात्मिक क्षमता विकास आराखडा (आयसीडीपी) चा पाठपुरावा म्हणून पंचवार्षिक संरक्षण भांडवल अधिग्रहण योजना (डीसीएपी) आणि दोन वर्षाची रोल-ऑन वार्षिक अधिग्रहण योजना (एएपी) लागू करणे.
- अपेक्षित बजेटच्या आधारे भांडवल संपादन प्रस्तावांना आंतर-सेवा प्राथमिकता देणे.
- वायफळ खर्च कमी करून सशस्त्र सैन्याच्या लढाऊ क्षमता वाढविण्याच्या उद्देशाने तीन सेवांच्या कामकाजात सुधारणा घडवून आणणे.

अशी अपेक्षा आहे की उच्च संरक्षण व्यवस्थापनातील या सुधारणेमुळे सशस्त्र सैन्याने समन्वित संरक्षण सिद्धांत आणि कार्यपद्धती राबवण्यास सक्षम केले जाईल आणि तिन्ही सेवांमध्ये संयुक्तपणा प्रोत्साहित करण्यास (Jointness) मदत होईल. प्रशिक्षण, लॉजिस्टिक्स आणि ऑपरेशन्स या क्षेत्रातील अधिकाधिक सहकार्य आणि खरेदीच्या प्राथमिकतेसाठी समन्वित कृती करून देशाला फायदा होईल.

(Government of India, Press Information Bureau, (Release ID: 1597572)
https://pib.gov.in/PressReleseDetail.aspx?PRID=1597425)

**देशाचे पहिले संरक्षण दल प्रमुख म्हणून जनरल बिपीन रावत यांनी पदभार स्वीकारला**

नवी दिल्ली, १ जानेवारी २०२०

जनरल बिपिन रावत यांनी आज संरक्षण दलाचे प्रमुख म्हणून पदभार स्वीकारला. तिन्ही सेवादलांसाठी संरक्षण मंत्र्यांचे ते प्रमुख लष्करी सल्लागार असतील. लष्करी कामकाज विभागाचे प्रमुख म्हणूनही ते काम पाहतील. उपलब्ध स्रोतांचा योग्य वापर, संयुक्त नियोजन आणि एकात्मिकरणाच्या माध्यमातून सेवादलांसाठी खरेदी, प्रशिक्षण आणि परिचालनात अधिक समन्वय राखण्यात संरक्षण दल प्रमुखांची महत्वपूर्ण भूमिका राहील.

(Government of India, Press Information Bureau, (Release ID: 1598195)
https://pib.gov.in/PressReleseDetail.aspx?PRID=1597425)

# परिशिष्ट : सशस्त्र सेनेतील करिअरच्या संधी

**कृपया पुढील गोष्टी काळजीपूर्वक वाचा.**

१. येथे दिलेली माहिती मार्गदर्शनपर आहे. कोणत्याही परिस्थितीत हे पाठ्यपुस्तक यातील आशयावर अंतिम दावा प्रस्थापित करत नाही आणि बालभारती तसेच लेखकांचे मंडळ व प्रकाशक कोणत्याही प्रकारची कायदेशीर किंवा नैतिक जबाबदारी स्वीकारत नाही.

२. पात्रतेचे निकष बदलू शकतात व त्याबाबतील बदल वेळोवेळी संकेतस्थळ आणि एम्प्लॉयमेंट न्यूजमधून जाहीर करण्यात येतील.

३. तटरक्षक दल, सीमा सुरक्षा दल (BSF), केंद्रीय राखीव पोलीसदल (CRPF), इंडो-तिबेट सीमा पोलीस दल (ITBP), औद्योगिक सुरक्षा दल (Industrial Security Force) यांमध्ये अधिकाऱ्यांच्या केडरसाठी निवड केली जाते. हे स्वतंत्रपणे वेळोवेळी घोषित केले जाते.

४. भरतीशी निगडीत जाहिरातींसाठी एम्प्लॉयमेंट न्यूज वाचा.

## Entries after X + II (to be attempted while in X + II) as Officers in Armed Forces

[Please refer to the UPSC and Armed Services websites and Employment News for schedules and latest parameters. This textbook will not be quoted as an authority and will be used only as a guideline for awareness]

**1.** National Defence Academy (NDA), Pune: For male candidates of the age 16.5 to 19 years at the time of entry into the Academy.

**2.** Technical Entry for the Army and the Navy: For male candidates only after passing XII board examination with PCM subjects. Age limit 16.5 to 19 years of age at the time of entry.

**3.** Armed Forces Medical College (AFMC) entry for medical officers stream: Male and Female candidates appearing or passed XII board examination with Physics, Chemistry and Biology as their subjects. Age limit 16.5 to 21 years (changes are likely).

**4.** Armed Forces Medical College entry for Nursing Stream: For Female candidates appearing or passed XII board examination with Physics, Chemistry and Biology as their subjects at the board examination. Age limit 16.5 to 21 years (changes are likely)

Entries after Graduation (Can be attempted while in the final year of graduation) as Officers in the Armed Forces

**1.** Through Combined Defence Services entrance examination. Age limits – 19 to 25 years for male and female candidates, through Permanent Commission stream or Short Service Commission stream. This is in all three services. (changes are likely and there are different streams). Entrance Test is followed by a detailed interview (Service Selection Board interview). (Some entries are without the entrance test).

2. Entry for Engineers in all three services – without entrance test or AFCAT test for the Air Force. Age limits are variable for the three services, from 19 to 24/ 27 years).

3. Legal cadre and Education Cadre – These entries are announced from time to time.

**Note :** All entries (except the AFMC and Nursing) have SSB interview procedure, whether entrance test is applicable or not. The selection through interviews is followed up by medical examination with stringent requirements of height, weight, ECG, EEG, eyesight, hearing ability. Partial or full colour blindness, Knocked Knees and Flat feet are very common grounds for medical rejection.

## Entries in Non-Officer Cadre

These are announced by the Directorate of Recruitment for entry as Jawans, Airmen and Naviks. Min qualifications are X + II. Some craftsmen are also recruited after X std. There are technical entries for diploma holders as direct recruitment at Non-Commissioned Officer levels (Naiks and Havildars or equivalent ranks in the Navy and the Air Force).

## Websites for Recruitment in the Armed Forces

For Army : at www.joinindianarmy.nic.in

For Navy : https://www.joinindiannavy.gov.in/

For Air Force : http://indianairforce.nic.in/

## Websites for Recruitment in Indian Paramilitary Forces

1. **Border Security Force (BSF) :** Get information related to recruitment in Border Security Force.

   **http://bsf.nic.in/en/career.html**

2. **Central Industrial Security Force (CISF) :** is a premier multi-skilled security agency which provides security cover to nuclear installations, space establishments, airports, seaports, power plants, sensitive Government buildings and ever heritage monuments. Detailed information related to recruitment of Central Industrial Security Force.

   **http://www.cisf.nic.in/RECRUITMENT_files/RECRUITMENT.htm**

3. **Central Reserve Police Force (CRPF) :** is an armed Force of the Union of India, with the basic role of assisting the State/Union Territories in Police operations to maintain law and order and contain insurgency. You can find information about recruitment of Central Reserve Police Force.

   **https://www.india.gov.in/recruitment-central-reserve-police-force**

4. **Indo Tibetan Border Police (ITBP) :** is a specialized mountain Force and most of the officers & men are professionally trained mountaineers and skiers. Know more about career opportunities in Indo Tibetan Border Police.

   **http://itbpolice.nic.in/itbpwebsite/index.html**

5. **Sashastra Seema Bal (SSB) :** is a Border Guarding Force (BGF) . You can find detailed information pertaining to recruitment and career opportunities in the SSB.

   **http://www.ssbrectt.gov.in/**

# इयत्ता ९ ली ते १२ वी ई-लर्निंग साहित्य

## मराठी, इंग्रजी माध्यमांमध्ये उपलब्ध

ebalbharati

वैशिष्ट्ये

- विषय योजनेनुसार निर्धारित करण्यात आलेल्या विषयांचा समावेश.
- पाठ्यपुस्तकावर आधारित परिपूर्ण ई-लर्निंग साहित्य.
- दृक-श्राव्य स्वरूपात.
- पाठनिहाय आशयाचे सादरीकरण व आवश्यकतेनुसार प्रश्नांचा समावेश.
- विविध कृती, चित्रे, आकृत्या इत्यादींचा समावेश.
- सहज व सोप्या अध्ययनासाठी ॲनिमेशनचा वापर.
- स्वाध्यायांचा समावेश.

पाठ्यपुस्तक मंडळ, बालभारती मार्फत इयत्ता ९ ली ते १२ वी च्या मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी ई-लर्निंग साहित्य (Audio-Visual) उपलब्ध करून देण्यात येत आहे.

ई-लर्निंग साहित्य घेण्यासाठी....

- वरील Q.R.Code स्कॅन करून ई-लर्निंग साहित्य मागणीसाठी नोंदणी करा.
- Google play store वरून ebalbharati app डाऊनलोड करून ई लर्निंग साहित्यासाठी मागणी नोंदवा.
- पाठ्यपुस्तक मंडळाच्या www.ebalbharati.in, www.balbharati.in या संकेतस्थळांवर भेट द्या.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

संरक्षणशास्त्र इयत्ता बारावी (मराठी माध्यम) ₹ ५५.००

